# अनुक्रमणिका


**4**
अध्यक्षीय– जयंत पाटील
तापलेल्या बॉयलरचा
अखेरीस स्फोट होतोच

**5**
प्रबंध संपादकीय– दिलीप वळसे पाटील
नवा ‘शक्ती’ कायदा महिलांचे संरक्षण करेल

**6**
संपादकीय– डॉ. सुधीर भोंगळे
एकाधिकार शाहीकडे देशाची वाटचाल
व २०२२ मधील आव्हान

**12**
शरद पवार ८१ वा वाढदिवस समारंभ,भाषणे
१) शरद पवार– १२
२) जयंत पाटील–२०
३) रुपाली चाकणकर–२८
४) अजित पवार–३१
५) प्रफुल पटेल–३३
६) छगन भुजबळ–३५
७) नवाब मलिक–३८
८) डॉ. अमोल कोल्हे–४१

**44**
एक तास राष्ट्रवादीसाठी...
– जयंत पाटील यांचा साखराळे गावातील उपक्रम

**46**
‘नेमकचि बोलणें’ ग्रंथाचा प्रकाशन समारंभ
१) पवारसाहेबांची भाषणे म्हणजे
एक विचारयात्रा– संजय राऊत
२) शरद पवारांची भाषणे हा फार
मोठा वैचारिक ठेवा– डॉ. सुधीर भोंगळे
३) शरद पवार यांनी प्रश्नांना दिलेली उत्तरे

**62**
चीनच्या सुरुच कुरापती
– तथागत दास

**68**
महर्षी विठ्ठल रामजी शिंदे
एक कृतज्ञ स्मरण
– डॉ. गणेश राऊत


**74**
व्यापार, उद्योग व सहकाराचे
आश्रयदाते राजर्षी शाहू महाराज
– डॉ. जयसिंगराव पवार

**84**
एकजुटीकडे दुर्लक्ष विनाशकारक!
– अनंत बागाईतकर

**92**
शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त
१२००० नेत्रदृष्टीचा शुभारंभ संकल्प संपन्न
(राजमाता अहिल्यादेवी फाऊंडेशन व
महात्मे आय बँक आय हॉस्पीटलचा अनोखा उपक्रम)
– संतोष महात्मे

**94**
घंटाकर्ण–
कानोकानी (राजकीय किस्से)

**102**
शेवटचे पान–
शायर मिर्झा असदुल्ला खाँ
उर्फ मिर्झा गालिब
– हेमन्त टकले



**संचालक**
**हेमन्त टकले**
**प्रबंध संपादक**
**दिलीप वळसे पाटील**
**संपादक**
**डॉ. सुधीर भोंगळे**
या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी प्रबंध संपादक, संपादक व संचालक सहमत असतीलच असे नाही.

**संपादकीय पत्रव्यवहार**
ठाकरसी हाऊस,
जे.एन.हेरेडिया मार्ग,
बॅलार्ड इस्टेट,
मुंबई-४०० ०३८
०२२-३५३४७४००/०१
**कला निर्देशन**
धनंजय सस्तकर
**मांडणी**
दिलीप रोडे

**वर्गणीचे दर–**
**वार्षिक रु. ५००/–**
**वर्गणीचा धनादेश**
**‘हेमन्त मल्टिमीडिया ओपीसी प्रा.लि.’**
या नावाने काढावा.
**www.ncp.org.in**
यावर मासिक उपलब्ध
**फोटो**
प्रशांत चव्हाण

**मुद्रक, प्रकाशक**
**हेमन्त प्रभाकर टकले** यांनी
**‘हेमन्त मल्टीमीडिया ओपीसी प्रा.लि.’**
च्या वतीने मीडिया आर अ‍ॅण्ड डी.,
१३, अमृत मधुरा, प्लॉट नं. ३, सेक्टर-३,आरएससी-२८, चारकोप, कांदिवली (पश्चिम), मुंबई-४०००६७ येथे छापून ७८, रेशमभवन, ६ वा मजला, वीर नरिमन रोड, चर्चगेट, मुंबई-४०००२० येथून अंक प्रकाशित केले.




# तापलेल्या बॉयलरचा स्फोट अखेरीच होतोच

पक्षाचे सर्व कार्यकर्ते, पदाधिकारी आणि नेते यांना सुरूवातीलाच नववर्षाच्या मनापासून शुभेच्छा देतो आणि आगामी काळात तुमच्या हातून समाज व राष्ट्राच्या विकासाचे भरीव व विधायक काम होवो अशी अपेक्षाही करतो. महाविकास आघाडी सरकार मुख्यमंत्री मा. उद्धवजी ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली सत्तेवर येऊन आता दोन वर्षे पूर्ण झाली आहेत. सत्तेसाठी आसुसलेले आणि उतावीळ झालेले व ती न मिळाल्यामुळे पाण्याबाहेर राहिलेल्या माशासारखे तडफडणारे भारतीय जनता पक्षाचे नेते महाविकास आघाडीचे सरकार पडावे म्हणून देव पाण्यात ठेवून बसले आहेत. आपण सत्तेवर आल्यापासून ते सरकार पडणार असल्याचे वारंवार वायदे करीत आहेत आणि मुदतीचे भविष्यही सांगत आहेत. पण विठू काही असल्या बेईमानांना व लबाडांना पावणार नाही हे त्यांनी कायमचे पक्के लक्षात ठेवावे. भ्रष्टाचारात आकंठ बुडालेले भाजप नेते आता महाविकास आघाडीवर भ्रष्टाचाराचे खोटे-नाटे आरोप करून सरकारला बदनाम करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करीत आहेत. त्यासाठी 'गोबेल्स' नितीचाही अवलंब त्यांच्याकडून केला जात आहे. अनेक नेत्यांना वारंवार पत्रकार परिषदा घेऊन खोटे बोलून आरोपांचे भडीमार करण्याची जणू काही सुपारीच दिली आहे हे किरीट सोमय्या, आशीष शेलार, अतुल भातखळकर, प्रवीण दरेकर व दस्तुरखुद्द भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील आणि देवेंद्र फडणवीस यांच्या पत्रकार परिषदांमधून आपण अनुभवतो आहोत. पण जनतेनेही मागच्या पाच वर्षांच्या काळात त्यांच्या कामाची चव चाखली आहे. हे किती लबाड आणि भ्रष्ट व जातीयवादी-धर्मांध लोक आहेत याची पुरेपूर जाणीव समाजाला झालेली असल्यामुळे ते भाजप नेत्यांच्या आरोपांना कवडीचीही किंमत देत नाहीत. उलट यांचे चेहरे आता पडद्यावर दिसू लागले की लोक टीव्हीचे चॅनेल बदलतात किंवा तो बंद तरी करून टाकतात. सनसनाटी बोलून गोंधळ माजवायचा नाही तर लोकांच्या भावना भडकावून देऊन दंगल घडवून आणायची हेच कारनामे भाजप नेत्यांनी चालू ठेवले आहेत. हे अमरावती, मालेगाव व इतर ठिकाणी घडवून आणलेल्या दंगलींवरून आपल्या लक्षात आले असेल. महाराष्ट्रात दंगेधोपे करून जातीधर्मांमध्ये संघर्ष वाढीला लावायचा, निरपराध लोकांच्या हत्या घडवून आणायच्या आणि मग महाराष्ट्रात कायदा व सुव्यवस्था राहिलेली नाही असा बोभाटा करून राज्यातले लोकशाहीमार्गाने निवडून आलेले सरकार बरखास्त करा व राष्ट्रपती राजवट लागू करा अशी बोंब मारण्याचा कावेबाज डाव भाजप नेते आखत आहेत. पण त्यांच्या या कटू कारस्थानांना जनता कदापिही भीक घालणार नाही हे त्यांनी पक्के ध्यानात ठेवावे. केंद्रातील सत्तेचा दुरूपयोग करून महाविकास आघाडीमधील नेत्यांना सळो की पळो करून सोडण्याचा डावही आता जनतेच्या लक्षात आला आहे. सीबीआय, ईडी व केंद्र सरकारच्या अखत्यारीतील यंत्रणांचा वापर करून व अधिकाऱ्यांना मनमानी काम करायला लावून देशातही लोकशाही व व्यक्तींचे स्वातंत्र्य यावर भरदिवसा दरोडे घालून मनमानी पद्धतीने कारभार केंद्र सरकारने चालविला आहे. पण सत्याचा विजय अंतिम असतो. जनतेची सामुदायिक ताकद सर्वश्रेष्ठ असते. त्यामुळे फारकाळ जनतेला केंद्र सरकार दाबून ठेवून त्यांची मुस्कटदाबी करू शकणार नाही. तापलेल्या बॉयलरचा सेफ्टी व्हॉल्व जर बराच काळ बंद केला तर अखेरीस त्याचाही स्फोट होतो हा नियम भाजप नेत्यांना बहुतेक माहित नसावा. आता हा होण्याची वेळ आली आहे. आगामी काळात पाच राज्यात ज्या विधानसभा निवडणुका होताहेत त्यावेळी हा स्फोट निश्चित होईल!

त्याची पहिली झलक ५ डिसेंबर २०२२ ला आपल्या सर्वांना पाहायला मिळाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे पंजाब राज्यातील फिरोजपूर येथे सभेला जाऊन ६४ हजार कोटी रुपयांच्या विविध प्रकल्पांचे उद्घाटन करणार होते. पण पंजाबमधील शेतकऱ्यांनी जो रास्ता रोको केला त्यामुळे वीस मिनिटे रस्त्यातल्या पुलावरच पंतप्रधानांना अडकून पडावे लागले. सभेला माणसेही फारशी जमली नाहीत. बहुतांश खुर्च्या मोकळ्याच होत्या. त्यामुळे अखेरीस पंतप्रधान मोदी यांना सभा न करता निम्म्या वाटेतूनच परत जावे लागले. अशी बेअब्रू आजपर्यंत कधीही कोणत्याही पंतप्रधानाची झालेली नाही. शेतकऱ्यांच्या मनांत मोदींच्याबद्दल किती राग आणि अनादर आहे हे यावरून आपल्या लक्षांत येईल. तापलेल्या बॉयलरचा स्फोट होतो तो असा!

प्रबंध संपादकीय



# नवा 'शक्ती' कायदा महिलांचे संरक्षण करेल

महाविकास आघाडी सरकारने नुकत्याच झालेल्या विधीमंडळाच्या अधिवेशनात महिला सुरक्षेच्या दिशेने आणखी एक पाऊल टाकीत 'शक्ती' विधेयक एकमताने मंजूर केले आहे आणि राज्यपालांनी त्यावर स्वाक्षरी केल्यामुळे त्या विधेयकाचे आता कायद्यात रूपांतर झाले आहे. बलात्काराच्या गुन्ह्यात फाशीची शिक्षा आणि ॲसिड हल्लेखोराला १५ वर्षांच्या कारावासाच्या शिक्षेची तरतूद असणाऱ्या या विधेयकामुळे महिलांना नवी 'शक्ती' मिळाली असून, या कायद्याच्या वचकाने महिला अत्याचाराला आळा बसण्यास हातभार लागणार आहे. कायद्याने गुन्हेगारीचा पूर्ण बंदोबस्त करता येत नाही आणि केवळ कायदा केला म्हणून समाज सुधारला आहे असेही होत नाही याची मला जाणीव आहे. मी स्वतः 'कायदा' (लॉ) या विषयाचा पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण केलेला आहे. त्यामुळे कायदा काय असतो आणि त्याचे महत्व किती असते व त्याची अंमलबजावणी कशी करावयाची याची मला पुरेपूर जाणीव आहे. कायद्यात त्रुटी वा पळवाटा राहिल्या तर गुन्हेगार कसे सुटतात याबाबतची असंख्य उदाहरणे तुमच्याप्रमाणे मलाही माहिती आहेत. त्यामुळे महिलांच्या संरक्षणासाठी नवा 'शक्ती' कायदा करताना अनेक तज्ज्ञ व जाणकारांच्या अनुभवांचे सार एकत्रित करून अत्यंत बिनचूक व परिपूर्ण कायदा कसा तयार होईल हे पाहिले गेले आहे. हा कायदा मजबूत करण्यासाठी महाविकास आघाडी सरकारने श्री. अनिल देशमुख हे गृहमंत्री असताना एक संयुक्त समिती नेमली होती. या समितीने वर्षभरात १३ बैठका घेऊन सखोल व सविस्तर चर्चा केली. इतकेच नव्हे तर वर्तमानपत्रात जाहिरात देऊन सर्वसामान्यांच्या याबाबत सूचना मागविल्या. प्रशासकीय अधिकारी व महिला संघटनांशी चर्चा करून हा कायदा तयार केला.

कायदा कठोर करण्यासोबतच या कायद्यामुळे कुणावरही अन्याय होणार नाही याचीही काळजी घेण्यात आली आहे. कायदा तयार होणे ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. परिस्थितीनुरूप कायद्यात बदलही होत जातात. समाजात महिलांवर अत्याचार होत असताना किंवा त्यात वाढ होत असताना सरकार केवळ बघ्याची भूमिका घेऊ शकत नाही. या अत्याचारांचा पूर्ण बिमोड करण्याच्या दृष्टीने विचार करून तशी पाऊले सरकारला कठोरपणे टाकावी लागतात तरच राज्यात कायदा व सुव्यवस्था टिकून आहे असे म्हणता येते. केवळ तपासात त्रुटी राहिल्या म्हणून किंवा तांत्रिक बाबींमुळे एखादा दुष्कृत्य केलेला आरोपी सुटत असेल तर हे न्यायाच्या दृष्टीने बरोबर होणार नाही.

महिलांवर आणि विशेषतः तरूण युवती व विद्यार्थिनींवर ॲसिड फेकण्याच्या घटनाही वारंवार घडताना दिसून येत आहेत. ॲसिडमुळे मुलींचे आयुष्य उध्वस्त होऊ शकते. चेहरा विद्रूप होतो. ॲसिड फेकण्याच्या घटना या प्रेमभंग प्रकरणातून किंवा एकतर्फी प्रेमातून घडण्याची शक्यता असते. ॲसिड फेकणाऱ्या व्यक्तीला आता आजन्म कारावास किंवा १५ वर्षे तुरूंगात राहण्याची आणि तसेच आर्थिक दंडाचीही तरतूद करण्यात आली आहे. ॲसिड हल्ल्यातील पिडीतेला वैद्यकीय उपचार तसेच प्लॅस्टिक सर्जरी करण्यासाठी जो खर्च येईल त्याची तरतूद या दंडाच्या रकमेतून करण्यात आली आहे. लैंगिक गुन्ह्यांचे प्रमाणही हल्ली खूप वाढताना दिसते आहे. या गुन्ह्यासंदर्भात खोटी तक्रार केली किंवा एखाद्या व्यक्तीला जाणूनबुजून त्रास दिल्यास त्याला जामीन मिळणार नाही अशी व्यवस्था नवीन कायद्यात करण्यात आली आहे. एवढेच नव्हे तर खोटी तक्रार केल्यास किंवा खोटी माहिती दिल्यास तक्रारदार व्यक्तीस कमीत कमी एक वर्ष किंवा जास्तीत जास्त तीन वर्षे तुरूंगवास तसेच एक लाख रूपयांपर्यंत एवढ्या दंडाची तरतूद या कायद्यात करण्यात आली आहे. या विधेयकात शिक्षेच्या कक्षेत पुरूषांबरोबरच महिला आणि तृतीयपंथी यांनाही आणले गेले आहे.

महिलांवरील अन्यायाची त्वरित दखल घेतली जावी म्हणून महाविकास आघाडीने राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्ष सौ. रुपालीताई चाकणकर यांची 'राज्य महिला आयोगा'च्या अध्यक्षपदी नेमणूक केली आहे. त्याही महिला अत्याचाराची प्रकरणे वेगाने धसाला लावत आहेत. मुंबईच्या महापौरासंबंधी भाजपच्या एका वरिष्ठ नेत्याने नुकतेच असभ्य भाषेत काही शब्द उच्चारले होते. याबाबत महापौरांनी पोलिसात तक्रारही नोंदविली. त्यानंतर भाजपच्या नेत्याने माफी मागितली. यापूर्वीही भाजपच्या अनेक राज्य व राष्ट्रीय पातळीवरील नेत्यांनी महिलांबाबत असभ्य व अश्लील उद्गार काढले होते. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. शरद पवार साहेब यांनी 'नेमकचि बोलणें' या ग्रंथ प्रकाशन समारंभात महिलांना असा संदेश दिला आहे की कुठलाही अन्याय व अत्याचार सहन करू नका. त्याचा संघटितरित्या प्रतिकार करा. प्रतिकार केल्यानंतर समोरचा अन्याय व अत्याचार करणारा माणूस कितीही मोठा असला तरी तो कसा नमू शकतो हे आपण पाहिले आहे. तेव्हा आता महिलांनी मूकपणे अन्याय सहन करायचा नाही. त्यासाठीच महाविकास आघाडीने महिलांना महा 'शक्ती' दिली आहे. आपल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनीदेखील या कायद्याबाबतची माहिती व ज्ञान जनतेमध्ये प्रसारीत केले पाहिजे.

संपादकीय



# एकाधिकारशाहीकडे देशाची वाटचाल व २०२२ मधील आव्हाने

अनिश्चिततेची छाया बरोबर घेऊनच २०२२ मध्ये आपला प्रवेश झाला आहे. करोनाचे संकट पूर्णत्वाने दूर होण्याऐवजी त्या विषाणूची 'ऑमिक्रॉन' नावाची नवी आवृत्ती लोकांना ग्रासू लागली आहे. तूर्तास या आवृत्तीचा त्रास हा सौम्य स्वरुपाचा असल्याचे निदान केले जात आहे. किंवा याआधीच्या दुसऱ्या लाटेत कहर माजविलेल्या 'डेल्टा' इतका तो जीवघेणा नसल्याचे प्राथमिक दृष्ट्या मानले जात असले तरी त्यामध्ये खात्रीशीरपणा नाही. लसीकरणाचे दोन डोस पूर्ण केलेल्यांना देखील करोना आणि ऑमिक्रॉनची बाधा होत असल्याची प्रकरणे रोजच्या रोज घडत आहेत. त्यामुळे लसीकरणाच्या खात्रीशीरपणाबद्दल प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. लसीकरणामुळे करोनाच्या बदलत्या आवृत्त्यांचा त्रास फारसा गंभीर राहणार नाही एवढाच दिलासा तूर्तास वैद्यकीय तज्ज्ञांकडून दिला जात आहे. यामुळे संपूर्णपणे खात्रीशीर आणि निर्णायक अशा लसीसाठी लोकांना प्रतीक्षा करावी लागणार आहे. तोपर्यंत प्रयोगांद्वारेच या विषाणूचा मुकाबला मानवजातीला करावा लागणार आहे. करोना विषाणूच्या नव्यानव्या प्रकारांना म्हणजेच आवृत्त्यांना तोंड देताना मानवजातीची दमछाक होताना आढळत आहे. त्याचे प्रतिबिंब जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात दिसून येत आहे आणि त्यामुळेच या सार्वत्रिक अनिश्चिततेचा मुकाबला करीतच २०२२ या वर्षाला सामोरे जावे लागणार आहे.




२०२२ हे वर्ष घडामोडींनी भरलेले राहील. करोना व त्याच्याशी निगडित घडामोडी अपरिहार्य असतील.जानेवारी महिना संपतानाच फेब्रुवारी महिन्याच्या पहिल्या दिवशी २०२२-२३साठीचा अर्थसंकल्प सादर करण्यात येईल. अर्थसंकल्पी अधिवेशनाच्या काळातच उत्तर प्रदेश, पंजाब, उत्तराखंड, गोवा आणि मणिपूर या पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुका होणे अपेक्षित आहे. त्यानंतर लगेचच दोन तीन महिन्यात म्हणजे जुलैमध्ये राष्ट्रपतिपद तर ऑगस्टमध्ये उपराष्ट्रपतिपद या दोन महत्वपूर्ण निवडणुका होणे अपेक्षित आहे. वर्षाच्या अखेरीला हिमाचल प्रदेश व गुजरात या दोन राज्यांमधील विधानसभा निवडणुका असतील. याखेरीज अचानक घडणाऱ्या घडामोडीही असतीलच. या सर्व अपेक्षित बाबींच्या पार्श्वभूमीवरच वर्षाचा संभाव्य आढावा घ्यावा लागेल. सर्वात महत्वाचे म्हणजे स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षाच्या निमित्ताने आयोजित घटनांचाही मागोवा घ्यावा लागेल. या वर्षाच्या अखेरीपर्यंत नवीन संसदगृहाची उभारणी पूर्ण होणे अपेक्षित आहे. कदाचित वर्षाच्या शेवटचे हिवाळी अधिवेशन त्या नव्या संसदगृहात घेतले जाण्याचीही शक्यता आहे. हा वादग्रस्त 'सेंट्रल व्हिस्टा' प्रकल्पाचा भाग आहे. विरोध झुगारून ते काम सुरु आहे. थोडक्यात २०२२ हे घडामोडींनी भरलेले वर्ष राहणार आहे हे निःशंक !

वर्षाची सुरुवात अर्थसंकल्पाने होईल असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. अर्थसंकल्पाची पूर्वतयारी सुरु करण्यात आली आहे. अर्थमंत्री आणि साक्षात पंतप्रधानांनीही यासंदर्भात काही बैठका केल्या आहेत. अर्थमंत्र्यांनी परंपरेप्रमाणे कृषि व शेतीशी निगडित शेतकरी प्रतिनिधी व तज्ज्ञांबरोबर चर्चा करुन या तयारीला प्रारंभ केला. पंतप्रधानांना उद्योगांमध्ये अधिक रस असल्याने त्यांनी उद्योगक्षेत्रातील अग्रगण्य प्रतिनिधींबरोबर बैठका केल्या. या बैठकांमध्ये प्रामुख्याने आगामी

अर्थसंकल्पात त्या क्षेत्रांना काय अपेक्षित आहे याची चाचपणी करण्यात आली. खरेतर शेतकरी प्रतिनिधींबरोबरच्या चर्चेला विशेष महत्व अपेक्षित होते परंतु ते दिले गेले नाही. विशेषतः वर्षभर चाललेले शेतकरी आंदोलन, ज्या तीन वादग्रस्त शेतीविषयक कायद्यांच्या विरोधात ते झाले ते मागे घेण्याचा निर्णय, या पार्श्वभूमीवर सरकारचे आगामी अर्थसंकल्पातील शेतीविषयक धोरण काय असेल याची अपेक्षा केली जात होती. परंतु तसे काही घडले नाही. याचे कारण किमान आधारभूत किमतीच्या धोरणाला कायदेशीर स्वरुप देण्याची व तसा कायदा संसदेत करण्याची आंदोलनकारी शेतकऱ्यांची मागणी होती व ती अद्याप मान्य झालेली नसल्याने सरकारची त्यावरील भूमिका अर्थसंकल्पात अपेक्षित राहील. तीन शेतीविषयक कायद्यांच्या संदर्भात अर्थसंकल्पीय भाषणातच अर्थमंत्र्यांकडून उल्लेख झालेला होता.




सेंट्रल व्हिस्टा प्रकल्प

परंतु हे कायदे परिस्थितीवश मागे घेण्यास भाग पडल्यानंतर सरकारने बहुधा शेतीच्या क्षेत्राबाबत थंडे धोरण स्वीकारलेले आढळते. त्यामुळेच कायदे रद्द करुन शेतकऱ्यांची मुख्य मागणी मान्य केली असली तरी बाकीच्या मागण्यांबाबत सरकार मौनच बाळगून आहे. म्हणूनच यासंदर्भात अर्थमंत्री त्यांच्या अर्थसंकल्पीय भाषणात काही घोषणा करतात काय याकडे शेतीक्षेत्राचे लक्ष लागलेले असेल.

अर्थव्यवस्था सावरली जाण्याची प्रक्रिया सुरु झाल्याचा दावा केला जात आहे. त्याचे स्वागतच करावे लागेल. करोना विषाणूचा डंख केवळ लोकांना झाला नव्हता तर अर्थव्यवस्थेलाही त्याने अप्रत्यक्षपणे जर्जर करुन टाकले होते. करोनाच्या मुकाबल्यासाठी करण्यात आलेल्या राष्ट्रीय टाळेबंदीमुळे अर्थव्यवस्थेचा विकासदर शून्याखाली किंवा नकारात्मक झालेला होता. 'उणे तेवीस टक्क्यां'पर्यंत अर्थव्यवस्था खाली घसरलेली होती. २०२० मध्ये करोनाच्या दुसऱ्या लाटेचाही तिला तडाखा बसला परंतु तो पचवून अर्थव्यवस्था सावरण्याची प्रक्रिया सुरु झाली. ती सुरुच आहे. त्यामुळे अर्थव्यवस्था पूर्णपणे सावरली आहे हा दावा चुकीचा ठरेल. परंतु आता हळूहळू सावरण्याची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे हा त्यातल्यात्यात दिलासा आहे. त्यामुळे नकारात्मक टक्केवारी प्रथम पार करणे आणि त्यानंतर वास्तव विकासवाढ सुरु होणे ही आव्हाने अर्थव्यवस्थेपुढे आहेत. करोनाच्या आक्रमणामुळे जागतिक अर्थव्यवस्थेतच 'आर्थिक स्वसंरक्षणवाद' सुरु झालेला आढळतो. अमेरिकेसारख्या महासत्तेनेही याचा अवलंब केलेला आढळतो व त्यामुळे भारतही त्याला अपवाद असण्याची अपेक्षा नाही. त्यामुळेच पंतप्रधानांनी करोना काळातच आत्मनिर्भर भारतासाठी सर्वांना हाक दिली. एकप्रकारे जागतिकीकरणाच्या मूलभूत भूमिकेशी हे काहीसे विसंगत ठरले पण करोनामुळे जगातल्या प्रमुख अर्थव्यवस्था बंदिस्त होऊ लागल्यानंतर अन्य पर्याय उरला नसल्यानेच आत्मनिर्भरतेचा मंत्र जपण्यास सुरुवात झाली. अर्थात हे एक स्थूल चित्र आहे. त्याला जागतिक संदर्भ आहेत. भारतातील वर्तमान आर्थिक परिस्थितीचा आढावाही तेवढाच महत्वाचा आहे.

नुकताच भारतातील सणासुदीचा काळ किंवा हंगाम संपला. नवरात्री व दसऱ्यापासून दिवाळी आणि मग वर्षाअखेरीला होणाऱ्या नववर्ष स्वागतापर्यंत तो चालू राहतो. या काळात ग्राहक बाजारात जाऊन खरेदी करतो. त्यामुळे अर्थव्यवस्थेत आर्थिक चलती निर्माण होते. हा एकप्रकारचा अर्थव्यवस्थेला आलेला उभार असतो. तसा प्रकार आताही घडला. गेल्या वर्षी म्हणजे २०२० मध्ये करोनाचे संकट अधिक गडद असल्याने असा उभार देखील आलेला नव्हता. परंतु दुसऱ्या लाटेनंतर सप्टेंबर २०२१ पर्यंत परिस्थिती बरीचशी सुरळीत झालेली होती. त्यानंतर लगेचच सणासुदीचा काळ आला आणि वर उल्लेख केल्याप्रमाणे आर्थिक उभार येण्याची स्थिती निर्माण झाली. खरेदीदारांमुळे खपात वाढ झाली आणि




**वेगवेगळ्या राज्यातील गरिबीचे प्रमाण दर्शविणारी टक्केवारी**

त्या मालिकेतच उत्पादनालाही चालना मिळाली. ही स्थिती पुढचे दोन महिने चालू राहिली पण त्यानंतर पुन्हा एकदा हा आलेला उभार सपाटीकडे जात असल्याचे आकडेवारीवरुन दिसून येत आहे. अर्थव्यवस्थेची ही उभारी देखील प्रामुख्याने तेल किंवा इंधन, खाद्यवस्तु, कपडेलत्ते आणि तत्सम प्राथमिक गरजांच्या वस्तुंच्या खरेदीत दिसून आली. ग्राहकोपयोगी वस्तुंच्या खरेदीतही फार तेजी आढळून आली नाही. प्रत्यक्ष आकडेवारीच्या जंजाळात न जाता एवढेच नमूद करावे लागेल की ऑक्टोबर व नोव्हेंबर महिने अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने चांगले ठरले. परंतु वर उल्लेख केल्याप्रमाणे ग्राहकोपयोगी वस्तुंचा खप मात्र पाऊण टक्क्यांनी कमी झालेला आढळला. म्हणजेच ग्राहकांनी वस्तु खरेदीपेक्षा त्यांच्या प्राथमिक गरजेच्या वस्तुंवर पैसे खर्च केलेले आढळतात हा उपलब्ध आकडेवारीचा अर्थ आहे. म्हणजेच ग्राहकांच्या मनात अजुनही बाजार आणि एकंदरीतच आर्थिक परिस्थितीबाबत खात्री राहिलेली नसल्याने ते खरेदीबाबत कमालीची सावधगिरी बाळगताना आढळत आहेत. पूर्वीप्रमाणे सहजपणे बाजारात जाऊन चटकन एखादी वस्तु खरेदी करण्याची जी प्रवृत्ती होती व त्यामुळे बाजारपेठ सतत गतिमान रहात असे ती स्थिती आता राहिलेली नाही असा याचा अर्थ आहे.

ग्राहकांच्या मनातील ही अनिश्चितता अर्थव्यवस्थेला फारशी तारक नाही. अर्थतज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार गुंतवणूक, खप आणि मागणी या तिन्ही आघाड्यांवर उठाव आढळून येत नाही आणि त्यामुळे येत्या काही महिन्यातच औद्योगिक वाढही मंदावलेली आढळेल असे भाकित त्यांनी केले आहे. अपेक्षित गुंतवणुकीपैकी केवळ तीस टक्के गुंतवणूकच अद्याप होऊ शकलेली आहे. याचा अर्थ सत्तर टक्के तूट गुंतवणुकीच्या पातळीवर झाली आहे. सोप्या भाषेत सांगायचे झाल्यास अर्थव्यवस्था करोनाकाळातून सावरु लागलेली आहे. परंतु राज्यकर्ते ज्या पध्दतीने छाती पिटून आता जणू काही सर्व स्थिती पूर्ववत झाल्याचा आव आणत आहेत किंवा तसा गाजावाजा करीत आहेत तशी स्थिती नाही. तशी स्थिती येण्यासाठी आणखी काहीकाळ वाट पहावी लागेल आणि मुख्य म्हणजे करोनावर निर्णायक विजय मिळवावा लागेल.

चलनवाढ, महागाई आणि बेकारी या तीन समस्यांनी पिच्छा सोडलेला नाही. त्यामुळे अशा अनिश्चित परिस्थितीत अर्थमंत्री त्यांच्या अर्थसंकल्पाद्वारे सामान्यजनांना काही दिलासा देणार काय असे प्रश्नचिन्ह सर्वांपुढे कायम आहे. राजकारणाच्या आघाडीवरही अनेक घडामोडी अपेक्षित आहेत. मार्च-एप्रिल महिन्यात उत्तर प्रदेश, उत्तराखंड, पंजाब,



**दारिद्र्य उत्तर प्रदेशातले**

गोवा व मणिपूर या पाच राज्यातील विधानसभा निवडणुका होणे अपेक्षित आहे. 'अपेक्षित' म्हणण्याचे कारण ऑमिक्रॉन विषाणूचे आक्रमण कितपत गंभीर होणार आहे याची कल्पना अद्याप आलेली नाही. अलाहाबाद उच्च न्यायालयाने तर निवडणूक प्रचारसभांवर बंदी आणि निवडणुका पुढे ढकलण्याची शिफारस केलेली आहे. पंतप्रधानांनी अचानकपणे टीव्हीच्या पडद्यावर अवतीर्ण होऊन १५ ते १८ वर्षे वयोगटातील मुलांना लसीकरणाची घोषणा केलेली आहे. त्याचबरोबर ऑमिक्रॉनच्या संदर्भात त्यांनी खबरदारीचा

इशाराही सर्वांना दिलेला आहे. त्यांनी ज्या प्रकारे भाषण केले ते पाहता या विषाणूबद्दल लोकांच्या मनात भय निर्माण झाल्याखेरीज राहणार नाही. या गोष्टी लक्षात घेऊनच आता या पाच राज्यातल्या विधानसभा निवडणुका पुढे ढकलण्याचा त्यांना विचार तर नसावा अशी शंका आल्याखेरीज रहात नाही.

अर्थसंकल्प, संसदेचे अर्थसंकल्पी अधिवेशन, वर



युपी निवडणुकीतले नेते

उल्लेखित पाच राज्यांच्या निवडणुका, त्यानंतर राष्ट्रपति–उपराष्ट्पतिपदासाठी होणाऱ्या निवडणुका, स्वातंत्र्याची पंच्याहत्तरी आणि वर्षाच्या अखेरीला होणाऱ्या गुजरात व हिमाचल प्रदेशाच्या विधानसभा निवडणुका या प्रत्यक्षातील घडामोडी असतील. परंतु त्यापलीकडे देशाच्या राजकारणाचा बदलता स्वर व भाषा ही अधिक चिंतेची बाब आहे. संपूर्ण भारतात आपल्याच पक्षाचा एकछत्री अंमल निर्माण करणे आणि विरोधी पक्षांचे अस्तित्वच नष्ट करण्याच्या पिपासेने पछाडलेले राजकारण खेळले जात आहे ते अधिक चिंताजनक आहे. एकीकडे विरोधाचा स्वर दाबून टाकणे आणि दुसरीकडे सत्ता व अधिकारांचे काही मूठभर लोकांच्या हातात केंद्रीकरण करण्याचे पध्दतशीर प्रयत्न सुरु आहेत. मूठभरांच्या हाती सत्ता एकवटण्याची अनेक उदाहरणे समोर येऊ लागली आहेत. त्याचाच भाग म्हणून संसदीय लोकशाहीचा आधार असलेल्या प्रातिनिधिक संस्थांना कमजोर व दुर्बळ करण्याचे प्रयत्न सुरु आहेत. अत्यंत योजनाबध्द रीतीने हे काम सुरु आहे. यासाठी बहुसंख्यकवाद, देशभक्ति व राष्ट्रवादाचा उद्घोष आणि विवेकाचा आवाज उठविणाऱ्यांना तत्काळ देशविरोधी ठरवून त्यांना नामोहरम व नेस्तनाबूत करण्याचे प्रकारही राजरोस सुरु झाले आहेत. चिंता उत्पन्न करणारी ही स्थिती आहे आणि येत्या काळात ती अधिकाधिक गंभीर होत जाणार आहे हे स्पष्ट आणि निश्चित आहे. अल्पसंख्यक समाजावर उघड हल्ले होऊ लागले आहेत. त्याबद्दल कडक कारवाई करण्याऐवजी राज्यकर्त्यांकडून मौन पाळून त्यास मूक पाठिंबाच दिला जात आहे आणि या मोकाट हल्लेखोरांना शासन होण्याऐवजी राजाश्रय मिळताना आढळत आहे. हे चित्र अधिक धोकादायक आणि चिंताजनक आहे. भारताच्या विविधतेवर तो आघात आहे आणि विविध संस्कृति, विविध भाषा, धर्म यांचे वैविध्य संपवून एकांगी, एकसुरी सामाजिक व्यवस्था प्रस्थापित करण्याचे प्रयत्न सुरु आहेत.

पाच राज्यात विधानसभा निवडणुका अपेक्षित आहेत. उत्तर प्रदेशात विजय मिळविण्यासाठी कोणत्याही थराला जाण्याची तयारी सत्तापक्षाने केलेली आढळते. त्यासाठी साधनसंपत्तीचा बेसुमार वापर सुरु आहे. उत्तर प्रदेश सरकार कसे महान आहे हे सांगणाऱ्या जाहिरातींचा पाऊस वृत्तपत्रे, इलेक्ट्रॉनिक माध्यमांवर पाडला जात आहे. या सर्व उत्तर प्रदेश सरकारच्या जाहिराती आहेत. त्यामुळे हा पैसा सरकारी तिजोरीतून येत असणार हे स्पष्ट आहे. याचाच अर्थ जनतेकडून कररुपाने मिळविलेल्या पैशाची मोकाट उधळण जाहिरातींच्या रुपाने केली जात आहे. यामुळे माध्यमांना जवळपास विकत घेण्याचाच प्रकार चालू आहे व त्यामुळे उत्तर प्रदेशातील अनागोंदीच्या बातम्याही दडपण्यात राज्यकर्त्यांना यश मिळत आहे. योगीराज आदित्यनाथ यांच्या गेल्या पाच वर्षांच्या कारकिर्दीत उत्तर प्रदेश म्हणजे जणूकाही नंदनवन व स्वर्ग झाल्याच्या थाटात विश्वप्रिय ब्रह्मांडनायक भाषणे देत हिंडत आहेत. प्रत्यक्षात सरकारचीच संस्था असलेल्या नीती आयोगाच्या दोन ताज्या अहवालांमध्ये उत्तर प्रदेशाचे खरे चित्र स्पष्ट झाले आहे. गरीबी व निर्धनता यासंदर्भातील अहवालात उत्तर प्रदेश तिसऱ्या क्रमांकावर आहे. त्यानंतर अगदी ताज्या आरोग्यविषयक अहवालात नीती आयोगाने देशातील राज्यांना आरोग्य निर्देशांकावर आधारित क्रम दिले आहेत. त्यात लागोपाठ चौथ्या वर्षी केरळ प्रथम क्रमांकावर आहे आणि शेवटच्या क्रमांकावर कोण आहे ओळखा? योगी महाराज आणि विश्वप्रियांचा(ते सध्या वाराणसीचे प्रतिनिधित्व करतात ना) उत्तर प्रदेश ! लसीकरण आणि इतर सर्व क्षेत्रात उत्तर प्रदेश प्रथम क्रमांकावर असल्याचा धादांत खोटा प्रचार बिनदिक्कतपणे कोणतीही लज्जा न बाळगता सुरु आहे. हे दोन पुरावे उत्तर प्रदेशाची लक्तरे दाखविण्यासाठी पुरेशी आहेत. परंतु ही बातमी पाळीव व लाचार माध्यमांनी

फारशा ठळकपणे प्रसिध्द न करुन त्यांची स्वामीनिष्ठा प्रकट केली. अशी अनेक उदाहरणे आहेत परंतु ही झलक किंवा या नमुन्यावरुन कल्पना यावी. उत्तर प्रदेशातील सामान्यजनांमध्ये असलेला असंतोष आणि तीव्र नाराजी आणि खुद्द भाजपमध्ये असलेली नाराजी यांचे बिंग बाहेर फुटू नये यासाठी प्रचाराचाच गाजावाजा एवढ्या प्रचंड प्रमाणात करायचा की त्यात या गोष्टी दबल्या जाव्यात असा प्रकार सुरु आहे.

पाच राज्यांच्या निवडणुकांच्या हालचाली सुरु असतानाच अशी एक घटना घडली ज्यामुळे निवडणूक आयोगाच्या निःपक्षपातीपणाबाबत शंका निर्माण व्हावी ! ही घटना सांगण्यापूर्वी निवडणूक आयोग आणि निवडणूक आयुक्तांचे स्थान याबाबत माहिती घेणे आवश्यक आहे. निवडणूक आयोग ही घटनात्मक संस्था आहे. निवडणुकांचे सर्वाधिकार या संस्थेला आहेत आणि त्यामुळेच ती स्वायत्त संस्था आहे. तिच्या कारभारात सरकारही हस्तक्षेप करु शकत नाही. आयोगाचे स्थान हे स्वतंत्रच राखण्यात आले आहे. परंतु वर्तमान राज्यकर्त्यांमध्ये सत्ता अशी काही भिनली आहे की त्या कैफातच पंतप्रधान कार्यालयातील प्रधान सचिवांनी थेट निवडणूक आयुक्तांनाच बैठकीसाठी पाचारण करण्याचे फर्मान जारी केले. निवडणूक आयुक्तांनी त्याबद्दल तीव्र नापसंती व्यक्त करुनच अशा प्रकारे ते निवडणूक आयुक्तांना बैठकीला बोलावू शकत नाहीत असे राजशिष्टाचारानुसार त्यांच्या निदर्शनास आणून दिले. तेवढ्यापुरती प्रधान सचिवांनी माघार घेतली. परंतु नंतर अनौपचारिक बैठकीच्या नावाखाली निवडणूक आयुक्त हे त्या बैठकीला गेले. घटनात्मक संस्थांची एवढी घसरण गेल्या सत्तर वर्षात अनुभवाला आली नव्हती ती गेल्या सात वर्षात पाहण्यास मिळत आहे. परंतु या एका प्रसंगाने निवडणूक आयोगाच्या विश्वासार्हतेवर तसेच निःपक्षतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे हे निश्चित. घटनात्मक संस्था किंवा लोकशाही संस्था असोत सरकारकडून त्यांच्या अस्तित्वावर सतत हल्ले चालू आहेत. त्यांचे महत्व कमी करण्याचे प्रयत्न चालू आहेत. निवडणूक आयोगासारख्या स्वतंत्र-स्वायत्त व घटनेचे संरक्षण लाभलेल्या संस्थेलाही सरकारकडून दुय्यम लेखण्याचा हा प्रकार निरंकुशतेचा आहे.

'किमान सरकार व कमाल राज्यकारभार'(मिनिमम गव्हर्नमेंट मॅक्झिमम गव्हर्नन्स) अशी बढाईखोर उक्ति वर्तमान राज्यकर्त्यांच्या सतत मुखात असते. परंतु तो देखील लज्जाहीनतेचा किंवा कोडगेपणाचा एक आविष्कार आहे. वास्तव बरोबर उलटे आहे. सरकारची कृति आणि उक्ति एकमेकाशी पूर्णपणे विसंगत आहे. पूर्वीची उदाहरणे अनेक आहेत. परंतु अगदी ताजी उदाहरणे पाहू. मतदारांची ओळखपत्रे आधार कार्डाशी जोडण्याची सरकारची योजना हा सरळसरळ नागरिकांच्या खासगीपणावर किंवा व्यक्तिगततेवर आक्रमणाचा प्रकार आहे. हा झाला सर्वसामान्य नागरिकांशी संबंधित प्रकार. परंतु सीबीआय, आयबी(इंटेलिजन्स ब्यूरो), ईडी यासारख्या तपाससंस्थांच्या सरसंचालकांच्या मुदतवाढीचे (पाच वर्षांपर्यंत) अधिकार सरकारने स्वतःकडे घेण्याचा प्रकार हाही केंद्रीकरणाचाच प्रकार आहे. दुसरीकडे अनिर्बंध खासगीकरण करण्यामागील हेतु देखील सरकारची त्यांच्यावरील पकड कायम ठेवण्याच्या हेतुनेच आहे. कारण विविध क्षेत्रांसाठी स्थापन होणाऱ्या नियामक संस्था या सरकार नियंत्रितच असल्याने खासगीकरणामुळे सरकारी पकड अधिक घट्ट करण्याचा हेतुच साध्य होणार आहे. थोडक्यात विविध माध्यमातून नागरिकांच्या जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात प्रवेश आणि हस्तक्षेप करुन सरकारची व्यापक पकड निर्माण करण्याचा हा डाव आहे. या सर्वाचा एकच अंतिम निष्कर्ष निघतो व तो म्हणजे भारताची वाटचाल आता लोकशाहीकडून सर्वंकष अशा एकाधिकारशाहीकडे सुरु झाली आहे. येणाऱ्या काळात सरकारचे हे अतिक्रमण अधिक व्यापक होत जाणार आहे हे निश्चित!

बिडेन आणि तालिबानी



आंतरराष्ट्रीय पातळीवर सध्या होत असलेल्या घडामोडीतून वर्तमान राज्यकर्त्यांना काहीसा धडा मिळाला असावा असे दिसून येते. अमेरिकेतील वर्तमान जो बिडेन प्रशासनाने भारतातील प्रचलित राजवटीबद्दलची प्रतिकूलता

आपल्या कृतीतून दाखवून दिली आहे. अमेरिका-ऑस्ट्रेलिया-जपान-भारत या 'क्वाड' नावाने स्थापन झालेल्या राष्ट्रगटामुळे भारतीय राज्यकर्ते मोहरुन गेले होते. परंतु बिडेन यांनी त्याला पर्यायी राष्ट्रगट 'ऑकस'(ऑस्ट्रेलिया, ब्रिटन व अमेरिका) स्थापन केला व भारताला त्यातून वगळले. भारतात प्रचलित राजवटीत मानवाधिकार, नागरी स्वातंत्र्ये आणि अल्पसंख्यक समाजाच्या विरोधातील असहिष्णु वातावरण या मुद्यांवर नाराजी प्रकट केलेली आहे. अफगाणिस्तानातून माघार घेताना बिडेन किंवा पूर्वी डोनाल्ड ट्रंप यांनी तालिबानबरोबर थेट वाटाघाटी करताना भारताला ढुंकूनही विचारले नव्हते व केवळ अमेरिकेच्या हिताला प्राधान्य दिले. तालिबानला अफगाणिस्तानचा ताबा घेण्यासाठी पूर्ण मदत केली. आता या सर्वावर कडी म्हणजे अलीकडेच लोकशाहीवर नुकत्याच घेतलेल्या परिषदेत अमेरिकेने पाकिस्तानला निमंत्रित केले आणि खऱ्या अर्थाने लोकशाही असलेल्या बांगला देशाला

तालिबानी नेते



बोलावले नाही. या परिषदेत भारताने भाग घेऊन आपला अमेरिकाधार्जिणेपणा सिध्द केला. चीनच्या विरोधात अमेरिका आपली साथ देईल या भ्रमात वर्तमान साहसवादी राज्यकर्ते राहिले आणि अमेरिकेने त्याबाबत कोणताही प्रतिसाद न देऊन भारताला एकाकी केले. अखेर परंपरागत मैत्री असलेल्या रशियाबरोबर तसेच मध्य आशियातील देशांबरोबर संबंध सुधारण्यास प्राधान्य देऊन भारतीय राज्यकर्त्यांना आता स्वतंत्र परराष्ट्रनीतीविषयक पावले टाकावी लागत आहेत. आता दक्षिण आशिया आणि भारतीय उपखंडातील संबंधांना प्राधान्य देतानाच या शेजारी राष्ट्रांसाठी अमेरिका पुरस्कृत धोरण चालविता येणार नाही आणि त्यांच्यासाठी स्वतंत्र आणि द्विपक्षीय आधारावरच संबंध ठेवावे लागतील याची जाणीव बहुधा राज्यकर्त्यांना झाली असावी त्यामुळेच आता तसे पुढाकार घेण्यास प्रारंभ करण्यात आला आहे. याच मालिकेत चीनबरोबर देखील समान व द्विपक्षीय पातळीवरच संबंध राखणे व टिकविणे याची जाणीव राज्यकर्त्यांना होऊ लागली असावी. त्यादृष्टीने आता कोणती पावले उचलली जातात हे आगामी काळात पहावे लागेल.

२०२२ हे अनेक अर्थाने महत्वाचे वर्ष असेल. स्वातंत्र्याचे अमृतमहोत्सवी वर्ष असल्याने त्याचे एक आगळेवेगळे महत्व अपेक्षित आहे. परंतु दुर्दैवाने करोनाचे गालबोट त्याला लागले आहे. स्वातंत्र्य भारताला मिळाले होते आणि सामान्य जनतेने आंदोलन व चळवळीच्या मार्गाने ते प्राप्त केले होते. दुर्दैवाचा भाग हा की ज्या मंडळींचा स्वातंत्र्यलढ्याशी दुरान्वयानेही संबंध नव्हता किंवा ज्यांनी त्यात सहभागही घेतलेला नव्हता ती मंडळी स्वातंत्र्यलढ्याच्या वारशावर हक्क सांगत आहेत व अग्रभागी येऊन मिरवत आहेत. ज्यांनी भारतीय राज्यघटनेला नावे ठेवली, राज्यघटना म्हणजे जगातल्या वेगवेगळ्या राज्यघटनांची 'गोधडी' आहे अशी तिची संभावना केली, महात्मा गांधींच्या अहिंसक आंदोलनाची अवहेलना केली अशी मंडळी आता या अमृतमहोत्सवाच्या आघाडीवर आहेत. विशेष म्हणजे स्वातंत्र्यलढ्याशी निगडित स्मृतिचिन्हे पुसण्याची मोठी योजनाच या मंडळींनी हाती घेतलेली आहे आणि त्या अंतर्गत पहिला आघात संसदेवर केला आहे. वर्तमान संसदगृह हे स्वातंत्र्यलढ्याशी निगडित राहिलेले आहे. परंतु आता त्याचे रुपांतर संग्रहालयात करुन त्याचे अस्तित्व इतिहासजमा करण्यात येणार आहे. नवे संसदगृह उभारण्यात येत आहे.त्याचबरोबर स्वातंत्र्यानंतर स्वतंत्र भारताचे सरकार स्थापन झाल्यानंतर त्या राज्यकर्त्यांनी ज्या नव्या स्वतंत्र भारताचे स्वप्न उराशी बाळगून संस्थांची निर्मिती केली त्यांची मोडतोडही केली जात आहे. त्या प्रकल्पाचे नाव 'सेंट्रल व्हिस्टा' आहे. करोनाचे संकट असूनही या प्रकल्पाचे काम अखंड अविरत चालू आहे. त्यासाठी पंचवीस ते तीसहजार कोटि रुपयांचा खर्च केला जात आहे. त्यासाठी या परिसरातील झाडांची बेछूटपणे तोडणी सुरु आहे. हे सर्व केवळ एकाच हेतुने सुरु आहे. स्वातंत्र्यलढ्याशी निगडित स्मृतिचिन्हे नष्ट करणे आणि त्यांच्या जागी स्वतःचा बडेजाव सांगणारी नवी चिन्हे उभारणे. याला लहरीपणा म्हणतात. ही वाटचाल सर्वंकष एकाधिकारशाहीकडे आहेच परंतु बहुसंख्यकवाद आणि बहुमताची हुकुमशाही निर्माण करण्याचा हा प्रकार आहे. २०२२ च्या निमित्ताने येणारी ही आव्हाने आहेत.

डॉ. सुधीर भोंगळे

**राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय खासदार श्री. शरदचंद्र पवार साहेब यांचा ८१ वा महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले**



वाढदिवसानिमित्त झालेल्या सत्काराला शरद पवार उत्तर देऊन व्हर्च्युअल रॅलीत मार्गदर्शन करताना व्यासपीठावर डावीकडून रुपाली चाकणकर, राजेश टोपे, नवाब मलिक, दिलीप वळसे पाटील, छगन भुजबळ, जयंत पाटील, प्रतिभाताई पवार, प्रफुल पटेल, रामराजे नाईक-निंबाळकर, अजित पवार, सुप्रिया सुळे, सुनील तटकरे, धनंजय मुंडे आणि जितेंद्र आव्हाड

# समाजाशी बांधिलकी जपणाराच

खरं म्हटलं तर आजचा हा कार्यक्रम हा मला गेल्या पाच-सहा दिवसांपर्यंत माहित नव्हता. जयंतरावांचा संदेश होता, की बैठक घेतोय आणि त्याला आपण यावं. तर त्यांना मी सांगितलं, की ठीक आहे १२ तारखेला मी इथं आहे. येऊन जाईन आणि इथं आल्याच्यानंतर लक्षामध्ये आलं, की हा पक्षापुरता सीमित कार्यक्रम दिसत नाही. हा कार्यक्रम वाढदिवसाच्यानिमित्तानं आयोजित केलेला आहे. वाढदिवस हा प्रत्येकाच्या वैयक्तिक जीवनामध्ये असतो. माझा वाढदिवस महाराष्ट्रात कधी केला नाही, असंही झालेलं नाही. मी ५० वर्षांचा झालो, त्यावेळीला नागपूरला सगळ्या सहकाऱ्यांनी पुढाकार घेतला आणि तो आयोजित केला. ६१ वर्षाचा झालो, तेव्हा छगन भुजबळ आणि बाकीच्या लोकांनी पुढाकार घेतला आणि वाजपेयींच्या उपस्थितीमध्ये तो याठिकाणी झाला. ७५ वर्षाचा झालो, त्यावेळी देशाचे राष्ट्रपती, देशाचे उपराष्ट्रपती, प्रधानमंत्री, सर्व केंद्रीय मंत्री, सर्व राजकीय पक्षाचे अध्यक्ष आणि पंधरा एक राज्यांचे मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीमध्ये हा कार्यक्रम त्याठिकाणी दिल्लीमध्ये केला.

पण, साधारणत: तुम्ही लक्षात घेतलं असेल, तर ५०, ६१ आणि ७५ या तीन एका विशिष्ट प्रसंगाच्या निमित्तानं हा वाढदिवस त्याठिकाणी आयोजित केला होता. पण ८१ किंवा ८२व्या वर्षी असा कार्यक्रम आयोजित करण्याची कल्पना माझ्या मनाला कधी पटली नव्हती. पण, पक्षाचा आदेश. अध्यक्षांनी निर्णय घेतला. तुम्ही सगळ्यांनी आयोजन केलं. मी आपल्या सगळ्यांचा अंत:करणापासून आभारी आहे, की या निमित्तानं महाराष्ट्रामध्ये आणि देशामध्ये आणखीन काम करण्याच्यासाठी तुम्ही सगळ्यांनी आजच्या दिवसाच्या निमित्तानं प्रोत्साहन दिलं. १२ डिसेंबर हा माझ्या आयुष्यातला एक महत्त्वाचा दिवस आहे आणि तो माझा जन्मदिवस आहे

**वाढदिवस व सहस्रचंद्र दर्शनानिमित्त मुंबईतील वरळीच्या नेहरू सेंटरमध्ये १२ डिसेंबर २०२१ रोजी होते. त्यावेळी सत्काराला उत्तर देताना शरद पवार यांनी केलेले हे भाषण.**



# राष्ट्रवादीचा खरा कार्यकर्ता

**शरद पवार**

म्हणून मी म्हणत नाही. १२ डिसेंबर हा माझ्या आईचाही जन्मदिवस आहे. म्हणजे काय गंमत असेल. माझ्या घरामध्ये १२ डिसेंबरचे तीन-चार लोकं आहेत. माझा एक पुतण्या, तोही १२ डिसेंबरचा, माझ्या बहिणीची मुलगी, तीही १२ डिसेंबर, आई १२ डिसेंबर, मी १२ डिसेंबर आणि पाठोपाठ १३ डिसेंबरही आलांय. काय योग असतो. पण हे घडलं ते खरं आहे.

आज खऱ्या अर्थानं काही गोष्टींच्या संदर्भातला निकाल आपल्याला घ्यायचांय. आपण एका विचारानं महाराष्ट्रात आणि देशात काम करतो. पक्ष लहान असेल, मर्यादित कार्यकर्ते असतील. पण बांधिलकी असलेले कार्यकर्ते हे राष्ट्रवादीचं वैशिष्ट्य आहे. आणि म्हणून आज जे असंख्य प्रश्न देशाच्यासमोर आहेत. सामान्य लोकांच्या समोर आहेत, त्याचं उत्तर शोधण्याच्यासाठी आणि त्याची सुटका करण्याच्यासाठी प्रभावीरितीनं काम करणं, पक्ष आणि त्या पक्षाचा कार्यकर्ता कोणता, तर लोकांनी हा निष्कर्ष काढला पाहिजे, की हा राष्ट्रवादीचाच कार्यकर्ता असू शकतो. त्या पद्धतीनं पक्षाची बांधणी करायची आहे. लहान घटकांना बरोबर घ्यायचंय.

मी महाराष्ट्रामध्ये फिरत असतो. आत्ताच प्रफुलभाईंनी सांगितलं. मला लोकांना भेटायला एक प्रकारचं मानसिक समाधान मिळतं. त्यांचं म्हणणं ऐकयचं असतं. अनेक ठिकाणी मी जातो. कधी मराठवाड्यामध्ये गेलो. तर मराठवाड्यामध्ये मला आठवतंय, की अनेकदा संध्याकाळ माझी औरंगाबादला मी लहान समाजातनं पुढं आलेल्या तरूणांच्याबरोबर संध्याकाळ घालवण्याच्यासाठी अनेकदा घालवलेली आहे. अनेकांना ऐकायला मिळतं. अलिकडच्या काळामध्ये नव्या पिढीमध्ये विचार करणारे, लिहिणारे फार मोठ्या प्रमाणावर लोक तयार झालेले दिसतात. सहजपणानं काहीतरी बोलून

जातात. मी कालच याच व्यासपीठावरनं एक लहानशी गोष्ट सांगितली. एक दिवशी मी औरंगाबादमध्ये होतो आणि औरंगाबादला संध्याकाळी माझ्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणं तिथं मिलिंद कॉलेज आहे, बाबासाहेब आंबेडकरांनी काढलेलं कॉलेज आहे, मराठवाडा शिक्षण मंडळ आहे, सरस्वती शिक्षण संस्था आहे आणि तिथं एक वैशिष्ट्य आहे, विशेषत: दलित या वर्गातील तरूण-तरूणी हे औरंगाबादला शिकायला येतात. कदाचित त्याचं कारण हे असण्याची शक्यता आहे, की तिथलं पहिलं महाविद्यालय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी काढलं आणि बाबासाहेबांनी काढलं त्यामुळं त्यासंबंधीची आस्था, आकर्षण लहान समाजातल्या घटकांच्या मुला-

मोतीलाल राठोड असावं. हा बंजारा समाजाचा कार्यकर्ता. ही जी पालं असतात ना, झोपड्या, त्या पालामध्ये राहाणारा. मी सहजच विचारलं, तू हल्ली काय विचार करतोय. तो म्हणाला, विचार करतोय तुम्हा सगळ्यांच्या विरूद्ध. मी म्हणलं, म्हणजे काय. त्यानं सांगितलं, की माझी एक लहानशी कविता आहे. कविता काय, तर त्या कवितेचं नाव पाथरवट. पाथरवट म्हणजे छन्नी हातामध्ये घेऊन हातोड्यानं दगड फोडणारे हे पाथरवट. त्या कवितेत त्यानं असं सांगितलंय, की हा मोठा दगड आम्ही घेतला. आमच्या घामानं, कष्टानं, हातातल्या छन्नीनं आणि हातोड्यानी त्या दगडाचं मूर्तीत रूपांतर केलं. आणि मूर्तीत रूपांतर केल्याच्यानंतर सगळं गाव आलं. त्याच्यापूर्वी



सोनचाफ्याच्या फुलांचा हार घालून शरद पवार आणि सौ. प्रतिभाताई पवार यांचा जयंत पाटील, प्रफुल पटेल, ऋचा शिंदे सत्कार करताना, शेजारी व्यासपीठावर रुपाली चाकणकर, राजेश टोपे, नवाब मलिक, दिलीप वळसे पाटील, छगन भुजबळ, जयंत पाटील, प्रतिभाताई पवार, प्रफुल पटेल, रामराजे नाईक-निंबाळकर, अजित पवार, सुप्रिया सुळे, सुनील तटकरे

मुलींमध्ये अधिक असेल. आणि म्हणून त्या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्याबरोबर मी अनेक संध्याकाळ घालवलेल्या आहेत. ऐकायला मिळतं. त्यांच्या मनात काय आहे. अस्वस्थता किती आहे. अन्याय, अत्याचाराबद्दल ते काय विचार करतात आणि समाजकारण आपण करणार असू तर त्यांच्या या यातना दूर करण्याच्यासाठी राजकीय पक्ष म्हणून आपण काय करतो आणि करणार आहोत याचा विचार यानिमित्तानं होतो.

मी काल सांगितलेली लहानशी कविता मला पूर्ण आठवत नाही. इथं सतीश चव्हाण बसलेत. कदाचित त्या कवीचं नाव

माझ्याकडं कुणी ढूंकूनही बघत नव्हतं. सगळं गाव आलं आणि गावानी वाजतगाजत ही मूर्ती मंदिरामध्ये प्रतिष्ठापित केली. आणि गंमत काय, तर माझ्या घामानं मूर्ती तयार झाली आणि मूर्ती तयार झाल्याच्यानंतर मंदिरात मी दलित आहे म्हणून मला आत प्रवेश नाही. ही मूर्ती तुमच्या बापजाद्यांचं प्रतिक आहे. पण तिचा बापजादा मी आहे. तरीसुद्धा तुम्ही मला मंदिरातसुद्धा येऊ देत नाही. ही तुमची समाजरचना आम्हाला उद्‌ध्वस्त करायचीय.

तुम्हाला सांगतो, अशी एखादी कविता ऐकल्याच्यानंतर

रात्री झोप येऊ शकत नाही. आपण स्वत: गुन्हेगार आहे असं वाटतं. आपण काय केलं असो, नसो. पण, आपण त्या समाजाचे प्रतिनिधी आहोत आणि या समाजाचे प्रतिनिधी म्हणून या समाजातल्या उपेक्षित वर्गावर जे अन्याय, अत्याचार केले त्याची जी अस्वस्थता त्यांच्या मनामध्ये आहे, ती दूर करण्याच्यासाठी खऱ्या अर्थानं प्रयत्नांची पराकाष्ठा करणं याची आण घेणारे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा कार्यकर्ता असं ऐकल्याच्यानंतर तो अस्वस्थ झाला तर तो खरा कार्यकर्ता आहे. आणि त्याची बांधिलकी त्याठिकाणी केलेली आहे.

अशा अनेक गोष्टी त्याठिकाणी ऐकायला मिळतील. ठिकठिकाणी या गोष्टी ऐकायला मिळतात. आत्ताच दृष्टीकोन वेगळा आहे. आणि म्हणून माझं आग्रहाचं सांगणं हे आहे, की पक्ष आपण बांधतो. कार्यकर्ते तयार होतात. त्यातनं नेते तयार होतात. संधी मिळते. आणखीन कुठं पुढं जातो. कधी विधिमंडळामध्ये गेलेलो पाहतो. लोकसभेमध्ये गेलेलो पाहतो. हे सगळं खरं आहे. तशा कार्यकर्त्यांची वाढ करण्याची कामगिरी आपण सगळेजण मिळून करू. पण तो कार्यकर्ता त्या अस्वस्थ माणसाच्या सुख-दु:खाशी समरस झाला नाही तर तो खरा कार्यकर्ता नाही. आणि म्हणून यांच्याशी बांधिलकी हे सूत्र मनात ठेऊन आपण पुढं जायचा विचार केला पाहिजे. अनेक अशी उदाहरणं ऐकायला मिळतात. वाचायला मिळतात. अनेक प्रकारचे लोक त्याठिकाणी भेटतात. आज समाजातल्या



प्रफुलभाई सांगत होते. गेल्या पंधरा दिवसांपूर्वी दोघंजण चंद्रपूरला, नागपूरला आणि गडचिरोलीला त्याठिकाणी होतो. आदिवासींचा भाग. अडचणीतले लोक. अनेक संकटं, नक्षलवादाचा त्रास, या सगळ्यावर मात करूनसुद्धा आज तिथली तरूण पिढी शिक्षित होण्याच्यासाठी धडपड करतेय. पुढं जायचा विचार करतेय. आणि राजकीय विचारधारेशी चर्चा केली तर ते सांगतात, की आम्हाला राष्ट्रवादीचा विचार मंजूर आहे. राष्ट्रवादीचा विचार आम्हाला वाढवाचांय. आता लोकांची काही अपेक्षा नाही. त्यांची अपेक्षा, या जगामध्ये आम्हाला सन्मानानं जगण्याचा अधिकार आहे तेवढा आम्हाला द्या. आणि राष्ट्रवादीचा कार्यकर्ता या विचाराला खतपाणी घालील, शक्ती देईल. त्यामुळं तुमच्या, माझ्याकडं त्यांचा बघण्याचा काही वर्गाला अद्यापि सन्मानानं जगण्याची संधी आहे असं वाटत नाही आणि ते जर वाटत नसेल तर ते दुरूस्त करायची काळजी ही आपण सगळ्यांनी घेतली पाहिजे.

आज याठिकाणी अनेकांचे विचार आपण ऐकले. अनेक लोक आपल्यातले समाजाच्यासाठी अहोरात्र कष्ट करत असतात. त्यांना उभं करण्याच्यासाठी काळजी घेत असतात आणि त्यामुळंच राष्ट्रवादीकडं बघण्याचा दृष्टीकोन हा सामान्य माणसाचा वेगळा आहे. आज या देशामध्ये, या राज्यामध्ये अनेक घटक आहेत. कुणी शेती करतो. जवळपास ५६ टक्के लोक या देशातले शेतीवर अवलंबून आहेत. काळ्या आईशी इमान राखतात. संबंध देशाला जगवण्याचं काम करतात. ते काय काम सोपं नाही. ते काम सोपं नाही हे या देशानी

पाहिलं. मला आठवतंय, की मी शपथ घेतली शेतीमंत्र्याची, संध्याकाळी माझ्याकडं फाईल आली आणि त्या पहिल्या फाईलमध्ये लिहिलं होतं, की देशामध्ये अन्नधान्याचा साठा नाही. तो साठा नसल्यामुळं देशाला भुकेचा सामना करावा लागेल आणि तातडीनं अमेरिकेतनं, ब्राझीलमधनं धान्य आयात करावं लागेल. ती फाईल माझ्याकडं आली. मी अतिशय अस्वस्थ झालो. शेतीप्रधान देश. ५६ टक्के लोक शेती करतात आणि दोनवेळचं अन्न आम्ही देशातल्या नागरिकांना देऊ शकत नाही. त्यासाठी परदेशातनं आम्ही भीक मागायची. मी काय सही केली नाही. दुसऱ्या दिवशी सकाळी दहा वाजता मनमोहनसिंगांचा फोन आला, की पवार साहब आप के पास एक फाईल भेजी है. अभीतक आपने सिग्नेचर नही की है. मी म्हटलं, की नही की. मै सोच रहा हूं, की इस परिस्थिती मे देशांना अन्नधान्य पुरवणारा देश झाला. हा बदल होऊ शकतो. हे केलं कुणी. हे केलं काळ्या आईशी इमान राखणाऱ्या कष्टकरी शेतकऱ्यानं, त्यांच्या आया-बहिणींनी, त्यांच्यातल्या कर्तृत्ववान पुरूषांनी. आणि म्हणून आपल्या समाजामध्येसुद्धा हे कर्तृत्व दाखवण्याची शक्ती आहे. त्यांना संधी द्यायला पाहिजे. त्याला प्रोत्साहन द्यायल पाहिजे. त्यांना प्रोत्साहित आपण करू शकलो, तर समाजाचा चेहरा आपण बदलू शकतो. आणि आज मग तो औद्योगिक कामगार असतील, शेतीमध्ये काम करणारा शेतकरी किंवा शेतमजूर असोत किंवा बाजारामध्ये इथं माथाडी कामगार म्हणून ओझी उचलणारा माथाडी असो, त्याच्या प्रत्येक गोष्टीला आपण सन्मान दिला, त्याला जगण्याची संधी दिली, त्याला प्रतिष्ठा दिली, तर हा प्रत्येक घटक या देशाचा चेहरा बदलू शकतो आणि अशा



सहस्रचंद्र दर्शनानिमित्त शरद पवार यांचे औक्षण करताना रुपाली चाकणकर

बदलाव कैसे लावू. ते म्हणाले, की ठीक है. सोचो. मगर अगले महिने मे अपने देश में अनाज नही है. जल्दी से जल्दी साईन करके भेजो. अनाज आयात करो और बाद मे जो परिवर्तन करना है वो किजीये. नाईलाजानं, जड हातानी मी सही केली आणि परदेशातलं धान्य या देशात आलं.

पण, ती अस्वस्थता मला स्वस्थ बसू देत नव्हती. संबंध देशामध्ये हिंडलो. लोकांच्यात जागृती केली. शेतकऱ्याला त्याच्या घामाची किंमत मिळेल याची काळजी घेतली. त्याच्या चांगल्या मालाला किंमत दिली आणि परिणाम काय झाला, दहा वर्षाच्यानंतर मी शेतीमंत्रिपद सोडलं, त्याचा उल्लेख याठिकाणी प्रफुलभाईंनी केला, की हा देश जगातल्या अठरा प्रकारची ताकद त्याच्यामध्ये आहे. आणि या सगळ्या गोष्टीवर आधारित राजकारण, समाजकारण हे करण्याची दृष्टी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये तुम्ही, मी ठेवली, या कामाच्यासाठी बांधिलकी दिली, तर माझी पूर्ण खात्री आहे, की या देशाचा चेहरा बदलल्याशिवाय राहणार नाही.

अनेकांनी मार्गदर्शन केलं. आज आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा उल्लेख मघाशी काही मित्रांनी केला. किती पुढचा विचार त्यांनी केला होता. आपल्यापैकी अनेकजणं आंबेडकरांचं नाव म्हटल्याच्यानंतर एक गोष्ट सांगतात, की त्यांनी घटना लिहिली. खरं आहे, त्यांनी घटना लिहिली. घटना अत्यंत महत्त्वाची. आज देश एकसंघ ठेवायला त्या

घटनेचा उपयोग झाला. पण बाबासाहेबांची दृष्टी या घटनेच्या पुढं होती. १९४७ साली आपण स्वतंत्र झालो. त्याच्यापूर्वी एक इंटर्नल गव्हर्मेंट मंडळ होतं. मंत्रिमंडळात मंत्री होते. ब्रिटीशांनी ते मंत्रिमंडळ बनवायला संमती दिली आणि त्या मंत्रिमंडळामध्ये जल आणि विद्युत या खात्याची जबाबदारी बाबासाहेबांच्याकडं होती. त्या काळात ४७च्या पूर्वी दहा वर्षे बाबासाहेबांनी काही निर्णय घेतले. काय निर्णय घेतले. आज आपण शेती, पाणी याचा विचार करतो. स्वातंत्र्याच्या आधी बाबासाहेबांनी निर्णय घेतला, की भाक्रा नांगल, दामोदर व्हॅली याठिकाणी देशातली सगळ्यात मोठी धरणं आहेत, त्या भागात हिमालयातनं येणारा पाण्याचा थेंब न् थेंब साठवणूक करून उपयोग केला पाहिजे, शेतीला पाणी द्यायला पाहिजे आणि त्या धरणांतून वीज तयार केली पाहिजे आणि विजेचा पुरवठा केल्याशिवाय दारिद्र्य जाणार नाही. आणि त्यासाठी विजेची निर्मिती केली पाहिजे. त्यामुळं राज्यांमध्ये काही ठिकाणी वीज होईल, काही ठिकाणी होणार नाही. जिथं होणार नाही, त्याठिकाणी वीज पुरवण्याच्यासाठी राज्याराज्यांमध्ये विजेचे ग्रीड तयार केले पाहिजेत आणि हा विद्युत पुरवठा संबंध देशात केला पाहिजे हा विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यावेळेस केला होता. किती द्रष्टे लोक होते. आज जे प्रश्न आहेत, त्या प्रश्नांचा विचार आपण या पद्धतीनं केला पाहिजे.

परवाच मी कुठंतरी बोलत असताना आठवण करून दिली. महात्मा जोतिबा फुले. आपण म्हणतो सावित्रीबाई फुलेंनी मुलींच्यासाठी शिक्षणाचे दरवाजे उघडले. वाद नाही. पण, जोतिबा फुलेंच्यासारखे एक व्यक्तिमत्व किती आधुनिक विचारांचा पुरस्कार करत होतं. या मुंबईला आपण खूपदा बघतो. गेट वे ऑफ इंडिया आहे. कशासाठी बांधलं होतं. त्या काळात इंग्रजाचं राज्य आपल्या देशात होतं. आणि इंग्लंडचा राजा भारतात येणार होता. त्याच्या स्वागतासाठी ती कमान केली होती. तिथं त्याची बोट लागली. राजा उतरला. त्या स्वागतासाठी कमानीच्या बाजूला अनेक गोरे अधिकारी, पोलिस होते. पण, गेट वे ऑफ इंडियाच्या एका कोपऱ्यामध्ये डोक्याला मुंडासं बांधलेला, धोतर घातलेला, कुर्ता घातलेली एक शेतकऱ्यासारखी व्यक्ती त्याठिकाणी उभी राहिली होती. त्याच्या हातात निवेदनाचा काहीतरी कागद होता. राजा उतरला. पोलिसांनी सगळ्यांना बाजूला केलं. त्या फेटेवाल्यालासुद्धा बाजूला केलं. काय वाटलं कुणास ठाऊक, पण त्या राजाची नजर त्याच्याकडं गेली आणि राजानी त्याच्या अंगरक्षकांना सांगितलं, की त्याच्या हातात कागद दिसतोय. काय निवेदन द्यायचंय का. त्यांना थांबवा. आणि मग त्यांना बोलवलं. मग त्यांनी निवेदनाची प्रत दिली. ती व्यक्ती म्हणजे जोतिबा फुले होते.

आणि त्या निवेदनात काय लिहिलं होतं? त्या निवेदनात लिहिलं होते की, पिढ्यानपिढ्या आमच्या राज्यामध्ये दुष्काळ पडतो. आणि दुष्काळ पडतो म्हणून त्यावेळेला तुम्ही आम्हाला खडी फोडण्याचे काम देता रोजगार म्हणून. ती खडी फोडण्याची शिक्षा बंद करा, आणि परिसरामध्ये पडणारं थेंब न् थेंब पाणी हे साठवून भूगर्भातील पाण्याची पातळी



**सौ. प्रतिभाताई पवार यांचे औक्षण करून वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना रुपाली चाकणकर**



वाढवण्याच्यासाठी प्रकल्प हातामध्ये घ्या. त्यासाठी आम्ही कष्ट करायला तयार आहोत. त्यांची दुसरी मागणी जी होती ती मला अधिक आश्चर्यकारक होती. त्यांनी काय लिहिलं?, की पिढ्यानपिढ्या आमच्याकडे शाळू म्हणजे ज्वारी, ते ज्वारीचं पिक घेतले जातं आणि त्यातीलच राहिलेली ज्वारी पुढच्या पेरणीसाठी वापरली जाते. त्यामुळे तेच तेच बियाणे आम्ही पुन्हा पुन्हा वापरतो अणि त्यामुळं त्याचा दर्जा कमी होतो. दर हेक्टरी उत्पादन घटतं. म्हणून आज त्याचा वाण सुधारला पाहिजे. आणि वाण सुधारायचा असेल, तर विलायतेतून दुसरं वाण आणून, संकर करून नवीन संकरीत जात करा. आता याच्यामध्ये विज्ञान आहे का नाही. माझ्यामते याच्यामध्ये वैज्ञानिक दृष्टी होती.

आणि तिसरा महत्त्वाचा मुद्दा त्यांनी असा मांडला, की आमच्याकडं शेतकऱ्याला जोडधंद्याची गरज आहे. तो जोडधंदा फक्त दुधाचा होऊ शकतो. पण आमच्याकडच्या गायींचं दूध कमी व्हायला लागलं आहे. त्याचं महत्त्वाचं कारण, सम रक्ताचा संगम या गायींच्यामध्ये होतो. त्यामुळे पाहिजे अशी प्रतवारी त्याठिकाणी तयार होत नाही. आणि ते जर बदलायचं असेल, त्याच्यामध्ये अधिक उत्पादन वाढवायचं असेल तर विलायतेमधून बैल पाठवावेत आणि त्याचा संकर करून याठिकाणी नवीन प्रकारचं वाण तयार करा. ज्याला आपण बीज म्हणतो. माझ्या मते हे सुद्धा विज्ञान आहे आणि या विज्ञानासंबंधीचा दृष्टीकोन महात्मा जोतिबा फुल्यांच्यासारख्या व्यक्तीनी याठिकाणी ठेवला होता. त्यांचा विचार पुढचा होता म्हणूनच आज इतकी वर्षे गेली, तरी देशाच्या कानाकोपऱ्यातून फुल्यांचं नाव कधी गेलं नाही. तुम्हाला कदाचित आश्चर्य वाटेल, उत्तर प्रदेशमध्ये मी अनेकदा जातो, त्यठिकाणी महाराष्ट्रापेक्षा फुले, आंबेडकरांचे पुतळे तिथं जास्त आहेत. तिथल्या लोकांनी आज घराघरामध्ये फुल्यांचा विचार स्वीकारलेला आहे आणि त्याचं महत्त्वाचं कारण आधुनिकता.

आज समाजकारण, राजकारण बदलतंय. त्या बदलत्या राजकारणामध्ये आधुनिकतेचं सूत्र प्रजेसमोर ठेऊन आपण आपल्या कार्यकर्त्यांचा संच तयार करणं, त्यावर आधारित राजकारण करणं आणि समाजाचा, त्याचं घर आणि त्याचा चेहरा हा बदलतो कसा आणि दारिद्र्य आणि ज्या काही




अनेक लोक पूर्वी होऊन गेले. शाहू महाराज. शाहू महाराजांचा उल्लेख खूपदा केला जातो. शाहू महाराजांची कामाची पद्धत वेगळी होती. शाहू महाराजांनी एके दिवशी, त्यांच्या राजवाड्याच्याबाहेर शेती होती, ते तिथं जायचे. त्यांना शेतकऱ्यांबरोबर राहायला, जेवायला आनंद व्हायचा. एक दिवस त्यांच्याकडं कोल्हापूरचे सरदार लोक आले आणि सरदार लोकांनी सांगितलं, की महाराज कर्नाटकातनं एक अत्यंत ज्याला पुढचं ज्ञान आहे असा एक ज्योतिषी येतोय, तुम्ही त्यांना भेटा. महाराजांनी उत्तर दिलं, की माझा त्याच्यावर विश्वास नाही. मी असल्या लोकांना भेटत नसतो. सगळ्यांनी फार आग्रह केला. शेवटी भेटायला वेळ दिली. दोन दिवसांनी त्याला बोलवलं. तो दोन दिवसांनी यायच्याऐवजी तीन दिवसांनी आला. आल्यानंतर महाराजांसमोर गेला आणि रडायला लागला. महाराजांनी त्याला रडण्याचं कारण विचारलं. त्यानं सांगितलं, की मी आलो. तुमच्या पोलिसांनी मला पकडलं. जेलमध्ये टाकलं. मला रात्री मार मार मारलं. दोनवेळचं अन्नसुद्धा दिलं नाही. माझे फार हाल केले. ते म्हणाले, तु आला कशाला. माझं ज्योतिष सांगायला ना. तुला कळलं नाही तुझं ज्योतिष काय असणार आहे. मी आधुनिकतेचा विचार करतो. अशा भंपक गोष्टींवर माझा विश्वास नाही. मी सुधारणेचा विचार करतो असं त्यांनी त्याठिकाणी सांगितलं होतं. म्हणून आपण फुले काय, आंबेडकर काय, शाहू राजा काय, यांची जी नावं घेतो, त्याचं कारण त्यांची दृष्टी, त्यांची विचारधारणा ही समाजाला पाच, पन्नास, शंभर वर्षे पुढे नेण्याची होती आणि त्या पद्धतीनं एक समाजरचना तयार करण्यासाठी राजकारण, समाजकारण हे त्यांचं समाजकारणाचं सूत्र होतं. त्या सूत्रावर आधारित काम करणारा पक्ष हा राष्ट्रवादी पक्ष आहे ही भावना मनात ठेऊन आपण विचार केला पाहिजे. त्यासंबंधीचं व्यासंग केलं पाहिजे. आपली वैचारिक बैठक केली पाहिजे आणि नवी पिढी त्यातनं तयार केली पाहिजे. ती आपण निश्चितपणानं कराल अशाच प्रकारची अपेक्षा व्यक्त करतो आणि माझे दोन शब्द संपवतो.

चुकीच्या प्रवृत्ती असतील त्या घालवण्याच्यासाठी काय करता येईल हा दृष्टीकोन ठेऊन जर आपण काम केलं तर माझ्या मते या राजकीय पक्षाला परिवर्तनाच्या कामात मोलाचं काम करणारी ही संघटना म्हणून या संघटनेकडं बघितलं जाईल.



**गृहमंत्री दिलीप वळसे पाटील आणि त्यांची कन्या पूर्वा हे शरद पवार यांना वाढदिवसानिमित्त पुष्पगुच्छ देताना.**



# साहेबांच्या निर्णयांमुळे महाराष्ट्रासह देशात सामाजिक परिवर्तन

## जयंत पाटील

आज पवार साहेबांचा ८१वा वाढदिवस. हा वाढदिवस साजरा करणार नाही असा साहेबांचा आग्रह होता. पण महाराष्ट्रात साधेपणानं, महाराष्ट्रातल्या, खेड्यापाड्यातल्या सामान्य माणसापर्यंत पोहोचण्यासाठी मी साहेबांना अतिशय आग्रहानं हा कार्यक्रम स्वीकारायला आग्रह केला. कारण आज पवार साहेबांचं मार्गदर्शन व्हर्च्युअल रॅलीच्या माध्यमातून महाराष्ट्रातल्या सर्व तालुक्यांत, सर्व शहरांत आणि जी मोठी गावं आहेत त्याठिकाणी सोशल डिस्टन्सिंगची मर्यादा पाळून महाराष्ट्रभर लोकं आज पाहतायंत. माझ्या माहितीप्रमाणं मघासपर्यंत आलेल्या आकड्यांप्रमाणं जवळपास ४००पेक्षा जास्त ठिकाणी महाराष्ट्रात लोकं वेगवेगळ्या ठिकाणी एकत्र येऊन, सोशल डिस्टन्सिंग ठेऊन हा कार्यक्रम पाहतायंत. आणि त्यामुळं महाराष्ट्रातल्या जनतेला आज पवार साहेबांच्या वाढदिवसाच्यानिमित्तानं पवार साहेबांचं मार्गदर्शन ऐकायला मिळावं हाच या कार्यक्रमाचा हेतू होता. आमचं हे निमंत्रण आदरणीय साहेबांनी स्वीकारलं. याबद्दल सुरूवातीलाच साहेबांचे मी आभार मानतो.

साहेबांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या झेंड्याखाली आपलं एक मोठं कुटुंब तयार केलेलं आहे. भावनांच्या धाग्यांनी, प्रेमाने संघटनेतल्या सगळ्यांना एकत्रित बांधण्याचं काम आदरणीय पवार साहेबांच्याकडून झालेलं आहे. आज इथंच नाही, तर महाराष्ट्रातल्या खेड्यापाड्यामध्ये पवार साहेबांचं नेतृत्व मान्य करणारे, त्यांच्यावर प्रेम करणारे, त्यांच्या प्रत्येक कृतीत औत्सुक्य दाखवणारे कोट्यवधी लोकं महाराष्ट्रात आहेत. आणि म्हणून पवार साहेबांचा हा ८१ वर्षाचा प्रवास हा अनेकांना, भल्याभल्यांना आश्चर्यात टाकणारा आणि औत्सुक्य ठरणारा आहे. काल दोन पुस्तकांचं प्रकाशन झालं. त्यातही लोकांना औत्सुक्य पवार साहेबांच्या बोलण्याकडं सतत असायचं. आणि

म्हणून अनेक लोकं पवार साहेबांच्या राजकीय आयुष्याबद्दल वेगवेगळ्या गोष्टी बोलत असतात. अनेकजण म्हणतात, की साहेब कधी कशा पद्धतीनं पाऊल टाकतील सांगता येत नाही. अनप्रेडिक्टेबल आहे. अनप्रेडिक्टेबल म्हणजे त्यांचा काय नेम नसतो असं म्हणतात. असं लोकं म्हणतात.

पण, मला एक सांगायचंय. त्यांचा नेम इतका अचूक असतो, की त्यांच्या घेतलेल्या निर्णयाने एक सामाजिक परिवर्तन महाराष्ट्रात आणि देशात होत असतं. त्यांनी मराठवाडा विद्यापीठाच्या नामकरणाचा निर्णय घेतला. काही काळ लोकांना वाटलं. पण त्या समाजाला न्याय देण्याची भूमिका पवार साहेबांच्या त्या निर्णयात होती. आजही महाराष्ट्रभर लोकं नाव घेतात, की मराठवाडा विद्यापीठाचं नामकरण करताना पवार साहेबांनी पुढाकार घेतला. महिलांच्या आरक्षणाचा निर्णय. याच नेहरू सेंटरच्या वरच्या ऑफिसमध्ये साहेबांनी आम्हाला बोलवून घेतलं. त्यावेळी मी ग्रामविकास मंत्री होतो. तेव्हा ३३ टक्के महिला आरक्षण होतं. साहेब म्हणाले, की आता हे पन्नास टक्के करायचं. मी म्हटलं, की महिला मिळतील का साहेब. ते म्हणाले, की तुला काय करायचंय, ते पन्नास टक्के करायलाच पाहिजे. महिला पुढे येतील. तुम्ही काय चिंता करू नका. आणि पवार साहेबांमुळं पहिलं ३० टक्के महिलांचं आरक्षण साहेबांनीच केलं. त्याचं राजीव गांधींनी ३३ टक्के देशभर करण्याची व्यवस्था केली महाराष्ट्राच्या निर्णयाकडं बघून. त्यानंतर ५० टक्के आरक्षण महिलांना आपण महाराष्ट्रात केलं. त्यामुळं महिलांचं आरक्षण असेल, अगदी काल-परवा महाविकास आघाडी निर्माण करण्याचा जो निर्णय आहे, एवढा अचूक नेम कधी कुणाचा असेल असं मला वाटत नाही. सगळी गणितं करीत होती. पण पवार साहेबांच्या मनातलं गणित कधीच कुणाला कळलं नाही आणि म्हणून पवार साहेबांचा निर्णय हा या देशात पुन्हा एकदा सगळ्यांना शिरोधार्थ मानून काम करावं लागतं हा आमचा सर्वांचा अनुभव आहे.

खरं म्हणजे आज आपल्या सगळ्यांना देशात अनेकजणं पवार साहेबांचा पॉवर म्हणून उल्लेख करतात. काल-परवा ममता बॅनर्जी येऊन गेल्या. देशातल्या कोणत्याही नेत्याला पवार साहेबांचं येऊन मार्गदर्शन घ्यावं लागतं. दिल्लीत गेल्यानंतरही देशपातळीवरचे अनेक नेते पवार साहेबांचा सल्ला आणि मार्गदर्शन घेतात. आणि म्हणून हा सगळा प्रवास जो आहे हा प्रवास फार मोठा आहे आणि त्यांच्या या सगळ्या प्रवासाकडं बघितलं तर आपल्या सगळ्यांनादेखील फार मोठी प्रेरणा मिळते.

आज मला पक्षाचा अध्यक्ष म्हणून पवार साहेबांनी आणि पक्षातल्या सगळ्या मान्यवर नेत्यांनी काम करण्याची संधी दिली. लोकांच्यापर्यंत आपला पक्ष अधिक प्रभावीपणानं जायचा असेल तर या पक्षात पवार साहेबांचं नाव घेऊन काम करणारे जे तळागाळात कार्यकर्ते आहेत, त्या तळागाळातल्या कार्यकर्त्यांचं म्हणणं ऐकलं पाहिजे, त्यांच्याशी आमचा संवाद अतिशय चांगला असला पाहिजे ही भूमिका घेऊन गडचिरोलीच्या अहिरीणीसारख्या कोपऱ्यातल्या मतदारसंघापासून आम्ही सगळ्यांनी परिवार यात्रा सुरू केली.



**खांद्यावर शाल घालून शरद पवार यांचा जयंत पाटील सत्कार करताना शेजारी दिलीप वळसे पाटील, छगन भुजबळ व सौ. प्रतिभाताई पवार**

चार टप्प्यात ही यात्रा झाली. २८ जिल्हे आतापर्यंत आम्ही पूर्ण केले. दहा हजार किलोमीटरपेक्षा जास्त प्रवास झाला. पण हा प्रवास करताना जवळपास १८४ विधानसभा मतदारसंघात आम्ही गेलो. जवळपास सव्वा दोनशे बैठका झाल्या. आणि ४०-४२ दिवसांमध्ये अजून काही पाच-सहा जिल्हे राहिलेत पश्चिम महाराष्ट्रातले आणि रायगड जिल्हा एक राहिलांय. पण या सगळ्या प्रवासात मला काय लक्षात आलं. पवार साहेबांचा कार्यकर्ता या नात्यानं मला स्वत:ला अभिमान वाटतो, की महाराष्ट्रामध्ये एकही तालुका नाही, की ज्याठिकाणी पवार साहेबांना मानणाऱ्या मोठ्या कार्यकर्त्यांचा संच नाही.

माणसाने आयुष्यात काय कमवायचं असतं. माणसानं आयुष्यात माणसं गोळा केली पाहिजेत. माणसं कमवली पाहिजेत. आज सगळ्यात मोठं धन महाराष्ट्रात आणि देशात कोणत्या माणसाच्या मागे असेल तर ते माणसांचं धन आदरणीय पवार साहेबांच्या मागं आहे हे बघून आम्ही आज याठिकाणी पोहोचलो आहोत. आणि म्हणून महाराष्ट्रात माणसं कशी जोडायची, भारतात माणसं कशी जोडायची याचा एक उत्तम आदर्श आदरणीय पवार साहेबांनी आपल्या सगळ्यांना घालून दिलेला आहे. खरं म्हणजे विचारांची लढाई ज्यावेळी आपण हरतो, त्यावेळी आपली खरी हार व्हायला लागते. अनेकजणं मला वेगवेगळ्या पद्धतीनं सांगतात, की राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचं काम असं आहे. भारतीय जनता पक्ष सत्तेवर यायच्या आधी आरएसएसचं कौतुक कुणाला नव्हतं. पण सत्तेवर आल्यानंतर ते किती चांगलं काम करतात हे सांगायला लोकांची कुजबूज चालू असते.

मला असं वाटतं, की काँग्रेस पक्षानंदेखील सेवादल नावाची व्यवस्था त्यावेळी निर्माण केली होती. तीही तळागाळापर्यंत जाऊन सामान्य माणसाला विश्वासात घेऊन सेवाभावी वृत्तीनं, महात्मा गांधींच्या विचारानं प्रत्येक खेड्यात काम व्हावं ही भूमिका त्यात होती. मी पक्षाचा अध्यक्ष या नात्यानं मलाही असं वाटतंय, की विचारावर आधारित कार्यकर्ता जर आम्ही निर्माण केला. आज पवार साहेबांच्या विचारांची शिदोरी आमच्याकडं आहे, तर या पक्षाला अधिक प्रभावीपणानं महाराष्ट्रात नवे कार्यकर्ते, नव्या विचारानं प्रेरित होऊन काम करणारे कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात मिळतील आणि म्हणून आम्ही असं ठरवलंय, की महाराष्ट्रातल्या प्रत्येक गावामध्ये राष्ट्रवादीच्या शाखा आहेतच, राष्ट्रवादी आहेच, पण एखादा माणूस त्या गावातला महाराष्ट्राचा प्रदेश अध्यक्ष असेल, एखादा माणूस त्या गावातला खासदार असेल, आमदार असेल, एखादा त्या गावातला माणूस प्रदेशवर असेल, जिल्ह्यावर असेल, तालुक्यावर असेल किंवा गावातल्या कार्यकर्त्याचा म्हणून कार्यकर्ता असेल.

माझी अशी अपेक्षा आहे, आणि आम्ही आमचा हा उपक्रम सुरू करणार आहे, की महाराष्ट्रात विचाराचं धन वाढवण्यासाठी कार्यकर्त्यांना वैचारिकदृष्ट्या मार्गदर्शन करण्यासाठी माझी अशी अपेक्षा आहे, की महाराष्ट्रातल्या



वाढदिवसानिमित्त स्मृतीचिन्ह देऊन शरद पवार यांचा जयंत पाटील सत्कार करताना शेजारी सौ. प्रतिभाताई पवार

प्रत्येक गावामध्ये महिन्याच्या पहिल्या शनिवारी राष्ट्रवादीचे कार्यकर्ते म्हणून म्हणवतात त्या सगळ्यांनी एकत्रित बसायचं. म्हणजे जयंत पाटील प्रदेशचा अध्यक्ष असला तरी त्याने उठून जाऊन त्याच्या कासेगाव गावात पहिल्या आठवड्यातील पहिल्या शनिवारी हजर असलंच पाहिजे. त्यानं त्या सभेत मांडी घालून बसलं पाहिजे आणि त्या गावातला कुणीतरी एक सगळ्यांनी निवडायचा, जो सेवादलाचा आमचा तिथला अध्यक्ष असेल. सेवादल हे टोप्या घालून हे आमचे जे सगळे कार्यकर्ते कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी असतात. पण तुम्ही आणि आम्ही सगळेजणं सेवादलाचे कार्यकर्ते म्हणून पहिल्यांदा जाऊन काम केलं पाहिजे आणि ते करण्यासाठी प्रत्येक गावात सेवादलाची, जर उद्या पहिला शनिवार असेल तर अजितदादांनी काटेवाडीत जाऊन तिथं सेवादलाचा जो अध्यक्ष असेल त्याच्यासमोर जाऊन बसणं अभिप्रेत आहे. जयंत पाटलांनी जाऊन बसणं अभिप्रेत आहे. बाळासाहेब पाटलांनी बसलं पाहिजे. भुजबळ साहेबांनीदेखील त्यांच्या गावात जाऊन बसलं पाहिजे आणि तो जो आमचा अध्यक्ष आहे, तो आणि तिथल्या सगळ्यांनी राज्याच्या, देशाच्या, जिल्ह्याच्या आणि तालुक्याच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक जडणघडणीची आणि सद्यपरिस्थितीची चर्चा महिन्यातून एकदा केली पाहिजे. हे बंधन आता सगळ्यांच्यावर आहे. पक्षात तुम्ही काम करत असाल, तर तुम्ही त्या सेवादलाच्या ज्या गावात तुम्ही आहात त्या गावात तुम्ही जा आणि गावात मांडी घालून बसा. एक तास बसा. जास्त वेळ मी तुमचा मागत नाही. महाराष्ट्रात ही नवी प्रथा आपण सुरू करू. आपल्याला जर विचारांची लढाई करायची असेल, विचारावर आधारित कार्यकर्ता जर तयार करायचा असेल तर सगळ्यांनी आपापल्या गावात जाऊन बसून आपल्या गावातल्या माणसांकडं जाऊन, तुम्ही मार्गदर्शन करू नका, दुसऱ्या तरूण माणसांचं मार्गदर्शन ऐका आणि त्यातनं आपल्याला नवी पिढी महाराष्ट्राची घडवायची आहे.

थोड्या वेळाने राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचा एक कार्यक्रम आम्ही करतोय. त्यामध्येदेखील महाराष्ट्रातल्या सगळ्या कॉलेजेसमध्ये विद्यार्थ्यांना चळवळीत सहभागी होता यावे यासाठी आपण एक अभिनव कार्यक्रम अजितदादांच्या हस्ते उद्‌घाटन करून करणार आहोत. राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसच्या अध्यक्षांना मी नेहमी सांगतो, तुम्ही २०२४चा विचार करू नका. २०२९चा आणि २०३४चा विचार करा. असे विद्यार्थी महाराष्ट्रात या राष्ट्रवादी पक्षात आणायचं काम आपण केलं पाहिजे. शेवटी महाराष्ट्रामध्ये आदरणीय पवार साहेबांसारखं उत्तुंग व्यक्तिमत्व असताना महाराष्ट्रातला सगळ्यात मोठा पक्ष, आम्ही भले ११४ जागा लढवू, दीडशे जागा लढवू १४४ जागा लढवू, तो पुढचा प्रश्न आहे. महाराष्ट्रातला सर्वात मोठा पक्ष म्हणून तरी किमान हा पक्ष पुढच्या येणाऱ्या काळात उदयाला आला पाहिजे हा आम्हा सगळ्यांच्या प्रयत्नांचा भाग आहे.

आज खरं म्हणजे पवार साहेबांच्या वाढदिवसाच्या-निमित्तानं २ डिसेंबर ते ११ डिसेंबरपर्यंत तालुक्या तालुक्यात शिबिरं घेतलेली आहेत. कुठं पन्नास माणसं गोळा झाली, कुठं २०० गोळा झाली, कुठे ५०० गोळा झाली, कुठे हजार गोळा झाली. त्या सर्वांनाच महाराष्ट्रातल्या आणि देशातल्या सद्यस्थितीवर मार्गदर्शन करणारी आमच्या वक्ता सेलमधल्या कार्यकर्त्यांनी त्याठिकाणी जाऊन मार्गदर्शन केलं. पहिल्यांदा महाराष्ट्रामध्ये २ ते ११ हा आठवडा गेला, त्यात फार मोठ्या प्रमाणात शिबिरांचं आयोजन महाराष्ट्रातल्या माझ्या प्रत्येक तालुका अध्यक्षांनी करण्याचं काम केलं. याचा मलादेखील विशेष अभिमान आहे.

पक्षाची पक्षनोंदणी ३० ऑक्टोबरपासून आपण सुरू केलेली आहे. सगळ्या जिल्ह्यामध्ये पक्षाची पावती पुस्तके गेलेली आहेत. जवळपास २०-२५ लाख लोकं सभासद होतील अशा पद्धतीची पावती पुस्तकं पाठवल्यात आणि चांगला प्रतिसाद वाढतोय. पुढच्या काळात १ जानेवारीच्यानंतर आपण डिजिटल मेंबरशीप ड्राईव्ह सुरू करणार आहोत. काल-परवा दिल्लीला नॅशनल एक्झिक्युटिव्ह कमिटीची बैठक झाली. त्यावेळी मुद्दाम सांगितले नाही. मला खात्री करायची होती. आदरणीय पवार साहेब, आता आपण नुसतं महाराष्ट्रातच नाही, तर केरळसारख्या प्रांतात, बिहारसारख्या प्रांतात, उत्तर प्रदेशमध्ये, दिल्लीमध्येदेखील तिथल्या सामान्य माणसाला जर पक्षाचा सभासद व्हायचं असेल, तर तो मिसकॉल देऊन, त्याठिकाणी त्याचा पत्ता घालून तो आपला सभासद होईल याची फॅसिलिटी आपण तयार करतोय. नेहमीच्या पारंपरिक पद्धतीनेही सभासद होऊ शकतो. पण, त्याचबरोबर डिजिटल मेंबरशीप करण्याचा वेगळा ड्राईव्ह आपण महाराष्ट्रात आणि देशातल्या वेगवेगळ्या भागात घेणार आहोत.

आम्ही कोरोना येण्याच्याआधी जनता दरबार राष्ट्रवादीचे सर्व मंत्री आपल्या कार्यालयात घेत होते. पण कोरोना सुरू झाला आणि या सगळ्या गोष्टी बंद कराव्या लागल्या. आता १ जानेवारीपासून पुन्हा जनता दरबार पक्षाच्या कार्यालयात भरविण्यासाठी काय परिस्थिती आहे हे २७, २८ डिसेंबरला बघून आपण १ जानेवारीपासून जनता दरबार सुरू करणार आहे. त्या जनता दरबाराला ज्यावेळी मंत्री महोदय बसायचे, त्यावेळी मुंबईतले, महाराष्ट्रातले अनेकजण येऊन त्याठिकाणी आपली गाऱ्हाणी मांडायचे. तो सगळा प्रतिसाद बघितल्यानंतर आमच्या असं लक्षात आलंय, की हा जसा मुंबईत जनता दरबार होतो, तसे आमचे महाराष्ट्रातील राष्ट्रवादीचे मंत्रीगण प्रत्येक जिल्ह्यामध्ये पालकमंत्री किंवा संपर्क मंत्री आहेत,

त्यांनी महिन्यातून एक दिवस त्या जिल्ह्यात जाऊन जनता दरबार घेतला पाहिजे. त्यामुळं १ जानेवारीनंतर कोरोनाचं प्रमाण कमी असेल तर प्रत्येक जिल्ह्यात आमचे मंत्री गण मुंबईतही करतील आणि महाराष्ट्रातल्या प्रत्येक जिल्ह्यात हा जनता दरबार सुरू करण्याचं काम करतील.

आगामी काळात महानगरपालिका, नगरपालिकेच्या निवडणुका आहेत. महाराष्ट्रात खासदार वंदनाताई चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली आपण एक अर्बन सेल सुरू केला आहे. त्या अर्बन सेलला काही शहरांमध्ये, जळगावसारखं शहर असेल, औरंगाबादसारखं शहर असेल, नांदेडसारखं शहर असेल, वेगवेगळ्या ठिकाणी त्या गेल्यावर लोकांनी चांगला प्रतिसाद दिला. लोकांची जी भूक आहे, ती एनव्हायर्मेंट प्रगती करण्याची व्यवस्था या महाराष्ट्रात केली पाहिजे. म्हणून महाराष्ट्रातल्या सगळ्या नगरपालिका, महानगरपालिकांमध्ये राष्ट्रवादीचा अर्बन सेल तयार केलेला आहे आणि त्या अर्बन सेलच्या माध्यमातून त्यांच्याकडून वेगवेगळ्या सूचना घेण्याचं काम करतोय. गेले वर्षभर तो सेल चालू आहे. शहरात राहणाऱ्या लोकांच्याही राष्ट्रवादीकडून फार मोठ्या अपेक्षा आहेत, हे आम्हाला यातून जाणवलं. म्हणून येणाऱ्या महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदा, पंचायत समित्यांच्या निवडणुकीत आमचा हा प्रयत्न आहे, की या सगळ्या ठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेस अधिक सक्षमपणानं उभा राहील आणि येणाऱ्या निवडणुकीत चांगलं यश मिळवेल. या निवडणुकीत तिकिट देताना आमची एक अट असेल, की तो राष्ट्रवादीचा क्रियाशील कार्यकर्ता असला पाहिजे. तरच त्याला तिकिट द्यायचं पक्षानं ठरवलंय. आणि त्याचबरोबर जास्तीत जास्त महाराष्ट्रातल्या युवकांना जास्तीत जास्त महिलांना संधी द्यायची. त्यात पुढाऱ्यांच्या महिलांपेक्षा पक्षासाठी राबणाऱ्या, कष्ट करणाऱ्या महिलांना जास्त संधी मिळावी हा आमचा आग्रह आहे.

आज सुप्रिम कोर्टाच्या निवाड्यानंतर पुन्हा एकदा ओबीसी आरक्षणाचा प्रश्न निर्माण झालांय. आमच्या पक्षानं हा निर्णय घेतला होता, त्याच्यावर भुजबळ साहेब चांगलं मार्गदर्शन करतील, मराठा आरक्षणाचा निर्णय झाला. दोन्ही निर्णय सुप्रिम कोर्टात गेले आणि त्याठिकाणी वेगळे निर्णय आले. कोर्टाचा निर्णय आम्हा सगळ्यांना मान्य आहे. परंतु, जे पूर्ण मेरिटने आहे. ओरिसामध्ये अशी गोष्ट नाहीये. ओरिसामध्ये कुणी जाऊन कोर्टात स्टे घेतलेला नाहीये. पण महाराष्ट्रातच महाराष्ट्र सरकारने घेतलेला प्रत्येक निर्णय अडवण्याची पद्धत आता पडली आहे. जाणीवपूर्वक कोर्टात जायचं आणि नवे प्रश्न तयार करायचे आणि सरकारला काम करू देण्यात अडथळा आणायचा. विशेषत: ओबीसी समाजात गैरसमज निर्माण होईल. शेवटी ओबीसी समाजात ओबीसींचं आरक्षण झाल्यानंतरच निवडणुका व्हाव्यात हीच आमच्या पक्षाची भूमिका आहे. सुप्रिम कोर्टात आणखी काय कन्व्हेन्स करता येईल यावर मार्ग काढण्यासाठी प्रफुलभाई आणि भुजबळ साहेब यांनी दिल्लीत बैठका घेतल्यात. महाराष्ट्रातील ओबीसी आरक्षणासाठी राष्ट्रवादी तेवढीच सेन्सेटिव्ह आहे, आग्रही आहे. मराठा आरक्षणाच्याही बाबतीत काही प्रश्न झाले. त्याबाबतीतही राष्ट्रवादी काँग्रेस तेवढीच सेन्सेटिव्ह आणि



**प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तंत्रज्ञान सहाय्य करून एनसीपी ॲप तयार केल्याबद्दल आदिती नलावडे आणि नीरज महांकाळ यांचा शरद पवार यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. शेजारी जयंत पाटील व प्रफुल पटेल**



गृहनिर्माण मंत्री जितेंद्र आव्हाड हे तैलचित्र शरद पवार यांना भेट देताना शेजारी छगन भुजबळ, जयंत पाटील, प्रतिभाताई पवार, प्रफुल पटेल व रामराजे नाईक निंबाळकर

आग्रही आहे. ही भूमिका आपण सर्वांनी लक्षात घेणं आवश्यक आहे. खरं म्हणजे पवार साहेबांनी मुस्लिम आरक्षणाचाही प्रश्न आम्हाला २०१४ साली सांगितला होता. त्याप्रमाणं निर्णय झाला. काही प्रश्न त्यात आहेत. पण या सगळ्या आरक्षणाच्या बाबतीत आमची राष्ट्रवादी काँग्रेसची भूमिका स्पष्ट आहे. आमचा आग्रहदेखील त्या पद्धतीनं राहणार आहे.

खरं म्हणजे, अलिकडच्या काळामध्ये पेपर उघडला. नवाबभाई मलिकांचं आज स्टेटमेंट आहे, की मी पाहुण्याचं स्वागत करायला रोज सकाळी थांबतो म्हणून. हे पाहुणे कोण? हे पाहुणे या देशामध्ये जर सरकारच्याविरोधी कुणी बोललं तर हे पाहुणे आपल्या घरी येतात. तुम्ही जर काहीच बोलला नाही तर पाहुणे दुर्लक्ष करतात. तुम्ही जर त्यांच्यात जाऊन बसला, तर पाहुणे तुमचं स्वागत करायला एखादवेळेस येऊ शकतात. म्हणजे या देशामध्ये सत्तारूढ आणि हे पाहुणे एका पक्षाचे आहेत की काय अशी शंका वाटावी, अशा पद्धतीनी या देशातील यंत्रणा आज काम करतायंत. त्यामुळं आपल्या सगळ्यांना, अनिल देशमुखांच्यासंदर्भात आपण त्यांच्या बातम्या ऐकतो, अनिल देशमुखांच्या घरावर सीबीआयची धाड झाली. किती वेळा झाली? सात वेळा झाली. एखादा दरोडेखोरदेखील एखाद्या घरावर दरोडा टाकल्यावर परत महिनाभर दरोडा घालायला येत नाही. पण, सीबीआयने सातवेळा अनिल देशमुखांच्या घरी धाडी घातल्या. राजकीयदृष्ट्या जर तुम्ही आम्हाला महत्त्व देत नसाल तर तुम्हाला या शुक्रकाष्ठाला तोंड द्यावं लागेल, अशी एक वेगळी पद्धत दुर्दैवानं भारतात सुरू झाली आहे. विधानसभा निवडणुकीआधी पवार साहेबांना ईडीची नोटीस आली. त्यानंतर ज्या पद्धतीने आपण त्याचा सामना केला, त्यावरून आता ईडी म्हणजे काय हे महाराष्ट्रातल्या प्रत्येक पारावर बसणाऱ्या माणसाला माहित झालं आहे. त्यामुळं आता कुणालाच काही वाटत नाही.

मागच्या काही महिन्यांमध्ये नवाबभाईंनी भूमिका घेतली आणि खरंच कणखरपणानं त्यांनी ती भूमिका घेतली. शेवटी महाराष्ट्रात आणि देशात कुणीतरी त्याला तोंड फोडायला पाहिजे होतं. या सगळ्या व्यवस्था कशा चुकीच्या पद्धतीनं वापरल्या जातायंत याचा खुलासा महाराष्ट्राला त्यानिमित्तानं झाला. खरं म्हणजे महाराष्ट्रात कधी सूडाचं राजकारण केलं जात नव्हतं. आम्ही लहानपणापासून राजकारण बघतो. पण विरोधकालाही सन्मानानं वागवण्याची पद्धत या भूमीत होती. भुजबळ साहेबांना किती तरी महिने तुरूंगवास झाला. त्यामुळं विरोधकांना सन्मानानं वागवायचं असतं ही यशवंतराव चव्हाण साहेबांची शिकवण ही महाराष्ट्रात अलिकडं अंमलात येताना दिसत नाही. त्यामुळं टोकाची भूमिका, समोरच्याला त्रास देण्याची भूमिका. शेवटी विधायक कामात महाराष्ट्र उभा करण्यावर वादविवाद होऊ शकतो आणि त्यासाठी संघर्षही होऊ शकतो, पण त्याचं पर्यावसन एखाद्याच्या व्यक्तिगत जीवनात, म्हणजे कुटुंबातल्या सदस्यांनादेखील चौकशी यंत्रणाला दोन-दोन, तीन-तीनवेळा सामोरं जावं लागणं ही महाराष्ट्रात कधी परंपरा होती असं मला वाटत नाही. पण दुर्दैवानं झाली. प्रसार माध्यमांवरही केंद्र सरकारची करडी नजर असते. दैनिक भास्करच्या उदाहरणावरून हे स्पष्ट होते. त्यामुळे पवार साहेबांच्या नेतृत्वाखाली, त्यांच्या मार्गदर्शनाखाली उद्धव ठाकरे साहेबांचं जे सरकार स्थापन झाले आहे, त्या सरकारच्या समोर अनेक समस्या आहेत. पण, महाराष्ट्रातली जनता लोकशाहीवादी आहे. या देशातली लोकशाही टिकावी या भूमिकेची आहे. आणि म्हणून महाराष्ट्रातल्या बहुसंख्य

जनतेचा आज महाविकास आघाडीला पाठिंबा आहे, याचा आम्हा सगळ्यांना आनंद वाटतो.

आज खरं म्हणजे शेतकरी आंदोलन झालं. एक वर्ष झालं. ८ नोव्हेंबर २०२१ रोजी आंदोलन मागं घ्यायचा निर्णय झाला, तोपर्यंत त्या आंदोलनात भारतामध्ये, दिल्लीमध्ये ७५० शेतकऱ्यांचं बलिदान झालेलं होतं. या सगळ्या वर्षभराच्या काळात या देशाच्या पंतप्रधानांनी तोंडातून एक शब्दही काढला नाही. शेतकऱ्यांना आंदोलनजिवी म्हणण्यात आलं, खलिस्तानवादी म्हणण्यात आलं, रशियाशी यांचे संबंध आहेत. या देशातल्या शेतकऱ्यांनी केलेल्या मागणीसमोर शेवटी केंद्र सरकारला नतमस्तक व्हावं लागलं आणि भारतामध्ये आजपर्यंत होणार नाही असं वाटत होतं ते परिवर्तन झालं. भारतातला शेतकरी हा जिंकला. या वर्षभराच्या लढाईमध्ये भारताने एवढी मोठी लढाई कधीच बघितली नसेल. महात्मा गांधींच्या विचाराने एका ठिकाणी बसून शेतकऱ्यांनी दिलेला लढा देशाच्या प्रमुखांना आणि भारतीय जनता पक्षाला नतमस्तक त्यापुढं व्हावं लागलं. लखीमपूरची घटना माहिती आहे आपल्याला. आठ जणांना चिरडून मारण्याचं काम एका मंत्रीपुत्रानं केलं. सहा दिवस मंत्रीपुत्राला अटक नव्हती झाली. त्याचे समर्थन करणारे किंवा त्याला पाठिंबा देणारे त्याचे वडील जे केंद्रीय मंत्री आहेत, त्यांचाही राजीनामा अद्याप घेतलेला नाही हे आपण लक्षात घ्या.

काल-परवा एक फार मोठी घटना घडली. देशाचे सरसेनापती आपले बिपीन रावत यांचा अपघाती मृत्यू झाला. जगाच्या पाठीवरचं सर्वोत्कृष्ट हेलिकॉप्टर. ढगाच्या वरून जायचं हे ज्या हेलिकॉप्टरला माहिती आहे, रडारची यंत्रणा अवगत आहे असं हेलिकॉप्टर भारताच्या प्रमुखाला घेऊन कोसळलं. ही घटना आपल्याला हे दर्शवते, की या देशातल्या संरक्षण व्यवस्थेमध्ये आमचा सर्वोच्च माणूसाचादेखील अपघाती मृत्यू होऊ शकतो. चौकशी होईल. काहीतरी बाहेर येईल. पण ही घटना धक्कादायक आहे आणि त्यामुळं या देशातल्या संरक्षण आणि सर्वच व्यवस्थेबद्दल प्रश्नचिन्ह तयार झालंय.

आज मी आपलं सर्वांचं या कार्यक्रमाला मन:पूर्वक स्वागत करतो. आज याठिकाणी एक दिव्यांग योजना आमचे आरोग्यमंत्री राजेश टोपेजी, सामाजिक न्यायमंत्री धनंजय मुंडे, वैद्यकीय शिक्षण आणि आरोग्यमंत्री अमित देशमुख आणि आपल्या खासदार सुप्रियाताई सुळे यांच्या पुढाकाराने पवार साहेबांच्या वाढदिवसाच्या निमित्तानं दिव्यांग योजना सुरू करतोय आणि एक मोहीम महाराष्ट्रात घेतोय. ही मोहीम आदरणीय यशवंतराव चव्हाण साहेबांच्या पुण्यतिथीला १२ मार्चपर्यंत पूर्ण होईल. प्रयत्न हा आहे, की राज्यातल्या दिव्यांग व्यक्तींना ऑनलाईन पद्धतीने दिव्यांग प्रमाणपत्र मिळवून द्यायचं. यासाठी सामाजिक न्याय, विशेष सहाय्य विभाग राज्य शासनाच्यावतीनं १२ डिसेंबर ते १२ मार्च दरम्यान विशेष मोहीम राबवण्यात येणार आहे. शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळावा यासाठी त्यांना हे यूडीआयडी कार्ड मिळणं अत्यंत आवश्यक असतं. त्यासाठी दिव्यांग व्यक्तींना तज्ज्ञ डॉक्टरांच्या माध्यमातून तपासणी करून ऑनलाईन प्रमाणपत्र, त्यांचं वैश्विक ओळखपत्र देण्याची व्यवस्था यासाठी सरकारकडे आणि यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या माध्यमातून अपंग हक्क विकास मंचने दिव्यांग कल्याण आयुक्तालय, पुणे यांच्या सहकार्यानं अभ्यासपूर्ण माहितीचं सादरीकरण केलं होतं. यासाठी राज्य सरकारनं सकारात्मक प्रतिसाद दिला आणि ही विशेष मोहीम आखण्यात आली. याचा दिव्यांग व्यक्तींना फार मोठा फायदा होणार आहे.



आपण एक महाराष्ट्रातल्या आणि देशातल्या कार्यकर्त्यांना जोडण्यासाठी तंत्रज्ञानाने अतिशय परिपूर्ण असणारे एक ॲप तयार केलेले आहे. पक्षातल्या कार्यकर्त्यांना केंद्रस्थानी ठेऊन गाव, तालुका, जिल्हा, राज्य पातळीवर युवा पिढीच्या साथीने पक्ष संघटन अधिक मजबूत व्हावं म्हणून ॲप्लिकेशन निर्मिती आपण केलेली आहे. याच्यात वैशिष्ट्य हे आहे, की पक्षातल्या प्रत्येकाचा प्रत्येकाशी थेट संपर्क कसा होईल यादृष्टीनं याची रचना केलेली आहे. आणि देशातल्या, राज्यातल्या पक्षाशी संबंधित असलेल्या घडामोडीचे ताजे अपडेट्सदेखील या ॲपच्या माध्यमातून लोकांच्यापर्यंत पोहचणार आहे. शासनाकडून राबवण्यात येणाऱ्या सर्व योजनांची माहिती आणि ॲपमध्ये इन्फोग्राफिकच्या माध्यमातून देण्याची व्यवस्था आपण केलेली आहे. पक्षाच्या नियोजित कार्यक्रमाची माहिती सर्वसामान्य नागरिकांना मिळून त्यांनादेखील कार्यक्रमाला उपस्थित राहाता यावे ही देखील विशेष सुविधा या ॲपमध्ये आपण करणार आहोत. ॲप यूझर जितका सक्रीय राहील, तेवढं त्याचं कौतुक करण्याचीदेखील व्यवस्था त्यात आपण ठेवलेली आहे. आणि युवा पिढीला आणि सर्वच घटकांच्या नागरिकांना डोळ्यासमोर ठेऊन हे ॲप तयार करण्यात आलेलं आहे. आगामी काळात पक्षाच्या भूमिकेत या ॲपची भूमिका महत्त्वपूर्ण असेल, असा मला विश्वास आहे.

आदरणीय पवार साहेबांच्या कारकिर्दीला शोभेल अशी सुरेश भटांची एक कविता आहे. मी ती सांगतो आणि माझे दोन शब्द पूर्ण करतो. ही कविता अशी आहे...

माझी झोपडी जाळण्याचे, केलेत कैक कावे,
जळेल झोपडी अशी, आग ती ज्वलंत नाही
रोखण्यास वाट माझी, वादळे होती आतुर,
डोळ्यात जरी गेली धूळ, थांबण्यास उसंत नाही
येतील वादळे, खेटेल तुफान, तरी वाट चालतो,
अडथळ्यांना भिऊन अडखळणे या पावलांना पसंत नाही

असाच प्रवास आदरणीय पवार साहेबांचा. ८१ वर्षाचा प्रवास आपण सगळ्यांनी पाहिला. त्यांचा कार्यकर्ता, त्यांचं मार्गदर्शन, त्यांचा सहवास मिळाला. महाराष्ट्रातल्या प्रत्येक कार्यकर्त्याला राजकारणात एक स्वप्न असतं. पण राजकारणात असताना राजकारण कळणं आणि ते राजकारणातल्या दिग्गज, ज्याला भीष्माचार्य म्हणता येईल, ज्याला सर्वोच्च ठिकाणी आम्ही सगळे मानतो, आणि देशातले पंतप्रधानदेखील त्यांचं बोट धरूनच राजकारण शिकलेले आहेत असं म्हणतात, त्या आदरणीय पवार साहेबांच्या छायेखाली काम करण्याची गेली ३०-४० वर्षे आम्हाला सर्वांना संधी मिळाली. मी ८१ वर्षाचं अभिष्टचिंतन पक्षाचा अध्यक्ष या नात्यानं करेनच, पण महाराष्ट्रातला एक कार्यकर्ता, महाराष्ट्रातले कोट्यवधी कार्यकर्ते पवार साहेबांवर विश्वास ठेऊन काम करतात, त्या कार्यकर्त्यांच्या विश्वासाला तडा कधी जाणार नाही अशीच भूमिका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीनं आम्ही घेत राहू. महाराष्ट्रात आदरणीय पवार साहेबांच्या विचाराने पुढं



**एनसीपी ॲपचे बटन दाबून शरद पवार उद्घाटन करताना, शेजारी जयंत पाटील, नीरज महांकाळ, माजिद मेमन, आदिती नलावडे**

जाण्याचं काम करत राहू आणि त्यांच्या छत्रछायेखाली काम करण्याची संधी मला आणि आम्हा सगळ्यांना मिळाली. मी राजकारणात गेली अनेक वर्षे काम करतोय. पण मला राजकारणात अनेकांना, म्हणजे माझ्या घरी अनेक मोठी दिग्गज लोकं यायची, त्यांना चहा द्यायचं काम करायचो. पण, आदरणीय पवार साहेब हे एकमेव व्यक्तिमत्व बघितलं माझ्या ४०-५० वर्षांच्या कालखंडात, की त्या व्यक्तिमत्वामुळे महाराष्ट्र पुढं नेण्याचं, देश पुढं नेण्याचं आणि ८० टक्के कायम काहीना काही उभं करण्याचा आग्रह करणारं हे नेतृत्व, या नेतृत्वाची छत्रछाया, या नेतृत्वाचं प्रेम आणि आशिर्वाद मला मिळाले, आम्हा सगळ्यांना मिळाले. याच्यातूनच राजकारणात आल्याचं जीवन कृतकृत्य झाल्याचा अनुभव आम्हा सगळ्यांना मिळाला आणि म्हणून आदरणीय पवार साहेबांच्या या ८१ वर्षाच्या वाटचालीला अभिवादन करतो आणि माझे दोन शब्द संपवतो. धन्यवाद!



# साहेबांना अपेक्षित राष्ट्रवादीमय महाराष्ट्रासाठी आम्ही बांधील

**रुपाली चाकणकर**

ज्यांनी दिल्लीच्या तख्ताला नुसती आव्हानेच दिली नाहीत, तर ते आव्हान समर्थपणे परतावून लावत महाराष्ट्राचा स्वाभिमान जीवंत ठेवला, ते आपले सर्वांचे कुटुंबप्रमुख, देशाचे नेते, महाराष्ट्राचा अभिमान आदरणीय साहेब आपणांस जन्मदिनाच्या मन:पूर्वक शुभेच्छा! आपणांस उदंड, निरोगी व दैदिप्यमान आयुष्य लाभो, ही महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानी चरणी मी प्रार्थना करते.

वारकरी सांप्रदायाची परमार्थिक आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासाची भव्य परंपरा लाभलेल्या महाराष्ट्राच्या

**शरद क्रीडा व सांस्कृतिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष लक्ष्मीकांत खाबिया यांनी ४ भाषेत तयार केलेल्या शरद पवार यांच्यावरील निबंधांचे 'माझ्या शब्दात शरद पवार' या पुस्तकाचे व्यासपीठावरील सर्व मान्यवर प्रकाशन करताना.**




मातीत आपण जन्माला आलो. शाहू-फुले-आंबेडकरांच्या समानतेच्या शाळेत आपण शिकलो. स्वर्गिय यशवंतराव चव्हाण साहेबांच्या सुसंस्कृत समाजकारणाचे पाईक आपण बनलोत. राजकारणाच्या पलिकडं जाऊन समाजकार्य जोपासत तुमच्या, माझ्यासारख्या कार्यकर्त्याला संस्काराची शिदोरी देऊन प्रगतीच्या वाटेवर चालायला शिकवणाऱ्या ८१व्या वर्षांच्या शरदचंद्रजी पवार साहेब या वटवृक्षाच्या सावलीत आपण सर्वजण विसावत आहोत हे आपलं भाग्य!

आदरणीय शरद पवार साहेब, एक नाव आणि या नावाभोवती फिरणारा ६० वर्षांचा ऐतिहासिक प्रवास. स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये भारताच्या सर्वांगिण विकासापासून ते जागतिक महासत्तेच्या स्वप्नांचा पाठलाग करत ज्या हाताने या देशाला खऱ्या अर्थाने आकार आणि आधार दिला, ते म्हणजे आदरणीय पवार साहेब. कृषी, सहकार, उद्योग, शिक्षण, कला, क्रीडा, साहित्य, समाजकारण या सर्वच क्षेत्रांना स्पर्श करत आपल्या कर्तृत्वाचा ठसा ज्यांनी उमटविला आणि आपल्या पाऊलखुणा रूजवल्या. तब्बल ६० वर्षांची समाजकार्यातील कारकिर्द लाभलेले ते देशातील

सर्वात अनुभवी नेते. स्वर्गिय यशवंतराव चव्हाण साहेबांनी १ मे १९६० रोजी संयुक्त महाराष्ट्राच्या सुवर्णकलशाचे पूजन केले. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीच्या १८व्या वर्षी त्याला सदृढ, संस्कार आणि स्वावलंबी बनविण्यासाठी आदरणीय साहेबांनी पालकत्व स्वीकारले आणि ते लिलया पेललेदेखील. या मातीतील शेतकऱ्याला, कष्टकऱ्याला तळहाताच्या फोडाप्रमाणे जपले. इथल्या मागास, दुर्बल घटकांतील मुलांना दर्जेदार शिक्षणाची कवाडं खुली केली. मुलींना सक्षम बनवले. महिलांच्या सबलीकरणाची मोहीम हाती घेतली. उद्योगधंद्यांना गती दिली. शेतीचे आधुनिकीकरण करून तंत्रज्ञानाच्यादृष्टीने

अध्यक्ष म्हणून समाजातील दुर्लक्षित, उपेक्षित, न्यायाच्या प्रतिक्षेत असलेल्या दुर्बल घटकांपर्यंत पोहोचून जात-धर्माच्या पलिकडे जाऊन, साहेब आपल्याला अपेक्षित महिला सुरक्षेचा आत्मविश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न आपल्या सर्वांच्या सहकार्याने करेन. कारण महिला धोरण स्वीकारणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य आणि ज्या महिला आयोगाची निर्मिती साहेब आपणच केली, त्या आयोगाच्या अध्यक्षपदी एका संघटनेतील कार्यकर्तीला धुरा सोपवून विराजमान होण्याची संधी साहेब आपण दिली, हा माझ्या संघटनेचा सन्मान आहे, याबद्दल मी आपले मनापासून आभार व्यक्त करते.



जगाच्या स्पर्धेत भक्कम स्थान मिळवले. वंचित घटकांना प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न केले, याचीच फलश्रृती म्हणजे जागतिक ओळख निर्माण करणारे आजचे महाराष्ट्र राज्य.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घटनेचा अधिकार देऊन आम्हा महिलांच्या सक्षमीकरणाच्या चळवळी उभ्या केल्या. क्रांतीसूर्य महात्मा जोतिबा फुले यांनी सावित्रीमाईच्या हातात लेखणी देऊन आमच्यासाठी शिक्षणाची कवाडे खुली केली. या स्त्री समानतेचा वसा आणि वारसा घेऊन साहेब आपण रूढी, परंपरेच्या अनिष्ट चौकटींना छेद देत आम्हा महिलांना आरक्षण दिलं. साहेब, आपण दिलेल्या आरक्षणामुळेच आमच्यातील कर्तृत्वाला नेतृत्त्व करण्याची संधी मिळाली. या आरक्षणामुळे विविध क्षेत्रात, विविध पदांवरती विराजमान असणारा आणि म्हणून समाजात आत्मविश्वासाने आणि स्वाभिमानाने वावरणाऱ्या तमाम महिला भगिनींच्यावतीनं मी आपले मन:पूर्वक ऋण व्यक्त करते.

महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात सन्मान होत असताना प्रत्येक हार, फुलाबरोबर समाधानापेक्षा काकणभर जास्त जाणीव होते, ती आपल्यावरील जबाबदारीची. महिला आयोगाची

साहेब, कालच आपले नेमकचि बोलणें या पुस्तक प्रकाशनाच्या निमित्तानं एका लेखिकेने आपल्याला प्रश्न विचारला महिला अत्याचाराबद्दल, महिला सुरक्षेबद्दल. त्याला साहेब आपण उत्तर दिलं, की एखाद्या महिलेवर अन्याय होत असेल, तर बघ्याची भूमिका घेऊ नये. त्याचा प्रखर विरोध करावा आणि आपण जर प्रखर विरोध केला तर आपल्या वाटेला पुन्हा कोणी जाणार नाही. साहेब, आमचा संघर्ष हा गर्भातूनच सुरू होतो. वंशाला वारसदार हवा म्हणून उमलण्याआधीच कळी खुडली जाते. पण, आम्ही आवर्जुन सांगतो. वारसदारच पाहायचा असेल, तर महाराष्ट्राचे प्रश्न संसदेत मांडत लढणाऱ्या खासदार सुप्रियाताई पहाव्यात आणि त्यांच्या विचारांचा वारसा घ्यावा.

साहेब, कायमच आम्ही महिला भगिनी प्रत्येक ठिकाणी संघर्ष करत आलो. पण, आपल्या या कालच्या वक्तव्याने आमच्या या बोथट शस्त्राला धार मिळाली. साहेब, महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात, वाड्या-वस्त्यांवरती, आदिवासी पाड्यांवरती आपल्यावर प्रेम करणारा कार्यकर्ता आहे, याची अनुभूती आम्हाला आदरणीय प्रांताध्यक्ष जयंतजी पाटील साहेब यांच्या

मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या परिवार संवाद दौऱ्याच्या निमित्ताने अनुभवता आली. साहेब, पतीच्या निधनाला एकच वर्ष पूर्ण होत असताना संपूर्ण कार्यकारिणीसह उपस्थित राहणारा माझ्या नगरच्या शहराध्यक्ष यशोमतीताई आठरे असो, जालन्याच्या मुसळधार पावसामध्ये, जिथे रस्ते तुटलेत, पूल कोसळलेत, गावांचा संपर्क तुटलांय अशा भागामध्ये सुद्धा शंभर टक्के कार्यकारिणीसहित उपस्थित राहणारा माझ्या जालन्याच्या जिल्हाध्यक्ष सुरेखाताई लहाने असू देत, किंवा पुरामुळे ज्याचं घरच वाहून गेलंय, अशा माझ्या रत्नागिरीच्या चित्राताई चव्हाण असू दे. साहेब, या सर्व कार्यकर्त्या काम करत असताना ही

वयाची ८१ वर्षे पूर्ण करत आपण अनेक दशके पौर्णिमेचं चंद्रदर्शन घेतलं. हा सहस्रचंद्रदर्शन सोहळा अनुभवणारा माणूस शतायुषी होतो. साहेब, आपण शतायुषी व्हा या सर्वांच्यावतीनं शुभेच्छा. सहा दशके या चंद्राच्या मधुर आणि शीतल प्रकाश महाराष्ट्राने अनुभवला. त्यातून सर्वसामान्य माणूस उजळून निघाला. अशा या महाराष्ट्राच्या कडीकपाऱ्यातून दरीखोऱ्यातून ऊन, वारा, पाऊस, वादळ झेलत ज्यांचा आवाज घुमतो, ते म्हणजे शरदचंद्रजी पवार साहेब. साहेब, २४ एप्रिल २०२१ रोजी आपली पित्ताशयाच्या शस्त्रक्रियेनंतर एक शस्त्रक्रिया झाली. तमाम महाराष्ट्रातल्या कार्यकर्त्यांनी आपलं आयुष्य,




**शरद क्रीडा व सांस्कृतिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष लक्ष्मीकांत खाबिया, उपाध्यक्ष नंदकुमार बंड आणि विश्वस्त संदीप राक्षे हे स्मृतीचिन्ह देऊन शरद पवार यांचा सत्कार करताना.**

संकटं जरी आली, हे संघर्ष जरी आले, तरी आपल्यावरती जबाबदारी दिली ती जबाबदारी आपण प्रामाणिकपणे पेलली पाहिजे यासाठी त्यांची ही भावना आहे, की आम्ही आदरणीय साहेबांच्या पक्षाच्या कार्यकर्त्या आहोत आणि म्हणूनच ही भावना संघटना वाढीसाठी फार मोलाची आहे, असं मला मनापासून वाटतं.

आदरणीय उपमुख्यमंत्री अजितदादा यांच्या वाढदिवसापासून साहेब आजच्या जन्मसोहळ्यापर्यंत खासदार सुप्रियाताईंच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रातला राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या संघटनेतल्या कार्यकर्त्यांनी, करोना काळामध्ये ज्यांच्या पतीचं निधन झालं किंवा कर्त्या पुरूषाचं निधन झालंय, अशा महिलांना मानसिक आधार देत त्यांना अर्थसहाय्य करण्यासाठी सुप्रिया स्वाधार अभियान सुरू केलं. या अभियानाच्या निमित्तानं अनेक महिलांपर्यंत आपल्याला पोहोचता आलं. समाजातला दुर्लक्षित घटक असेल त्यांच्यापर्यंत पोहचत असताना, साहेब, आज या सगळ्या महिला भगिनी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून, व्हर्च्युल रॅलीच्या माध्यमातून आपल्यासमोर उपस्थित आहेत. या सर्वांनी आपल्याला जन्मदिनाच्या शुभेच्छा पाठवल्यात. त्याचादेखील आपण स्वीकार करावा.

आरोग्यासाठी प्रार्थना केल्या. प्रत्येकाला वाटत होतं, की आता अनेक दिवस साहेब हॉस्पिटलमध्ये राहतील. पण, दुसऱ्याच दिवशी सकाळी प्रसारमाध्यमातून प्रत्येकाने आपला प्रसन्न मुद्रेतला पेपर वाचतानाचा फोटो पाहिला आणि पुन्हा एकदा साताऱ्यातल्या पावसातल्या सभेची आठवण झाली.

साहेब, संघर्ष हा आयुष्यात कायम असतो. वैयक्तिक आयुष्यासारखा तो राजकारणातदेखील येतो. पण वादळ येतात आणि जातात. ती जितक्या वेगाने येतात, तितक्याच वेगाने निघून जातात. पण या वादळात घट्ट पाय रोवून उभं राहावं हे कायमच आम्हाला आपण शिकवत आलात. आणि म्हणून राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचा हा कार्यकर्ता निर्भिडपणानं लढत आला. पक्षबांधणी असो, बूथबांधणी असो, आंदोलन असो या सगळ्याच माध्यमातून महिलांची संघटना जोमाने उभी राहतेय. साहेब, आपण आम्हाला पन्नास टक्के आरक्षण दिलं. निर्णयप्रक्रियेत सहभागी करून घेतलं. आपल्याला अपेक्षित असलेलं निश्चितपणे हा राष्ट्रवादीमय महाराष्ट्र उभा करण्यासाठी आम्ही बांधील आहोत ही शुभेच्छा मी आजच्या निमित्तानं देते. धन्यवाद! जय हिंद, जय महाराष्ट्र!!



# महाराष्ट्राच्या प्रत्येक क्षेत्रावर पवार साहेबांच्या विचारांचा ठसा

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विचार

आपल्या सर्वांचे नेते, देशाचे नेते, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कुटुंबप्रमुख आदरणीय पवार साहेबांच्या वाढदिवसाच्यानिमित्तानं अभिष्टचिंतनासाठी आयोजित करण्यात आलेल्या आजच्या व्हर्च्युअल रॅलीसाठी राज्याच्या, देशाच्या कानाकोपऱ्यातून ऑनलाईन, ऑफलाईन उपस्थित असलेले सर्वच माझे सहकारी, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्व सन्माननीय पदाधिकारी, कार्यकर्ते, माझे पक्षाचे सर्व हितचिंतक, पक्ष विचाराशी, पक्ष कार्याशी बांधिलकी ठेऊन समाजाच्या निरनिराळ्या क्षेत्रात काम करणारा पक्षाचा संपूर्ण चाहता वर्ग, पक्षाचे समर्थक, पाठीराखे, बंधू-भगिनी, माता, युवक मित्रांचं सर्वात पहिल्यांदा मी मनापासून स्वागत पण करतो आणि अभिनंदनदेखील करतो. आपल्या सर्वांच्या वतीनं आदरणीय पवार साहेबांच्या वाढदिवसानिमित्त मी मनापासून अभिष्टचिंतनदेखील करतो. साहेबांचं नेतृत्व, साहेबांचं मार्गदर्शन, साहेबांचा आशिर्वाद कायम आपल्यासोबत राहण्यासाठी आदरणीय साहेबांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य लाभावं अशी प्रार्थनादेखील मी याठिकाणी करतो.

साहेबांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची, महाराष्ट्राची, देशाची ताकद वाढवण्याचं काम आपल्या सर्वांच्याकडनंच व्हावं यासाठी आपल्या सर्वांना साहेबांच्या वाढदिवसाच्या निमित्तानं खूप मनापासून शुभेच्छादेखील देतो. आदरणीय पवार साहेबांचा वाढदिवस म्हणजे महाराष्ट्राच्या जाणत्या नेत्याचा हा वाढदिवस. शेतकऱ्यांच्या पाठीराख्यांचा हा वाढदिवस. कष्टकऱ्यांच्या तारणकर्त्यांचा हा वाढदिवस. वंचित-उपेक्षित घटकांच्यासाठी लढणाऱ्या कार्यकर्त्यांचा वाढदिवस, आदिवासी, अल्पसंख्याक बांधवांसाठी निर्णय घेणाऱ्या राज्यकर्त्याचा वाढदिवस, महिला, बालक, युवकांचा हक्क मिळवून देणाऱ्या प्रशासकाचा वाढदिवस, गेली ६०हून अधिक वर्षे महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी अहोरात्र काम करणाऱ्या कर्मयोग्याचा आज वाढदिवस.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कुटुंबप्रमुखाचा आदरणीय पवार साहेबांचा आज वाढदिवस साजरा करत असताना पक्षाच्या प्रत्येक कार्यकर्त्यांनी स्वत:ला झोकून देऊन पक्षासाठी काम करावं, समाजासाठी जास्तीत जास्त वेळ द्यावा, आदरणीय पवार साहेबांचे विचार प्रत्येक घटकापर्यंत, विशेष करून युवकांच्यापर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न करावा असं माझं आपल्या सगळ्यांना आवाहन आहे. आदरणीय साहेबांच्या राजकारणाबद्दल, समाजकारणाबद्दल अनेकजण चर्चा करतात. या चर्चेत अनेक अभ्यासक साहेबांचे विश्लेषण त्यांच्या त्यांच्या पद्धतीनं करतात. एक मात्र खरं, की महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक कुठलंही क्षेत्र असू द्या, प्रत्येक क्षेत्रावर आदरणीय साहेबांच्या कार्याचा, विचारांचा

ठसा आहे. साहेबांची नोंद घेतल्याशिवाय महाराष्ट्राचा आणि देशाचा इतिहास लिहिता येणार नाही. हे पवार साहेबांचं मोठेपण आहे.

आदरणीय साहेब हे देशाच्या राजकीय, सामाजिक, साहित्य, क्रीडा आणि सांस्कृतिक विश्वास आख्यायिका बनून राहिले आहेत. साहेबांच्या व्यक्तिमत्वाला हिमालयाची उंची आणि सह्याद्रीचा भक्कमपणा, त्यांच्या राजकारणातला मुत्सद्दीपणा, विकासाची दूरदृष्टी, अहोरात्र कष्ट करण्याचा स्वभाव, राजकारणाबरोबरच इतर क्षेत्रातला सहज वावर अशा अनेक गोष्टी आपण जवळून पाहिलेल्या आहेत. सर्वांकडं बारकाईनं लक्ष देणं, सगळ्यांना संस्कार देणं, सामाजिक जाणीव देणं, सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी प्रोत्साहन देणं, केवळ आम्हालाच नाही, तर राज्यातल्या लाखो युवकांना साहेबांनी ताकद, बळ, प्रोत्साहन देऊन समाजाच्या निरनिराळ्या क्षेत्रात

ते सर्वार्थानं आदर्श आहेत. या गोष्टी आपण सगळेजण पाहतो.

माझ्या आधी पण अनेक मान्यवरांनी भाषणं केली. त्यांनी त्यांचे विचार मांडले. मी प्रांताध्यक्षांचं पण भाषण ऐकत होतो. त्यांनी सांगितलं, की आता दर महिन्याच्या पहिल्या शनिवारी प्रत्येकानं आपापल्या गावात जायचं आणि गावात जाऊन बसायचं. एक चांगला उपक्रम त्यांनी सांगितलेला आहे. फक्त ते सांगत असताना माझ्या मनात एवढंच आलं, की जे जे आपापल्या गावामध्ये पहिल्यांदा जाणार आहेत, कृपा करून तुमचं गाव, सरपंच तरी तुमच्या विचाराचा असावा एवढा तरी प्रयत्न करा. नाहीतर बरेच पुढारी देशाचं राजकारण करतात, राज्याचं राजकारण करतात, गावाचा सरपंच त्याचं कधी ऐकत नाही. अशी अवस्था कृपा करून होता कामा नये. असं नम्रतापूर्वक मला आपल्या सगळ्यांना सांगायचंय.

खरं तर मला भाषण करताना आज शब्दच सुचत नाहीयेत.



काम करण्यासाठी प्रोत्साहित केलं, प्रेरणा दिली, तुमच्या-माझ्यासारख्या लाखो-करोडो तरूण आधारवड म्हणून साहेबांकडं बघतात, समाजासाठी योगदान देतात. हे सगळेजणं आपण पाहतोय.

आदरणीय साहेब म्हणजे केवळ एक व्यक्ती नव्हे, तर ज्ञानानं, अनुभवानं समृद्ध जागतिक विद्यापीठ आहे ही माझी आणि महाराष्ट्रातल्या प्रत्येक माणसाची दृढ श्रद्धा आहे. राज्यातल्या सर्वात तरूण पक्षाचा अध्यक्ष, सर्वात तरूण मुख्यमंत्री असे अनेक विक्रम साहेबांच्या नावावर आहेत. साहेबांनी नुकतीच राजकीय, सामाजिक जीवनाची ६० वर्षे पूर्ण केली. वयाच्या ८१व्या वर्षीही राज्यातल्या कोट्यवधी तरूणांच्या हृदयातला नेता, गळ्यातील ताईत बनून राहण्याची जादू साहेबांनी करून दाखवली. आपल्यासारख्या कार्यकर्त्यांना

मी माझ्या राजकीय, सामाजिक जडणघडणीत साहेबांचे संस्कार, त्यांच्या सहवासातून मिळालेल्या विकासाच्या दृष्टीचा फार मोठा वाटा आहे. आदरणीय साहेबांची विकासाची दूरदृष्टी, दुर्दम्य इच्छाशक्ती, मुत्सद्देगिरी, संकटातही घट्ट पाय रोवून उभा राहण्याची वृत्ती ही माझ्यासारख्या असंख्य कार्यकर्त्यांची प्रेरणा आहे. समाजाचा, राज्याचा आणि देशाच्या विकासाचा ध्यास आदरणीय पवार साहेबांच्याकडून आमच्यासारख्या कार्यकर्त्यांनी घेतला आहे. आदरणीय साहेब हे आपल्या सर्वांची प्रेरणा, स्फूर्ती आणि शक्ती आहे. आदरणीय पवार साहेबांच्या वाढदिवसाच्यानिमित्तानं मी पुन्हा एकदा लाख लाख शुभेच्छा देतो आणि आपल्या सगळ्यांची रजा घेतो. जय हिंद! जय महाराष्ट्र!!

# साहेबांचे मार्गदर्शन कायम मिळत राहो

प्रफुल पटेल यांचे मत



साहेबांचा आज ८१वा वाढदिवस. दरवर्षी आपण त्यांचा वाढदिवस साजरा करतच असतो. फक्त त्यांचा वाढदिवस आहे म्हणून इतरांसारखं केक आणि पार्टीचा हा कार्यक्रम नसतो. हा कार्यक्रम काहीना काही प्रेरणा घेऊन आपण जावं, समाजासाठी, लोकांसाठी, विकासासाठी, राज्य आणि देशासाठी काहीतरी चांगलं काम आपण करावं ही प्रेरणा आणि ऊर्जा घेऊन जाणारा हा कार्यक्रम असतो.

देशात अनेक मोठ्या नेत्यांच्या अशा कार्यक्रमात मी आणि आपण सर्वही सहभागी झालेलो आहोत. साहेबांचा ७५वा वाढदिवस दिल्लीमध्ये जो साजरा झाला होता, त्याची आठवण आज मला आली. त्या ७५व्या वाढदिवसाचा जर तुम्ही विचार केला, आणि आज जसा आपण इथे मंच पाहात आहोत, त्या मंचावर कोण नव्हता. याच्यामध्ये बात करायचा जर विचार मी केला तर आपल्याला नावंसुद्धा मिळणार नाहीत. असा तो एक भव्य दिव्य मंच त्या ७५व्या वाढदिवसाला तिथं आपल्याला पाहायला मिळाला. देशाचे राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, देशाचे प्रधानमंत्री, काँग्रेस पार्टीचे नेते, समाजवादी पार्टी सगळ्या पक्षाचे, म्हणजे नाव घेणं म्हणजे वेळ जाणं. सगळे त्या एकाच मंचकावर, तेही आजच्या वातावरणामध्ये जेव्हा आपण पाहतो, की लोकं एकमेकांचं तोंड पहायला तयार होत नाहीत, राजकीय मतभेद एवढे तीव्र झालेले आहेत, लोक एकमेकांच्या विरोधात हातघाईवर जाऊन लढाई करायला तयार होत आहेत, असे असताना आपल्या नेत्यासाठी सगळे जण मतभेद विसरून एक मंचकावर आले ही फार मोठी गोष्ट, ही फार मोठी कमाई, पवार साहेब ही तुमच्या आयुष्यातली आहे. ही काही छोटी गोष्ट नाही.

म्हणून पवार साहेबांचा व्याप, त्यांची उंची, त्यांचे विचार. आपण अहोभाग्य आहोत, की आपल्याला एवढं जवळून एवढ्या मोठ्या नेत्याची साथ आणि आशिर्वाद आपल्या डोक्यावर राहिलेले आहेत. मित्रांनो, काही दिवसांपूर्वी पार्लमेंटमध्ये पंतप्रधानांची आणि आमची भेट झाली होती. पंतप्रधानांनी मला स्वत: बोलावून सांगितलं, की पवार साहेबांना सांगा, की कोरोनामध्ये एवढं काय रात्रंदिवस इकडे तिकडे फिरतांय. कुठे पूर येतोय, तर कुठे आणखी काही आपत्ती येतेय, तर ते स्वत: जातायंत, जरा त्यांना सांगा, की थोडं दमानं घ्या. प्रकृतीची काळजी घ्या. तुम्ही तुमच्याकडून सल्ला द्या. मी त्यांना सांगितलं, की साहेब हे तुम्ही सांगतांय, आम्ही पण सांगतो. पण ते कुणाचे ऐकणारे नाहीत. त्यांच्या

जीवनात जी ऊर्जा आहे, टॉनिक आहे, विटामिन आहे, जे काही आहे, लोकांमध्ये राहून काम करतील, रात्रदिवस त्यांची सेवा करतील. तेच त्यांचे टॉनिक आहे.

आपण सगळ्यांनी पाहिलंय. आता काहीच दिवसांअगोदर विदर्भाच्या दौऱ्यावर साहेब आणि आम्ही होतो. आता साहेबांची ऊर्जा, त्यांची काम करण्याची स्टाईल म्हणजे आपणही थकून जातो. आता रात्री ठरलं, की सकाळी साडे आठ वाजता गाडीत बसून पुढं जायचं आहे, कार्यक्रम नियोजित आहे. तर आपण थोडासे आरामाने तयार होतो. त्यावेळी आठ वाजताच आपल्या दारावर येऊन साहेब तयार झालेत अजून तुम्ही तयार झाले नाहीत असे एखादा सांगतो. साहेबांना धीर नसतो. जायच्या आधीच ते तयार होऊन बसतात. आजही दिल्लीमध्ये, मुंबईमध्ये, कुठेही तुम्हा सगळ्या लोकांना अनुभव येत असेल, साहेबांना कधीही कुणाला भेटायला अपॉईंटमेंट, ठीक आहे काही मोजक्या लोकांना वेळ देतात, पण कोणीही त्यांच्या दारावर गेलं तर साहेबांची भेट झाल्याशिवाय परत येत नाही. ही त्यांची शैली आहे. आजही मनामध्ये कामाचा उत्साह असतो. कधी त्यांच्याबरोबर बसलो, तर जगामध्ये नवीन काय चाललं आहे याचा अभ्यास करण्याची आजही त्यांच्या मनामध्ये जिज्ञासा आहे.

शेतकऱ्यांच्याविषयी तर काय बोलायचा प्रश्नच नाहीये. आज देशातला कुठलाही शेतकरी, तुम्ही गुजरातमध्ये जावा, पंजाबमध्ये जावा, हरियानात जावा, कुठल्याही राज्यात जावा, पवार साहेबांबद्दल शेतकऱ्यांच्या मनामध्ये एक विशेष प्रेम आहे, आपुलकी आहे. पवार साहेब फक्त त्यांच्याविषयी बोलतात असं नाही, तर त्यांनी करून दाखवलेलं आहे. आम्ही त्यांच्यासोबत सरकारमध्ये होतो. त्यावेळेस काही आकडेवारी आम्हाला नंतर समजली. या देशाच्या कृषी क्षेत्राचं एकूण एक्स्पोर्ट तीन लाख कोटीच्या वर आहे. ज्या देशामध्ये ५० वर्षे अगोदर गहू आपण इम्पोर्ट करत होतो. खाण्या पिण्याची वस्तू इम्पोर्ट करत होतो. आज या देशामधून आपण पाच लाख कोटीच्यावर आकडा पार केलेला असेल, इतकं मोठं योगदान या देशाच्या कृषी क्षेत्रामध्ये आणि शेतकऱ्यांसाठी साहेबांचं राहिलेलं आहे. हे कधीही या देशाचा सामान्य माणूस, शेतकरी विसरू शकणार नाही. म्हणून साहेबांच्याबद्दल कितीही बोलले तरी कमी आहे.


आजच्या दिवशी फक्त साहेबांना परत दरवर्षी प्रमाणे अभिष्टचिंतन तर करतच आहोत. पण अशीच त्यांची ऊर्जा, असेच त्यांचे मार्गदर्शन आणि असाच त्यांचा उत्साह आपल्याला कायम लाभत राहो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना करतो. साहेबांना आणि आमच्या मातृतुल्य प्रतिभाताईंना दोघांना वाढदिवसाचे अभिष्टचिंतन. खूप खूप आपल्याला शुभेच्छा. धन्यवाद! जय हिंद!!



**ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे हे लेखाची फ्रेम केलेली प्रत शरद पवार यांना भेट देताना, शेजारी जयंत पाटील व प्रफुल पटेल**

# देशात सगळ्यांना बरोबर घेऊन जाण्याची साहेबांमध्ये क्षमता

छगन भुजबळ



आज साहेबांचा ८१वा वाढदिवस. बरोबर वीस वर्षांपूर्वी रेसकोर्सवर साहेबांची एकसष्ठी साजरी झाली आणि त्यावेळचे पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी हे त्या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे होते. त्यावेळी वाजपेयी साहेब म्हणाले, की शरदजी एक कर्तृत्ववान नेता है. वो प्रतिभावान है. उनके पिछे एक प्रतिभा है. तर या प्रतिभा वहिनी आणि साहेब आपल्याला, दोघांनाही वाढदिवसाच्या मी मन:पूर्वक शुभेच्छा देतो.

साहेबांना समजून घ्यायचं असेल तर ही दोन पुस्तकं जरूर वाचायला पाहिजे प्रत्येक कार्यकर्त्यानि. एक 'लोक माझे सांगाती' आणि दुसरे 'नेमकचि बोलणें'. म्हणजे बोलावं कसं, चालावं कसं, विषय मांडावा कसा आणि त्याचबरोबर लोकांना बरोबर ठेवावं कसं, निर्णय कसे घ्यायचे, कुठल्या विषयावर आपण बोलू शकतो, कुठलं ज्ञान आपण प्राप्त करू शकतो, लोकांना देऊ शकतो. दोन पुस्तकं जर तुम्ही वाचली, तर मला असं वाटतं, तर आपला फार मोठा अभ्यास तसेच राजकीय आणि सामाजिकदृष्ट्या आपणसुद्धा ही पावलं टाकू शकतो.

खरं तर पवार साहेब समतेवरती विश्वास ठेवतात आणि त्यांना हे बाळकडू जे आहे ते त्यांच्या आई-वडिलांकडूनच मिळालं. सत्यशोधक समाज आणि त्यामुळं स्त्री-पुरूष समान आहेत, शेतकरी असतील, दलित, शेतमजूर, दुर्बल, मागासवर्गीय, सगळे वंचित जे आहेत त्यांच्यासाठी स्वत:ला वाहून घेण्याची त्यांची प्रवृत्ती जी आहे ही आपल्याला वारंवार दिसते. अगदी मुंबईमध्ये सुद्धा आपण फिरलो ना काही ठिकाणी गेलो तर त्यांचा वावर कुठे कुठे दिसतो आपल्याला. पहिल्यांदा साखर संघ आहे, शेतकऱ्यांसाठी काय करायचंय, साखरेचं काय होणार आहे, कारखान्याचं काय होणार आहे, पुढे आलं, की चव्हाण सेंटर आहे. जिथून राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक विषयांचं ज्ञान देणं, वाढवणं, जपणं हे महाराष्ट्रभर केलं जातं. पुढे

आलं, की मंत्रालय आहे. मुख्यमंत्री कसा असावा, प्रशासक कसा असावा, मंत्रालय तुम्हाला पाहिल्यानंतर लक्षात येईल. त्याच्या पुढं आलं, की क्रिकेट सेंटर. त्या क्रिकेटमध्येसुद्धा ते गेले, तर पार जगाचे ते बॉस बनले. पुढं आलं, की हे नेहरू सेंटर. तिथेसुद्धा विज्ञान. देशातील माहिती, वेगवेगळ्या देशांची माहिती, इथेसुद्धा त्यांचं कर्तृत्व आहे. आणखी पुढं गेलं, की यशवंतराव चव्हाण नाट्यगृह आहे. सांस्कृतिक कामांमध्येसुद्धा त्यांचा तेवढाच वावर आहे. साहित्यामध्येसुद्धा त्यांचा वावर आहे. शिक्षणामध्ये, रयत शिक्षण संस्थेचे प्रमुख. विद्या प्रतिष्ठान. शिक्षणामध्येही तेवढीच रूची आहे.

आपण धान्य पुरवठा करतोय. कारण, साहेबांनी शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवले, हमीभाव तिप्पट, चौपट, पाचपट दिला. शेतकऱ्यांनी क्रांती घडवली.

राजकारणामध्ये इतर सगळ्या ठिकाणी, त्यांच्यावर हल्ले पण काय कमी झाले नाहीत. खूप वैचारिक हल्ले. साहेब असे आहेत, साहेब तसे आहेत. वेगवेगळ्या पक्षांनी केले. पण अतिशय संयमानी, संयम ठेवत त्यांनी सगळ्यांना, संयम बाळगण्याच्या बाबतीत त्यांची ख्यातीच आहे. कितीही तुम्ही तुटून पडा, कितीही कडवटपणे तुम्ही त्यांच्याबद्दल बोला. पण, संयम सुटणार नाही. मला एकच त्याच्याबद्दल म्हणावं लागेल,



ज्यावेळेला ९५ सालामध्ये काँग्रेस सरकार गेलं, त्यावेळेला काय करायचं. पवार साहेब फक्त साखर कारखान्याच्या कार्यक्रमाला मोळी टाकायला जायचे आणि तिथं एकच सांगायचे, की तुमच्या या खेड्यापाड्यातील लोकांच्या मुलांच्या-मुलींच्या हातामध्ये कम्प्युटर दिसला पाहिजे. तेव्हापासून ते सतत कम्प्युटर, कम्प्युटर. खेळण्यासारखं वाटलं पाहिजे कम्प्युटर. खेळाच्या बाबतीमध्येसुद्धा कुस्तीला, कबड्डीला आंतरराष्ट्रीय दर्जावर नेऊन ठेवायचं काम पवार साहेबांनी केलं. हॉस्पिटलमध्ये पूर्वी आपण कुणाला बघायला गेलो, की थोडी फळं घेऊन जायचो. तेवढीच आपल्याला फळं दिसायची. पण नंतर साहेबांनी एक शंभर कोटी रूपयांचा कार्यक्रम आखला आणि त्याच्यात आणखी पैसे घातले. आता सगळीकडं तुम्हाला फळफळावळ दिसते आणि देशभर तो कार्यक्रम नेला. कृषी मंत्री म्हणून त्यांनी केलेलं काम म्हणजे शेतकऱ्यांच्या बाबतीमध्येसुद्धा आणि मनुष्यजातीच्या बाबतीमध्येसुद्धा, देशाच्या बाबतीमध्येसुद्धा गहू, तांदूळ कशाचीही कमतरता नाही. पण विविध देशांना तेव्हापासून

जाने कितनों के दर्द अपने भीतर दफन करता हूँ, पर ऐ जिंदगी तेरे साथ हमेशा मुस्कराकर रहता हूँ. कितीही संकटे येऊ दे. शारिरीक येऊ दे, राजकीय येऊ दे साहेबांचा संयम ढळणार नाही. किती बोलावं त्यांच्याबद्दल. ते थोडं आहे. परंतु, आजकाल जे आहे, विविध क्षेत्रातील संशोधकांची माहिती ठेवणं यात साहेबांच खासियत आहे.

ओबीसीचा प्रश्न जो आहे, तो गाजतो आहे. ओबीसी आरक्षण दिलं कुणी महाराष्ट्रात. महात्मा फुले समता परिषदेची जालनामध्ये मोठी रॅली झाली, त्यावेळेला साहेब मुख्यमंत्री होते. आम्ही एकच मागणी केली, की साहेब मंडल आयोगाची अंमलबजावणी करा. साहेबांनी तिथं उभं राहून सांगितलं, की मी एक महिन्याच्या आत मंडल आयोगाची अंमलबजावणी करणार आणि त्यांनी शिक्षणात, नोकरीत आणि राजकीयसुद्धा जे आरक्षण आहे ते मागासवर्गीय समाजाला दिलं, ते पवार साहेबांनी दिलं. पुण्याच्या सभेमध्ये आम्ही मागणी केली. राष्ट्रपती शंकर दयाळ शर्माजी होते आणि मागणी केली, की बाबासाहेब आंबेडकरांचं

नाव मराठवाडा विद्यापीठाला द्यायला पाहिजे. साहेबांनी सांगितलं, एक महिन्याच्या आत आणि एक महिन्याच्या आत बाबासाहेब आंबेडकरांचं नाव मराठवाडा विद्यापीठाला दिलं.

आज अनेक लोक म्हणतात, की साहेबांमुळं आरक्षण गेलं. अरे, त्यांनी तर आणलं. त्यावेळेला तुम्ही विरोध करत होता. त्यांनीच आणलं आणि आजसुद्धा तुम्ही तेच करता आहात. भाजपचं मला काय समजतंच नाही. त्यांचे लीडर्स होते. त्यांना घेऊन चर्चा झाली. कसं पुढं जायचं ते ठरलं. अध्यादेश काढला आणि त्या अध्यादेशाला विरोध कोण करतंय सुप्रिम कोर्टात, तर भाजपचे जनरल सेक्रेटरी. काय चाललंय हे. मूँह में राम, बगल में छुरी. कथनी एक, करनी एक. आमच्यावर आरोप ठेवतात. आम्ही तर लढतो आहोत. दोन दिवसांपूर्वी सगळ्या दिल्लीतल्या मोठमोठ्या वकिलांना भेटून उद्याच्या ट्रायलला उभं राहण्यासाठी तयार केलं आणि अर्धा-अर्धा, पाऊण-पाऊण तास आम्ही त्यांच्याशी चर्चा केली. आरक्षण वाचवण्यासाठी. आणि आज काही ठिकाणी बोर्ड लावलेत, की आरक्षण नाही, आमच्याकडं मतं मागू नका. मला तमाम जनतेला विनंती करायची आहे, ओबीसी जातीला विनंती करायची आहे, जरूर दारात उभं करू नका, पण कुणाला? तुमच्या आरक्षणाला विरोध करणाऱ्या लोकांना. तुमच्या आरक्षणाला हायकोर्टात, सुप्रिम कोर्टामध्ये सातत्यानं जाऊन विरोध करणाऱ्या लोकांना.

पण, मला एक सांगायचंय. कदाचित हा त्यांचा छुपा कार्यक्रम असावा, की राजकीयदृष्ट्या अशक्य होत नाही, ते कोर्ट-कचेरीच्या माध्यमातून हे आरक्षण रद्द करण्याचे उपद्व्याप भाजप करतंय. आणि आज ओबीसीवर आहे. एकेक करून या देशातलं सगळं आरक्षण संपवण्याचा भाग हे पार पाडणार आहेत. त्याच्यासाठी ओबीसींसह सगळ्यांनी जागृत झालं पाहिजे आणि आपल्या हक्काचं रक्षण केलंच पाहिजे. त्यासाठी जे तुमच्यासाठी लढतात, ज्यांनी आरक्षण तुम्हाला दिलं, त्यांच्या बाजूनं उभं राहा. निवडणुका येतायंत, लहान लहान नगरपालिकांच्या निवडणुका आहेत. जिल्हा परिषदेच्या निवडणुका आहेत, महानगरपालिकांच्या निवडणुका आहेत. या सगळ्या निवडणुकांमधून ज्यांनी आरक्षणाला विरोध केला कोर्टात जाऊन आणि करता आहेत त्यांना खड्यासारखं बाजूला ठेवायचं काम तमाम ओबीसी बांधवांना, भगिनी-मातांना करावं लागेल. माझी त्यांना हात जोडून विनंती आहे.



**गायक आनंद शिंदे आणि प्रफुल पटेल शरद पवार यांना वाढदिवसानिमित्त पुष्पगुच्छ देऊन अभिष्टचिंतन करताना, शेजारी सौ. प्रतिभाताई पवार, अजित पवार, दिलीप वळसे पाटील, छगन भुजबळ**

आज या वयामध्येसुद्धा पवार साहेब तरूणांनासुद्धा लाजवेल असं काम करतायंत. ८१व्या वर्षी देशामध्ये सगळ्यांना बरोबर घेऊन जाण्याची क्षमता त्यांच्यामध्ये आहे. मघाशी सांगितलं. किंबहुना आज देशातील मोठमोठे नेते, विरोधी पक्षातले नेते हे साहेबांकडे मोठ्या आशेने पाहताहेत. मी तर साहेबांना सांगेन, की साहेब तुम्ही जो महाराष्ट्रात चमत्कार घडवला, असाच चमत्कार २०२४नंतर दिल्लीमध्ये झाला पाहिजे आणि कोणी त्यांना कमी लेखू नका. एकाच वाक्यात त्यांना मी हे सांगतो आणि थांबतो. मत समझो की न आता मुझे जीने का सरीका, मैं पैरो तले जमींन, मुठ्ठी में आसमाँ रखता हूँ. धन्यवाद! जय हिंद!! जय महाराष्ट्र!!!

# साहेबांच्या विचारांनीच देशातील मतभेदाची लढाई जिंकता येईल

नवाब मलिक



निश्चितपणे आज आपल्या सर्वांसाठी आनंदाचा क्षण आहे. आम्ही ज्यांच्या नेतृत्वाखाली काम करत आहोत, त्या आमच्या नेत्याचा आज जन्मदिवस आहे आणि निश्चितपणे आजच्या दिवशी आपल्याला संकल्प घेण्याचे काम करावे लागेल. कोल्हे साहेबांनी आत्ता वैचारिक लढाईसंबंधी सांगितले. निश्चितपणे देशात आज एक वैचारिक लढाई उभी करण्याची गरज आहे. मला वाटतं, की मी एक फिल्म पाहिली, की योद्धाही महान है आणि निश्चितपणे हा लढाईचा योद्धा, ही लढाई जिंकण्याचे काम करेल असा पूर्ण विश्वास आम्हा लोकांना आहे.

आम्ही पाहिले आहे, की पवार साहेबांच्या वृत्तीला, मी एक शेर म्हणून इच्छितो पवार साहेब, की उसलों पे आ जाये, तो टकराना जरूरी है, और जो जिंदा है, वो जिंदा नजर आना जरूरी है. मित्रांनो मी तुम्हाला सांगू इच्छितो, की जीवंत मासे प्रवाहाच्या विरूद्ध पोहण्याचं काम करतात आणि जे मेलेले असतात ते प्रवाहाबरोबर वाहून जातात. आणि आपला नेता, या देशामध्ये जो वैचारिक संघर्ष चाललेला आहे, हेगडेवार, गोळवळकरांची विचारधारा घेऊन, राज्यात जी समतेची छत्रपती शिवाजी महाराजांची विचारधारा आहे, शाहू महाराजांची विचारधारा, महात्मा जोतिबा फुलेंची विचारधारा, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची विचारधारा असा संघर्ष या देशात निर्माण होत आहे.

काही लोकांना वाटतं, की या देशामध्ये एक वेगळी विचारधारा घेऊन या देशामध्ये पूर्णपणे स्वत:ला प्रस्थापित करू. आम्हाला वाटते, की या वैचारिक लढाईमध्ये आमचा हा योद्धा पूर्णपणे जिंकेल आणि पूर्ण ताकदीने आम्ही

त्यांच्याबरोबर उभं राहण्याचे काम करू. पवार साहेबांचा ८१वा वाढदिवस आहे. देशात वारंवार गेल्या सात वर्षांपासून प्रश्न उपस्थित केला जात होता, की मोदींच्या विरोधात कोण. भारतीय जनता पक्षाला पर्याय काय असेल. आम्हाला वाटते, की दोन वर्षांपूर्वी देशातल्या कोणत्याही व्यक्तीने विचार केला नसेल, स्वप्नातसुद्धा पाहिले नसेल, की शिवसेना आणि काँग्रेस पक्ष एकत्र बसेल आणि शिवसेना-काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसचे सरकार पवार साहेबांच्या नेतृत्वाखाली या महाराष्ट्राच्या भूमीत बनू शकते, तर देशात पर्यायी सरकार २०२४मध्ये पवार साहेबांच्या नेतृत्वाखाली बनू शकते.

आमचे पत्रकार मित्र याठिकाणी उपस्थित आहेत. सातत्याने प्रश्न उपस्थित करतात, की काँग्रेसचे लोक वेगळे होत आहेत. जेव्हा वेगवेगळे बोलणारे असतील, तेव्हा एक व्यक्ती पाहिजे, जो वेगवेगळे बोलणाऱ्यांना एकत्र आणण्याचे काम करेल आणि आम्हाला पूर्ण विश्वास आहे, सर्वांना एकत्रित बसवण्याचं काम आमचे नेते करतील. काश्मीरमध्ये फारूक अब्दुल्लांचा पक्ष असेल, पंजाबचे अकाली दलाचे नेते असोत, दिल्लीचे केजरीवाल असोत, डाव्या विचारांचे पक्ष असतील, दक्षिणेतील पक्ष असतील, कोणीही एका नेत्याचे म्हणणे ऐकण्यासाठी तयार असतील तर आम्हाला वाटते, की आमचे नेते पवार साहेबांचे म्हणणे ऐकण्यास सर्वजण तयार होतील.

पवार साहेबांचे व्यक्तिमत्व असे आहे, मी माझे काही अनुभव तुमच्याशी शेअर करू इच्छितो. आज एका पत्रकाराने मला विचारले, की पवार साहेबांच्या मनात काय आहे हे कोणाला समजत नाही आणि आम्हाला वाटतं, की असा कार्यकर्ता, नेता काय असेल, जो आपल्या नेत्याच्या मनातील गोष्ट समजू शकत नाही, तो पक्षाचा कार्यकर्ता, नेता असू शकत नाही. सातत्याने बातम्या येतात, की आज नाहीतर उद्या, पवार साहेब भारतीय जनता पक्षाबरोबर जाणार आहेत. १९९९मध्ये महाराष्ट्रात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना झाली, त्यानंतर बातम्या यायला लागल्या, की पवार साहेब देशाचे उपपंतप्रधान बनणार आहेत आणि महाराष्ट्रात शिवसेना-भारतीय जनता पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे सरकार स्थापन होईल. मी समाजवादी पक्षात होतो. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे मित्र पक्ष म्हणून आम्ही काम करत होतो. कार्यकर्ता, सर्व सहकाऱ्यांमध्ये चर्चा होऊ लागली. मी सांगितलं, की पवार साहेब विचारांशी तडजोड करू शकत नाहीत आणि मला वाटते, की काँग्रेसबरोबर चर्चा होईल. पुन्हा पवार साहेबांनी सर्व गोष्टी, म्हणजे मला सत्ता मिळाली नाही तरी चालेल. पण आम्ही विचारांशी तडजोड करणार नाही आणि त्यावेळी आम्ही भाजपबरोबर जाणार नाही हे त्यांनी सिद्ध केले.

त्यानंतरही सातत्याने बातम्या येतच होत्या. मोदी पंतप्रधान होते. बातम्या येऊ लागल्या, अनेकजण मला विचारू लागले, की सुप्रियाताई मंत्री बनणार आहेत. तुमचा पक्ष भारतीय जनता पक्षाबरोबर जाणार आहे का. मी थेट सांगितले, की हे शक्य नाही. मला विचारण्यात आलं, की हे तुम्ही कसं सांगू शकता. मी सांगितलं, की माझ्या नेत्याच्या मनात जे आहे, ते मला समजते आणि आमचे नेते असं करू शकत नाही. दोन वर्षांपूर्वी जी परिस्थिती निर्माण झाली होती, जे पुस्तक लिहिलं गेलं, की नवाब मलिक सर्वात आधी सांगत होते, की महाराष्ट्रात पर्यायी सरकार स्थापन होईल. जर नेत्याच्या मनातील गोष्ट कार्यकर्त्याला समजत नसेल तर तो कार्यकर्ता आपल्या नेत्याचा अनुयायी नाही.

निश्चितपणे आमचा नेता असा आहे, की माझा अनुभव असा आहे, की ज्यावेळीही माझ्यावर कोणतेही संकट आले, कोणताही दु:खाचा क्षण आला, तर सुखाच्या क्षणी नाही, पण दु:खाच्या क्षणी आमचे नेते पवार साहेबांचा फोन येतो आणि काय परिस्थिती आहे याची माहिती घेण्याचं काम आमच्या नेत्यानं केलं आहे. कोणताही नेता आपल्या कार्यकर्त्याचे दु:ख वाटून घेण्याची क्षमता ठेवत असेल, त्याला समजून घेण्याचा प्रयत्न करतो तर त्यापेक्षा महान व्यक्ती कोणी असू शकत नाही असे आम्हाला वाटतं. आपल्या सर्वांची जबाबदारी आहे, की आज संपूर्ण देश पवार साहेबांकडे अपेक्षेने पाहात आहे. संपूर्ण देशाची इच्छा आहे की या देशात कुठे ना कुठे परिवर्तन घडवण्यासाठी तिसरी आघाडी निर्माण करण्याचे काम केले जावे. या देशात ज्या पद्धतीने शेतकरी त्रस्त आहेत, युवक त्रस्त आहे, देशामध्ये वेगळ्या प्रकारची विचारधारा देशात विष कालवण्याचं काम करत आहे, धर्माच्या नावावर मतभेद निर्माण करण्याचे काम केले जात आहे, जातीच्या नावावर संघर्ष उभा करण्याचं काम केले जात आहे त्यावेळी निश्चितपणानं आदरणीय पवार साहेबांच्या विचारांनीच आपण ही लढाई लढू शकतो आणि आपल्या सर्वांना ही लढाई जिंकण्याचं काम करावं लागेल.

मी तुम्हा सर्वांना विनंती करू इच्छितो, की अनेक लोक गोंधळ निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. जर कोणी गोंधळून गेला, तर अपघात होतात. कोणी काही सांगितलं, तरी तुम्हाला पूर्णपणे आपला नेता, त्यांचे विचार काय आहेत, ते कोणत्या पद्धतीचे राजकारण या देशात करू इच्छित आहेत हे पूर्णपणे समजून घेण्याचं काम करावं लागेल. आपल्या सर्वांची ही जबाबदारी आहे. आज आदरणीय पवार साहेबांच्या आशिर्वादाने, पवार साहेब मी खूप आभारी आहे. मी तुम्हाला लक्षात आणून देऊ इच्छितो, की मी समाजवादी पक्षात होतो. काही वैचारिक लढाई माझी झाली. मला पक्ष बदलायचा

होता. काँग्रेसमध्ये जाण्याचा निर्णय घेतला होता. मंत्रालयातून निघालो. बीकेसीमध्ये माझी गाडी पोहचली होती. एक फोन आला, की मी शरद पवार बोलतोय. माझे हातपाय गळाले, की पवार साहेबांचा फोन का आला. तुम्ही काँग्रेस पक्षात जाणार आहात का अशी विचारणा झाली. मी हो म्हणून सांगितलं. म्हणाले, की तुम्हाला काँग्रेसमध्ये जायचं नाही, तुम्हाला राष्ट्रवादीमध्ये यायचंय. दिलीप वळसे-पाटलांना भेटा आणि पक्षात या. तुम्ही मला निमंत्रण दिले. पक्षात घेतलं. मला वाटतं, की तुम्ही मला माझ्या क्षमतेपर्यंत पोहोचवण्याचं काम केलं. तुम्ही कार्यकर्त्यांना ओळखणारे नेते आहात असं मी मानतो.

आज नवाब मलिक महाराष्ट्रात नाही, तर संपूर्ण जगात नवाब मलिकची ओळख निर्माण झाली आहे, तर मला वाटते, की पवार साहेबांमुळेच नवाब मलिकची ओळख जगामध्ये निर्माण झाली आहे. मी मनापासून तुमचे आभार मानतो आणि आश्वासन देतो आदरणीय साहेब, की तुम्हाला संघर्ष उभा करावा लागेल. देश तुमच्याकडे पाहात आहे आणि कार्यकर्त्यांनीही लक्षात घेतलं पाहिजे, ज्या पद्धतीने या देशात भारतीय जनता पक्ष लोकांना, जयंत पाटीलजींनी सांगितलं, की जर बोलाल तर पाहुणे तुमच्या घरी येतील. आम्हाला वाटतं, की पाहुणे कोणाच्या घरी येण्यामुळे, कोणी पाहुणा कोणाच्या घरातून काही घेऊन जाऊ शकत नाही. आम्ही त्यांचे स्वागत करण्यासाठी तयार असू, तर पाहुणे येतील आणि जातील. आपली जबाबदारी आहे, की आपण लोकांनी निर्भयपणे, निडर होऊन अन्याय, अत्याचाराच्याविरोधात उभं राहिलं पाहिजे. आपल्याला आपल्या नेत्याप्रमाणे, जो योद्धा महान आहे, त्याचप्रमाणे त्याच्या पावलावर पाऊल टाकत अन्याय, अत्याचाराच्याविरोधात उभं राहावं लागेल



काल मुंबईत मुस्लिम आरक्षणासाठी मोर्चा काढण्यात आला. मला आठवतंय, की नाशिकमध्ये पक्षाची बैठक होणार होती. आम्हाला सगळ्यांना बोलावण्यात आलं. महाराष्ट्रात मराठा आरक्षणाची मागणी जोर धरत होती. मला बोलावून सांगण्यात आलं, की नाशिकच्या अधिवेशनात मुस्लिमांना आरक्षण मिळावे अशा प्रकारचा प्रस्ताव तुम्हाला सादर करावा लागेल आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या नाशिक अधिवेशनामध्ये २००३ किंवा २००४मध्ये तो प्रस्ताव मंजूर करण्याचं काम आम्ही केलं. सच्चर समितीची स्थापना करण्याचं काम आदरणीय पवार साहेबांच्या नेतृत्वाखाली झाले. जेव्हा देशात मराठा आरक्षणाची चर्चा होऊ लागली, मुस्लिम आरक्षणाची चर्चा होऊ लागली, तेव्हा निश्चितपणे २०१४च्या पूर्वी मराठा आरक्षणाबरोबरच मुस्लिमांनाही आरक्षण देण्याचं काम करण्यात आलं. काल काही नेते येऊन आम्हाला प्रश्न विचारत होते, की मुस्लिमांना आरक्षण का दिले जात नाही. शिवसेना, राष्ट्रवादी आणि काँग्रेस पक्षांवर टीका होत होती. मला त्यांना विचारायचंय, की आम्ही आरक्षण दिलं. मात्र, बीजेपीनं कायदा मंजूर होऊ दिला नाही. त्यांच्यावर का टीका केली जात नाही. निश्चितपणे आदरणीय पवार साहेबांनी काही निर्णय घेतला होता, तर संपूर्ण पक्ष त्यासोबत उभा आहे.

आज मराठा आरक्षणाचा विषय सुप्रिम कोर्टात आहे. ज्यादिवशी त्याचा निकाल येईल, निश्चितपणे आगामी काळात मुस्लिम आरक्षणासंबंधीही निर्णय घेण्याचं काम आम्ही करू. आदरणीय पवार साहेबांचे धोरण असं आहे, की देशामध्ये, महाराष्ट्रात समतेवर आधारित समाज निर्माण व्हावा. महिला असो, युवक असो, मागास असो, भटके असो, आदिवासी असो, अल्पसंख्याक असो सर्वांना समान अधिकार मिळाला पाहिजे. सर्वांचा एकसमान विकास झाला पाहिजे. हाच विचार घेऊन आमचा पक्ष, आम्ही काम करणारे लोक आहोत. आम्हाला वाटते, की बाहेरून येणाऱ्या लोकांनी महाराष्ट्राची चिंता कमी केली पाहिजे. त्यांना खूप काम पाहिजे असेल तर उत्तर प्रदेशात निवडणूक आहे त्याठिकाणी जाऊन काम करावे. महाराष्ट्राची जनता तुम्हा लोकांना कधी स्वीकारणार नाही. आदरणीय पवार साहेबांच्या नेतृत्वाखाली आम्ही सर्वजण उभे राहू आणि महाराष्ट्रात सातत्याने जिंकण्याचं काम करू.

साहेब, आज आपला ८१वा वाढदिवस आहे. तुम्ही योद्धा आहात. तुम्ही सर्व चक्रे मोडून काढता आणि आम्ही ईश्वराकडे प्रार्थना करतो, तुम्हाला दीर्घायुष्य मिळो आणि तुम्ही आम्हा लोकांचे मार्गदर्शक बनून राहावे. एवढं बोलून मी माझे दोन शब्द संपवतो. धन्यवाद!



# साहेबांचा शाश्वत विकासाचा, समतेचा विचार मनात रुजवावा

## खासदार डॉ. अमोल कोल्हे यांचे विचार

आजचा हा केवळ अभिष्टचिंतन सोहळा आहे, असं मला वाटत नाही. पण, देश एका वैचारिक घुसळणीतून जात असताना आदरणीय साहेबांचं मार्गदर्शन हे एक विचारमंथन आहे आणि हे विचारमंथन अशासाठी आहे. कारण, विशेषत: आजच्या काळामध्ये एखाद्या विपरित परिस्थितीशी लढण्याची, एखाद्या विपरित परिस्थितीशी संघर्ष करण्याची आणि तो संघर्ष करत असताना शाश्वत विकासाची कास न सोडण्याचं जे आज देशातलं सर्वोत्तम उदाहरण आहे, ते म्हणजे आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेब आणि त्यांचं मार्गदर्शन आज यानिमित्तानं ऐकायला मिळणार आहे.

खरं तर आपण जेव्हा मॅरेथॉन पाहतो, तेव्हा मॅरेथॉनमध्ये दोन प्रकारचे स्पर्धक असतात. एक स्पर्धक असतो, की एवढा लांबचा पल्ला गाठल्यानंतर तो धापा टाकत शर्यत पूर्ण केली या विजयाचा आनंद फक्त साजरा करतो. हा एक प्रकारचा स्पर्धक असतो. आणि दुसरा स्पर्धक असतो, जो हा टप्पा पूर्ण केल्यानंतर तो सुद्धा दमतो, तोसुद्धा माणूस असतो. पण, तो एक दीर्घ श्वास घेतो आणि त्यानंतर आलेल्या टप्प्याकडं मागं वळून पाहतो आणि पुन्हा पुढच्या टप्प्याचा विचार करायला सुरूवात करतो अशा दुसऱ्या मॅरेथॉनच्या खेळाडूचं खरं तर आपण अभिष्टचिंतन साहेबांच्या रूपानं करतो आहोत.

म्हणजे आज जर आपण देशपातळीवरच्या राजकारणाचा विचार केला तर, माझ्यासारख्या एका सर्वसामान्य कार्यकर्त्याला एक गोष्ट निदर्शनास येते आणि ती म्हणजे, महाराष्ट्रातल्या ज्या नेतृत्वांनी देशाच्या राजकारणावर आपला जो एक अमिट ठसा उमटविलांय, यामधील जर नावं मोजायला सुरूवात केली, तर धक्काही बसेल, आश्चर्यही वाटेल. पण, ही नावं हाताच्या बोटावर मोजण्याइतकी असतात. स्वर्गिय यशवंतराव चव्हाण साहेब असतील, स्वर्गिय बॅरिस्टर नाथ पै असतील, स्वर्गिय मधु लिमयेजी असतील, स्वर्गिय मधु दंडवतेजी असतील, स्वर्गिय प्रमोदजी महाजनी असतील, स्वर्गिय शंकररावजी चव्हाण असतील, आत्ता व्यासपीठावर उपस्थित असलेले प्रफुल्लभाई पटेल असतील, नितीनजी गडकरी असतील. पण, या सगळ्या मांदियाळीमध्ये एक गोष्ट तुमच्या-माझ्यासाठी अभिमानाची आहे, की गेल्या तब्बल ४० वर्षांहून अधिक काळ एक व्यक्ती दिल्लीतील महाराष्ट्राची ओळख बनून राहिलेली आहे आणि ती व्यक्ती म्हणजे आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेब. आणि ही ओळख बनून राहिलेली असताना केवळ राजकारण नाही, केवळ पुरोगामीत्व ही गोष्ट व्यासपीठावरनं बोलण्याची नाही, तर पुरोगामीत्व म्हणजे जातीय द्वेष नाही, पुरोगामीत्व

म्हणजे बारा बलुतेदार, सोळा अलुतेदारांना सत्तेच्या प्रवाहात सामील करून घेऊन त्यांना प्रत्येकाला विकासाची संधी देणं हे पुरोगामीत्व जपणारं नेतृत्व म्हणजे आदरणीय पवार साहेब.

केवळ फुले-शाहू-आंबेडकरांचा वसा, फुले-शाहू-आंबेडकरांचा वारसा ही व्यासपीठावरून केवळ सांगण्याची गोष्ट आदरणीय साहेबांच्या बाबतीत राहात नाही. म्हणजे ज्या महात्मा जोतिराव फुले आणि सावित्रीबाई फुलेंनी महिलांच्या शिक्षणाची कवाडं खुली केली, त्याच महिलांना लष्करात भरती करण्याचा जो क्रांतीकारी निर्णय असेल, स्थानिक स्वराज संस्थांमध्ये आरक्षण देण्याचा जो क्रांतीकारी निर्णय असेल, तो निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी करून आदरणीय पवार साहेब हे फुलेंचे वैचारिक वारसदार ठरतात. जेव्हा राजर्षी शाहू

आयटी पार्कमध्ये जवळपास एक लाखापेक्षा जास्त तरूणांना सॉफ्टवेअर क्षेत्रातला रोजगार मिळतो. तीच गोष्ट मगरपट्टा सिटीची. आणि या पद्धतीनं आधुनिकतेचा पुरस्कार करत, उद्यमशीलतेचा पुरस्कार करत साहेब राजर्षी शाहू महाराजांचे वैचारिक वारसदार ठरतात.

मघाशी प्रदेशाध्यक्ष जयंतरावजी पाटील साहेबांनी जो उल्लेख केला, मराठवाडा नामविस्ताराचा जो उल्लेख केला, म्हणजे तत्त्वांसाठी कितीही किंमत चुकवावी लागली, तरी तत्त्वांशी तडजोड न करता मराठवाडा विद्यापीठाचं डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ हा जो नामविस्ताराचा साहेबांनी निर्णय घेतला, केवळ एवढाच निर्णय नाही, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांकडे केवळ दीन-



महाराजांचा विचार येतो, राजर्षी शाहू महाराजांच्या चरित्राचा विचार करत असताना जगात जे चांगलं आणि जे नवं ते माझ्या करवीर संस्थानासाठी हवं ही जी भावना होती, ही जी भूमिका होती, त्याचपद्धतीनं औद्योगिकरणाची कास असेल, नाविन्याची कास असेल, तंत्रज्ञानाची कास असेल, ती घेऊन पुढे जात असताना, म्हणजे आपल्या सगळ्यांना आदरणीय साहेबांचा हिंजवडी आयटी पार्कच्याबाबतीला किस्सा ठाऊक आहे.

म्हणजे संत तुकाराम साखर कारखान्याच्या भूमीपूजनाच्या प्रसंगी आदरणीय साहेबांनी सांगितलं, की भूमीपूजन झालं तरी कारखाना इथं होणार नाही. त्याची जागा २० मैलाच्या पलिकडं आहे. सगळे अवाक झाले, तेव्हा साहेबांनी सांगितलं, याठिकाणी आयटी पार्क करायचंय. गेल्या २०-२५ वर्षांपूर्वीचा जवळपास हा निर्णय, पण आज त्याच

दलितांचे कैवारी म्हणून नाही, तर जागतिक पातळीवरचे अर्थतज्ज्ञ म्हणून जेव्हा आदरणीय पवार साहेब पाहतात, तेव्हा ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराचे खरे वैचारिक वारसदार ठरतात.

बरं हे सगळं करत असताना आम्हाला अभिमान आहे, की आमच्या नेत्याला पाच लाखाचा सूट घालावा लागत नाही. आमच्या नेत्याच्या पांढऱ्या कपड्यांमध्ये सर्वसामान्यांच्या प्रश्नांची जाण असते. आमच्या नेत्याला हजारो-लाखो रूपयांचे तैवानी मशरूम खावे लागत नाहीत, तर महाराष्ट्रातल्या प्रत्येक तरूणाच्या प्रश्नाला भीडताना आमचा नेता दिवसेंदिवस अधिक तरूण होत जातो. आमच्या नेत्याच्या खिशाला लाखो रूपयांचा मोबलॉनचा पेन लागत नाही, साधा पायलटचा पेन असतो, पण त्या पायलटच्या पेननी ७० हजार कोटी रूपयांच्या शेतकऱ्यांच्या कर्जमाफीवर स्वाक्षरी होते. इथं मला वाटतं, की

आमचा नेता हा वेगळा ठरतो.

मघाशी जी शॉर्ट फिल्म दाखवली, त्यामध्ये एक फार महत्त्वाची ओळ होती, जी मला फार भावली. ती ओळ होती, हर अर्जुन का सारथी. जेव्हा हर अर्जुन सारथी आपण म्हणतो, तेव्हा मी, माझ्यासारखा सर्वसामान्य मध्यमवर्गीय कुटुंबातला पोरगा डोळे विस्फारून पाहात असतो, १० जनपथवरची वर्दळ आणि जेव्हा बिहारची निवडणूक होते, बिहारच्या निवडणुकीत जी रणधुमाळी होते, आणि ती रणधुमाळी गाजवणारे तेजस्वी यादवसुद्धा आवर्जुन साहेबांना भेटायला येतात आणि पश्चिम बंगालमध्ये सुद्धा निवडणुकीच्या आधी साहेबांच्या पत्राची पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी या आतुरतेने वाट पाहात असतात. हर अर्जुन का सारथी आणि ही आता फार महत्त्वाची गरज आहे. काळाची गरज आहे. आणि ती काळाची गरज अशासाठी, की आज कुरूक्षेत्रासारखी परिस्थिती देशाची निर्माण झालीय आणि या देशाची जी परिस्थिती निर्माण झालीय, तेव्हा तुमच्या-माझ्यासारख्या तरूणांना हा विचार करण्याची आज गरज आहे.



जे आजपर्यंत झालं, जी प्रगती झाली त्याचा अभिमान आहे. या सगळ्या गोष्टी मान्य आहेत. पण यापुढचा २५-३०-५० वर्षांचा महाराष्ट्र आपल्याला कसा हवाय २५-३०-५० वर्षांनंतरचा देश आपल्याला कसा हवाय. तुम्ही आणि मी फार भाग्यवान आहोत, की या लढाईसाठी मार्गदर्शन करणारा सेनापती आदरणीय साहेबांच्या रूपानं खंबीरपणे आपल्यासोबत आहे. पण एक मात्र ध्यानात ठेवावं लागेल, सेनापती मार्गदर्शन करू शकतो, सेनापती रणनीती आखू शकतो. पण लढायचंय मात्र तुम्हाला, आम्हाला लढावं लागेल. तुम्हाला, आम्हाला कंबर बांधावी लागेल, तुम्हाला, आम्हाला शस्त्र परजावी लागतील आणि तुम्हाला, आम्हाला या लढाईत विजयी व्हायचं असेल, तर आदरणीय साहेबांचा शाश्वत विकासाचा, समतेचा विचार हा प्रत्येकाला आपापल्या मनात रूजवून घ्यावा लागेल.

आदरणीय साहेबांच्या बाबतीत एक फार अभिमानास्पद आठवण ही माझ्यासारख्या कार्यकर्त्याला वाटते. जेव्हा भुजचा भूकंप झाला होता, त्या प्रलयकारी, विनाशकारी भूकंपानंतर तत्कालिन पंतप्रधान अटलबिहारीजी वाजपेयी यांनी उद्गार काढले होते आदरणीय साहेबांविषयी, की पुरी संसद में, विपक्ष में वे अकेले थे, जिन्होने मदत का हाथ आगे बढाया था. आज कदाचित साहेब भलेही म्हणतील, त्यांना कोणत्याही पदाची लालसा नाही, त्यांना कोणत्याही पदाची अपेक्षा नाही. पण साहेब या देशाला आज गरज भूजच्या भूकंपाच्यावेळी तुम्ही जो पुढाकार घेतला होता, तसे भूकंपाचे हादरे आजही देशाला बसतायंत, सांप्रदायिकतेच्या भूकंपाचे हादरे बसतायंत, जातीयतेच्या भूकंपाचे हादरे बसतायंत. धार्मिक उन्मादापायी शाळांवर आमचे समूह चाल करून चाललेत, समाज समाजापासून तुटला जातोय आणि प्रत्येक जाती समुहामध्ये, प्रत्येक समाजामध्ये इतक्या टोकाच्या भूमिका निर्माण होतायंत, की त्या टोकदार भाल्यांनी आज देशही रक्तबंबाळ होतोय.

म्हणूनच माझ्यासारख्या तरूणाच्या मनात एक प्रश्न निर्माण होतो, की देशाला आपल्या मार्गदर्शनाची गरज आहे आणि जर २६ खासदार असलेल्या गुजरातमधील व्यक्ती पंतप्रधानपदी बसू शकते, तर ४८ खासदार असलेल्या महाराष्ट्रातला महाराजांचा मावळा हा त्या सर्वोच्चस्थानी विराजमान का होणार नाही हा विचार आम्ही प्रत्येकानं करण्याची गरज आहे आणि ज्या दिवशी हे स्वप्न पूर्ण होईल त्यादिवशी खात्रीनं सांगतो, संसदेच्या प्रांगणातला छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळासुद्धा या मराठी मातीतल्या सुपुत्राला त्यास्थानी बसल्यानंतर समाधानानं हसताना दिसेल अणि जेव्हा हा पुतळा समाधानाने हसेल, ते स्वप्न पूर्ण करण्याची ताकद आई जगदंबा आपल्या प्रत्येकाला देवो, अशी सदिच्छा व्यक्त करतो. आदरणीय साहेबांचं पुन्हा एकदा त्यांच्या ८१व्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन करतो आणि थांबतो. जयहिंद! जय महाराष्ट्र!! जय शिवराय!!!

# एक तास राष्ट्रवादीसाठी

## जयंत पाटील यांच्या उपस्थितीत साखराळे गावात उपक्रमाचा शुभारंभ

**एक तास राष्ट्रवादीसाठी... आगामी महाराष्ट्राच्या विकासासाठी... प्रभावी....प्रगल्भ... तरुण पुरोगामी विचारांसाठी... प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांची संघटनात्मक कामाने नववर्षाची सुरुवात. आदरणीय शरद पवारसाहेबांच्या वाढदिवशी केलेल्या घोषणेची अंमलबजावणी सुरू...या उपक्रमाच्या माध्यमातून राष्ट्रवादी विचारांच्या कार्यकर्त्यांची मोट बांधण्याचा प्रयत्न...**

मुंबई दि. १ जानेवारी - आज नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी वाळवा तालुक्यातील साखराळे गावात उपस्थित राहून 'एक तास राष्ट्रवादीसाठी... आगामी महाराष्ट्राच्या विकासासाठी... प्रभावी... प्रगल्भ... तरुण पुरोगामी विचारांसाठी' ... राष्ट्रवादी पक्षाच्या या उपक्रमाची सुरुवात प्रदेशाध्यक्ष आणि जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांनी केली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला देशाचे नेते आदरणीय शरद पवारसाहेबांचे मार्गदर्शन लाभलेले आहे. आपल्या पक्षाच्या मागे विचारांची एक मोठी ताकद आहे. या विचारांचा प्रसार करण्यासाठी आपण हा उपक्रम राबवत आहोत. या उपक्रमाच्या माध्यमातून राष्ट्रवादी विचारांच्या कार्यकर्त्यांची मोट बांधण्याचा आपला प्रयत्न आहे असे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी स्पष्ट केले.

महिन्याच्या पहिल्या शनिवारी पक्षाच्या कार्यकर्त्यांनी एकत्र येत बैठक घ्यावी... वैचारिक देवाणघेवाण करावी... आपल्या गावाचा... तालुक्याचा... शहराचा... जिल्ह्याचा विकास कसा होईल यासाठी विचारमंथन करावे. आपला पक्ष हा शिस्तप्रिय आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये शिस्त रुजली पाहिजे यासाठी प्रयत्न करावा असे आवाहन अध्यक्ष आदरणीय शरद पवारसाहेबांच्या वाढदिवशी जयंत पाटील यांनी केले होते त्याची सुरुवात आजपासून केली. महाराष्ट्रात एकही असा तालुका नाही जिथे पवारसाहेबांच्या विचारांना मानणारा वर्ग नाही. माणसाने आयुष्यात काय कमावले पाहिजे तर ती माणसं... हे पवारसाहेबांनी त्यांच्या पाठीशी उभ्या राहिलेल्या माणसांच्या धनामुळे सिद्ध केले आहे. पवारसाहेबांच्या विचारांची वैचारिक शिदोरी आपल्याकडे आहे ती शिदोरी महाराष्ट्रातील तळागाळातील कार्यकर्त्यांपर्यंत पोहोचली पाहिजे, या विचारधारेने प्रत्येक कार्यकर्ता प्रेरीत झाला पाहिजे. हा विचार तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी एक तास राष्ट्रवादीसाठी... आगामी महाराष्ट्राच्या विकासासाठी...हा उपक्रम आम्ही हाती घेतला आहे असेही जयंत पाटील यांनी सांगितले.



सध्या उपलब्ध असलेल्या प्रत्येक माध्यमातून सातत्याने होणाऱ्या जातियवादी विचारांच्या प्रसाराऐवजी एक प्रगल्भ नवी पिढी जर आपल्याला घडवायची असेल तर एक - दोन तास पक्षासाठी देणे आवश्यक आहे असेही जयंत पाटील म्हणाले.

*With Best Compliments From*



**SHREE GURU PHARMA**

# पवार साहेबांची भाषणं म्हणजे एक विचारयात्रा

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय खासदार श्री. शरदचंद्र पवार साहेब यांच्या ८१व्या वाढदिवसानिमित्त ज्येष्ठ पत्रकार आणि राष्ट्रवादी मासिकाचे संपादक डॉ. सुधीर भोंगळे यांनी आदरणीय पवार साहेबांच्या काही निवडक भाषणांचे संकलन केलेले ‘नेमकेचि बोलणें’ या ग्रंथाचे प्रकाशन ११ डिसेंबर, २०२१ रोजी मुंबईतील नेहरू सेंटरमध्ये झाले. या कार्यक्रमात खासदार संजय राऊत यांनी केलेले भाषण...



# या ग्रंथाचा मुंबईत झालेला प्रकाशन समारंभ

मी कवी सौमित्र यांना सांगितलं, की मी प्रथमच पुस्तक घेऊन भाषणाला उभा राहिलोय. हे साहेबांचं पुस्तक आहे आणि यातील साहेबांच्या विचारांना भगवं कव्हर घातलंय. आपण जो महाविकास आघाडीचा एक ग्रंथ निर्माण केलेला आहे, त्या ग्रंथाला भगवं कव्हर आपण घातलेलं आहे, त्याबद्दल सुधीर भोंगळे मी आपला आभारी आहे. आपण पवार साहेबांचा विचार कसा, कुठे नेत असतो आणि एकमेकांच्या रंगात आपण कसे मिसळत असतो. म्हणजे हे सरकार कसं चाललंय. बेरंग नाहीये. अवघा रंग एकचि झाला. आम्ही कुठल्या रंगाला भुलत नाही. महाराष्ट्राचा रंग आहे. महाराष्ट्र धर्माचा रंग आहे.

सुधीर भोंगळे यांनी एक ऐतिहासिक काम करून ठेवलेलं आहे पुढल्या पिढीसाठी. आमच्या सगळ्यांसाठी. नेमकचि बोलणे...आणि उत्तम असं शीर्षक आहे पुस्तकाचं. हे आपण का दिलंय हेसुद्धा त्याच्यामध्ये सांगितलंय. नेमकचि बोलणे हे पुस्तक आपण प्रधानमंत्री मोदी यांना पाठवायला हवं. शेवटी महाराष्ट्र हा देशाला सतत काहीतरी विचार देत असतो आणि शरद पवार साहेब सतत विचार देत असतात. त्याच्यामुळे ही जी ६१ भाषणे आहेत आणि पानांची संख्या ५१२ ही जी तुम्ही मघाशी खडकीच्या दारूगोळ्याचं सांगितलं, आमच्याकडं दारूगोळा खूप आहे. तो कधी फोडायचा, कसा फोडायचा हे आम्हालासुद्धा माहित आहे. बाळासाहेब थोरातसुद्धा बसलेले आहेत आमचे. तर हे जे तुमचे पुस्तक आहे, ते आम्ही सगळे जाऊन प्रधानमंत्री मोदी यांना देऊ, नेमकचि बोलणे याची फोड करून आम्ही त्यांना सांगू आणि आमचे जे नेते आहेत, माननीय शरद पवार, ते याच्याशी कसे घट्ट, म्हणजे ते विचारांशी पक्के असतात.

मी प्रथमच पुस्तक हातात घेऊन बोलतोय. कारण, मी अनेकदा पवार साहेबांना पाहिलंय. ते जेव्हा एखाद्या पुस्तकाच्या प्रकाशन कार्यक्रमाला येतात, तेव्हा ते संपूर्णपणे पुस्तक वाचून येतात. पुस्तकावर लाल रंगाच्या अगदी छान खुणा केलेल्या असतात. आपण कधी त्यांच्या घरी गेलात, कार्यालयात गेलात, तर अशी अनेक पुस्तके त्यांनी वाचलेली असतात. काही नेत्यांकडे पुस्तके फक्त लावलेली असतात आणि यांच्याकडे वाचलेली असतात. छान खुणा केलेल्या असतात. त्यावर एखादा कागद लावलेला असतो. पण, हे पुस्तक सुधीर भोंगळे यांनी आम्हाला काल दिलं उशिरा आणि ते काय संपूर्ण वाचता आलं नाही. पण, तीसुद्धा त्यांनी व्यवस्था

**'नेमकचि बोलणें' या पुस्तकाचे संजय राऊत व रंगनाथ पठारे प्रकाशन करताना शेजारी व्यासपीठावर डावीकडून शंभू पाटील, चिन्मयी सुमित, किशोर कदम, डॉ. सुधीर भोंगळे, हेमंत टकले, अनंत बागाईतकर, लता रवींद्र मनस्विनी आणि संदीप मेहता.**



केली, की त्यातील पाच ते सहा प्रकरणं त्यांनी आम्हाला वाचून दाखविली. त्याच्यामुळे आमचं वाचनसुद्धा बरचंसं झालं.

बाळासाहेब ठाकरे आमचे शेवटी शेवटी, त्यांना वाचायला येत नव्हतं, तेव्हा आम्ही त्यांना पुस्तक वाचून दाखवायचो. वृत्तपत्र वाचून दाखवायचो. आणि ते ऐकण्यात सुद्धा फार चांगली मजा असते. या पुस्तकाचं वैशिष्ट्य काय आहे? रंगनाथ पठारे आपण एक आठवण करून दिली मघाशी. समाज माध्यमावर किंवा वृत्तवाहिन्यांवर, मी पवार साहेबांना खुर्ची दिली बसायला दिल्लीत, त्याच्यावर काही लोकांनी टिका-टिप्पण्या सुरू केल्या. पण मी पवार साहेबांना बसायला खुर्ची का दिली हे समजून घ्यायचं असेल, तर त्यांनी ६१ भाषणं वाचली पाहिजेत. जे टिकाकार आहे, जे अत्यंत विकृत पद्धतीनं त्या प्रसंगावर टीका करत होते, त्यांनी हे पुस्तक, त्यांनी हा ग्रंथ हे वाचल्यावर त्यांना कळेल, की माझ्यासारख्या एका सामान्य लेखकानं, पत्रकारानं, राजकीय कार्यकर्त्यानं पवार साहेबांना खुर्ची का दिली. कारण, तो त्यांचा मान आहे. विद्वत्तेचासुद्धा मान आहे. पण, आपल्या देशामध्ये जे विकृत राजकारण सध्या सुरू आहे, त्याच्यावर सुद्धा माननीय पवार साहेबांनी २५-३० वर्षापूर्वी त्यांच्या भाषणातून कोरडे ओढलेले आहेत.

आपण जर पाहिलं असेल, या भाषणांना नुसतं तुम्ही जे टायटल दिलेलं आहे, शीर्षकं दिलेली आहेत, त्याच्यामध्ये आहे ना, त्यांनी तेव्हासुद्धा भाजपला देशाचं ऐक्य नकोच आहे हे त्यांनी १९९२ साली सांगितलंय. आम्हाला दोन वर्षापूर्वी थोडं लक्षात आलं. पण, त्यांची दूरदृष्टी बघा. ते तेव्हापासून आम्हाला सांगतायंत, की भाजपा देशाचे तुकडे करतायंत. संघाला लोकांनी नागपुरात वाढू दिलं नाही. आता नितीन गडकरी आहेत, आपले संबंध जरा चांगले आहेत साहेब, राहू द्या. भाजपा देशाला उलट्या दिशेने नेतोय हे पवार साहेबांनी साधारण ९६च्या आसपास सांगितलेलं आहे. आम्हाला आता कळायला लागलं ते, की भाजपा देशाला किती उलट्या दिशेने नेतोय. मी यासाठी हे बोलतोय, की विचार मांडायचा नाही ही प्रवृत्ती झुंडशाही वाढवणारी आहे हे भाषण आपण पूर्णपणे वाचलं पाहिजे. प्रश्न विचारणाऱ्यांची सध्या देशामध्ये काय अवस्था आहे हे आपण पाहतो आणि त्याच्या नेमकं उलट पवार साहेबांचं आहे. त्यांना प्रश्न विचारलेले आवडतात. त्यांना उत्तर द्यायला आवडतं. त्यांना उत्तर शोधायला आवडतं



हे आपण पाहतो.

सध्या संसदेमध्ये आम्ही जातो. आमच्या संसदेमध्ये सेंट्रल हॉल आहे. बागाईतकरांना मी दोन वर्षांनी भेटतोय. काही वर्षापूर्वी आम्ही रोज भेटायचो. सतत भेटायचो. तासन् तास भेटायचो. आम्ही सेंट्रल हॉलमध्ये भेटायचो. तिथे महाराष्ट्रातले सगळे पत्रकार, महाराष्ट्रातले सगळे नेते, पवार साहेब, सगळे आम्ही बसायचो. तास-दोन तास, तीन-तीन तास आम्ही विचार करायचो. पण एकमेकांशी संवाद होता कामा नये या देशातील लोकांचा, विचारांचं आदान-प्रदान होता कामा नये, त्याच्यामुळं संसदेच्या सेंट्रल हॉलमध्ये पत्रकारांना येण्यापासून निर्बंध आणले गेले. तेव्हापासून तिकडला संवाद हा पूर्णपणे तुटला. त्याच्यावरसुद्धा साधारण १९९० साली ही प्रवृत्ती काय आहे, त्याच्यावर पवार साहेबांचं भाषण आहे. विचार मांडायचाच नाही ही प्रवृत्ती झुंडशाही वाढवणारी आहे. या सगळ्या झुंडशाहीचा सध्या आपण सामना करतो आहोत.

राज्यातील नव्हे; तर देशातील जनतेला हिम्मत देणारं, महाराष्ट्रातील जनतेच्या अस्मितेला जपणारं, त्यातील कर्तबगारीला संधी देणारं, तिच्यातील कार्यक्षमतेला वळण लावणारं असं शरद पवार साहेबांचं नेतृत्व आम्ही गेल्या अनेक वर्षांपासून, आमच्या शालेय जीवनापासून पाहतोय. अनेकदा आम्ही त्यांच्यावर टीकासुद्धा केली बाळासाहेब असताना. तरीही यशवंतराव चव्हाण यांचा वारसा सांगणारे, आज जरी आम्ही यशवंतरावांचा उल्लेख करतो, म्हणजे मला ती अनेक भाषणं वाचताना वाटलं, की यशवंतराव चव्हाण आपल्याशी बोलतायंत. अनेक विषयांत मी पाहिलं. यशवंतरावांचे जे ग्रंथ आहेत, साहित्य आहे त्याचं प्रतिबिंब मला या प्रत्येक भाषणात, अनेक विषयांत जाणवलं. विशेषत: सहकारी साखर कारखान्यांचा विषय असेल, शेतकऱ्यांचा विषय असेल, महाराष्ट्राच्या अस्मितेचा विषय असेल, मराठी भाषेचा विषय असेल, या प्रत्येक विषयावरती यशवंतरावांनी आपली मतं ठामपणे मांडलेली आहेत आणि त्याच पद्धतीनं आणि त्याच विचारानं या ६१ भाषणांमध्ये मला प्रत्येक ठिकाणी असं

**ग्रंथ प्रकाशन समारंभात दै. 'सामना'चे कार्यकारी संपादक संजय राऊत बोलत असून या समारंभाचा समोर प्रेक्षागृहात बसून आनंद अनुभवताना शरद पवार, प्रतिभाताई पवार, बाळासाहेब थोरात, दिलीप वळसे पाटील, छगन भुजबळ, फौजिया खान, वंदना चव्हाण, निर्मला सामंत-प्रभावळकर व इतर मान्यवर.**



वाटलं, की कुठंतरी यशवंतरावसुद्धा आपल्याशी हितगुज करतायंत.

यशवंतराव चव्हाणांचे राजकीय वारसदार म्हणून जेव्हा आपण पवार साहेबांचा उल्लेख करतो, तेव्हा त्याचा अर्थ असा असतो, की यशवंतरावांनी महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर ज्या प्रकारचं भावी महाराष्ट्राचं चित्र आपल्या मनात रंगवलं होतं, त्या चित्रानुसार या राज्याला, या समाजाला, या राज्यशकटला दिशा आणि गती देण्याचं काम गेल्या साधारण ४०-४५ वर्षांमध्ये माननीय पवार साहेबांच्या नेतृत्वानं केलेलं आहे. त्यात ते अनेकदा राज्यामध्ये सत्तेवरती होते. अनेकदा ते विरोधी पक्षात असतील. प्रदीर्घ काळ दिल्लीमध्ये काम करतात. पण घेतल्या होत्या. अनेक विषयांवर ते आपली मतं व्यक्त करत गेले. त्याचेही ग्रंथ आम्ही काढलेत. नव्या लोकांना, पुढल्या पिढीला आपल्या आधीच्या लोकांनी काय करून ठेवलंय, कोणते विचार मांडलेत हे समजून घेणं गरजेचं असतं.

लोकमान्य टिळक यांनी जेव्हा स्वराज्याची मोहीम सुरू केली १८९५नंतर, त्यांची टिपणं कोणी केली असतील, त्यांच्या भाषणांची. तेव्हा आताच्यासारख्या सुविधा नव्हत्या. टेप करणं, रेकॉर्डिंग करणं, व्हिडिओ करणं. दादासाहेब खापर्डे त्यांच्याबरोबर असायचे. आणि दादासाहेब खापर्डे स्वराज्याची मोहीम या नावानं टिळकांची सगळी भाषणं त्या काळात संपूर्ण महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात आणि महाराष्ट्राच्या बाहेरसुद्धा,



संजय राऊत यांचा आदिती नलावडे पुस्तक देऊन सत्कार करताना शेजारी कवी सौमित्र ऊर्फ किशोर कदम आणि डॉ. सुधीर भोंगळे

जेव्हा जेव्हा त्यांच्याशी आपण संपर्क किंवा संवाद साधण्याचा प्रयत्न केला, त्या प्रत्येक वेळेला त्यांच्यामध्ये महाराष्ट्र, देश, समाज, माणसं याविषयी सद्भावना आणि माणुसकी दिसून आलेली आहे. या पुस्तकाच्या रूपानं आपण हे विचार समोर आणलेले आहेत.

या देशामध्ये अनेक महान माणसं होऊन गेली आणि वेळोवेळी त्यांनी आपले विचार प्रकट केलेले आहेत. हे पुस्तक जेव्हा आज मी चाळत होतो, आणि जेव्हा आपण मला सांगितलंत, की अशा प्रकारे पवार साहेबांच्या भाषणांची टिपण परीसस्पर्श म्हणून माझ्याकडं जपून ठेवली आणि त्यानंतर ही भाषणं पुस्तकासाठी मी लिहून काढली. आम्हीसुद्धा बाळासाहेबांची भाषणं अशाप्रकारे निर्माण केली, ग्रंथ निर्माण केले आहेत. बाळासाहेबांच्या शंभर मुलाखती मी ही टिपणं केली होती आणि त्याचं नंतर पुस्तक प्रसिद्ध झालं स्वराज्याची मोहीम या नावानं. आपण ते जरूर चाळलं पाहिजे. मी यासाठी म्हणतो, की अशाच प्रकारची टिपणंसुद्धा सुधीर भोंगळेंनी ठेवली. ती निर्माण केली. नेहरूंची भाषणंसुद्धा एकत्र केलेली आहेत. महात्मा गांधींची भाषणं आपण पाहतो. जगभरातल्या सगळ्या प्रमुख लोकांच्या भाषणांचे संकलन आपण करत असतो आणि ते करणं गरजेचं आहे.

म्हणून या 'नेमकचि बोलणें', याच्यामध्ये फार महत्त्वाचा विषय आहे. एक लक्षात घ्या, याच्यामध्ये अनेक विषय असे आहेत, त्या विचारांमध्ये सुसूत्रता आहे. साधारण पवार साहेबांनी २५-३० वर्षापूर्वी मांडलेले विचार असतील, त्यामध्ये आजही फारसा बदल झालेला नाही. आजही त्यांचे विचार तेच आहेत. फक्त एकदा ते हळूच कोठेतरी बोललेले

आहेत भाषणामध्ये, की महाराष्ट्रात जेव्हा सरकार होतं शिवसेना-भाजप युतीचं, तेव्हा ते हळूच बोलले होते, की पंतांचं सरकार आहे. पण, तेही ठाकऱ्यांचंच सरकार होतं. पण, तेव्हासुद्धा त्या काळामध्ये त्यांचं एक भाषण पाहिलं मी. मुंबईतल्या जमिनी व्यापाऱ्यांना विकू नका अशा प्रकारचं एक भाषण आणि अत्यंत ठणकावून सांगितलं, की आपल्या जमिनी आहेत. भूमिपुत्रांच्या जमिनी आहेत या मुंबईमध्ये, महाराष्ट्रामध्ये. त्या व्यापाऱ्यांना विकू नका. अगदी तोच विचार पाच किंवा सहा महिन्यांपूर्वी मुंबईमध्ये बीडीडी चाळीचं पुनर्निमाण होत असताना त्या सर्व चाळकऱ्यांना नवीन घरं देण्याची प्रक्रिया सुरू असतानासुद्धा पवार साहेबांनी नेमका तोच विचार मांडलाय, की ही तुमची घरं विकून तुम्ही बाहेर जाऊ नका. मुंबईवरचा मराठी पगडा कमी करू नका. सातत्यानं पवार साहेबांनी मांडलेले विचार आहेत हे आणि त्यात बदल झालेला नाही. याबाबतीमध्ये सुद्धा मी त्यांना नेहमी धन्यवाद देतो, की महाराष्ट्रात, या मुंबईमध्ये किंवा महाराष्ट्रातल्या अनेक भागांमध्ये आपली मराठी माणसाची पकड, अस्मिता ही कायम ठेवण्यासाठी सातत्यानं त्यांनी हे विचार मांडलेले आहेत.



भाषेच्या प्रश्नालासुद्धा त्यांनी चांगलं उत्तर दिलं. यावरसुद्धा त्यांनी मांडलेले विचार या पुस्तकामध्ये आहेत. भाषेबद्दलचे त्यांचे विचार हे आजचे नाहीयेत. मराठी भाषा टिकली पाहिजे, मराठी भाषेचा अवमान होता कामा नये, मराठी भाषेला प्राधान्य मिळायला पाहिजे, हे सातत्यानं ते सांगतायंत. सावरकरांच्या विचारांबद्दल नागपूरच्या काही भाषणांमध्ये विचार मांडलेले आहेत. पण, माननीय पवार साहेबांनी मला असं आठवतंय, की बारामतीमध्ये सावरकरांवर भाष्य केलेले आहे. त्याची कुणाकडे नोंद नसेल तर ते यू-ट्यूबवरसुद्धा तुम्हाला मिळेल. आम्ही अनेकदा ऐकलंय. तेसुद्धा भाषण, की या महाराष्ट्रात निर्माण झालेल्या एका वीर सुपुत्राविषयी थोडेफार मतभेद असतानाही त्याचं सन्मान करणारं भाषण हे माननीय पवारांनी कसं केलं याचीसुद्धा नोंद ही व्हायला हवी. आपले जे विरोधक असतात, आपले जे टीकाकार असतात, त्यांचा सन्मान करण्याची महाराष्ट्राची परंपरा आहे. त्या परंपरेचे माननीय पवार साहेब असतील, बाळासाहेब ठाकरे असतील, अनेक लोक, वसंतराव नाईक असतील, यशवंतराव, प्रत्येकानी महाराष्ट्रामध्ये आपल्या विरोधकांचा सन्मान केलेला आहे. आदर दिलेला आहे आणि त्याचं प्रतिबिंब या ६१ भाषणांमध्ये मला दिसतं.

ही भाषणं म्हणजे एक विचारयात्रा आहे. बरं पुस्तकही आपण फार छानही काढलेलं आहे. मी असं म्हणणार नाही, की प्रत्येक ग्रंथालयात पुस्तक जायला पाहिजे. ग्रंथालय बंद आहे सध्या. मुंबई ग्रंथालय संग्रहालयाचं काम पवार साहेबांच्या नेतृत्वाखाली आम्हीच करतोय. पण प्रत्येक मराठी माणसाच्या हातात हे पुस्तक जायला पाहिजे हे आवर्जुन मला सांगावसं वाटतं. पुस्तक आपण लोकांपर्यंत पोहोचवा. या पुस्तकाचा दर्जा फार उत्तम आहे. चांगल्या पद्धतीनं त्याचं संपादन केलेलं आहे. आपण या कार्यक्रमाला मला बोलवलंत. काही विचार मला इथं मांडता आले.

मला असं वाटलं, की सौमित्र एखादी कविता जाता-जाता, मी त्यांच्या कवितांचा मोठा फॅन आहे. त्यांची जी कविता आहे, मुसळधार पाऊस खिडकीत उभी राहून पाहा, बघ माझी आठवण येते का? आता आम्हाला तीन पक्षांना एकमेकांची फार आठवण येते. म्हणून मला ती कविता आठवली. हात लांबव, आम्ही तिघांनी हात लांबच केलेले आहेत एकमेकांसाठी. हात लांबव तळहातावर झेल पावसाचं पाणी, इवलंसं तळं पिऊन टाक, बघ माझी आठवण येते का. इतके सगळे साहित्यिक, कवी, लेखक यांनी पवार साहेबांची भाषणं वाचून दाखवली. फार मोठी गोष्ट आहे ही. मनापासून, आत्मियतेनं, तळमळीनं. मी सुप्रियाचंसुद्धा आभार मानतो. तिनं मला फोन केला. सुधीर भोंगळे आले. मघाशी मला काय म्हणाले, की मी काल तुम्हाला पुस्तक द्यायला आलो, पण तुम्हाला निमंत्रण द्यायला विसरलो. म्हटलं, हे काय असतं. मी निमंत्रणाशिवाय यावं अशी जी काही कुटुंबं आहेत, त्यातलं एक पवारांचं कुटुंब आहे. आणि आम्हाला आदेश ऐकायची सवय आहे. आम्ही कितीही शिखरावर गेलो, तरी आम्हाला आमच्या घरच्यांनी आदेश दिला, की आम्ही तो न कुरकुरता पाळतो. ही आमची परंपरा आहे. पुन्हा एकदा, या कार्यक्रमाचे आयोजक सुप्रिया, सुधीर, आपण सगळे. मी आभारी आहे. हे पुस्तक नक्कीच महाराष्ट्रातल्या नव्या पिढीला, राजकीय अभ्यासकांना, शैक्षणिक-सामाजिक-साहित्यिक या सगळ्यांसाठी संशोधनाचा एक विषय ठरेल.

माननीय पवार साहेबांचा उद्या वाढदिवस आहे. असे असंख्य वाढदिवस साजरे करण्याची आम्हाला संधी मिळो आणि त्यांनी जे कार्य महाराष्ट्रासाठी, देशासाठी करून ठेवलंय, त्याबद्दल महाराष्ट्र आणि देश त्यांचा सदैव ऋणी आहे.

पुस्तकाचं नाव आहे, 'नेमकचि बोलणें'. अनेकांना प्रश्न पडतो. आठ दिवस मलासुद्धा प्रश्न पडला. काय करावं? नेमकेचि लिहावं की नेमकचि लिहावं. मग माझी बायको माझ्या मदतीला आली. तिचा संत साहित्याचा अभ्यास असल्यामुळं तिनं असं सांगितलं, की जर तुम्ही रामदासांची ओवी याच्यात उद्युक्त केलेली आहे आणि ते वर्णन जर बरोबर पवार साहेबांना लागू होत आहे, तर हे नाव बदलायचा अधिकार तुम्हाला नाही. जे मूळ रामदासांनी लिहिलंय, तेच नाव तुम्ही त्याला दिलं पाहिजे. आणि म्हणून पुस्तकाचं नाव 'नेमकचि बोलणें' असं ठेवलेलं आहे, जे साहेबांना बरोबर लागू होतं. पुस्तकाची पानं ५१२ आहेत. तुम्हाला सगळ्यांना माहिती असेल, खडकी ॲम्युनिशेन फॅक्टरीमध्ये ५१२ नावाचा एक सेक्शन आहे आणि या दारूगोळ्याचं एक कलम आहे ५१२. आणि ही भाषणं म्हणजे तो दारूगोळा आहे. म्हणून हा योगायोग कसा जुळून आलांय बघा, ५१२ पानाचं पुस्तक, खडकीच्या ॲम्युनिशेन फॅक्टरीतील ५१२ नंबरचे कलम आणि साहेबांची भाषणं.

१९८३ सालापासूनच माझा साहेबांशी संबंध आला, जेव्हा समाजवादी कॉंग्रेसमध्ये मी कार्यकर्ता म्हणून काम करायला लागलो तेव्हा कॉलेजमध्ये शिकत होतो एफवायमध्ये आणि पहिल्यांदा बोरकर मळ्यामध्ये मी भाषण केलं साहेबांच्यासमोर. जरा गंमतीचं भाषण केलं. आमचे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष सदाशिवराव झेंडे यांची थोडी खिल्ली उडवली गेली बोलता बोलता. साहेबांनी खळखळून दाद दिली आणि मला जवळ बोलवून सगळ्या गोष्टी विचारल्या. त्याच्यानंतर त्यांनी एकदा रात्री मला बारामतीला नेलं. मी सासवडच्या स्टँडवर उभा होतो. साहेब चालले होते आणि त्या रात्री संभाजीराव काकड्यांचा बारामतीच्या भिगवण चौकात सत्कार होता खासदार म्हणून निवडून आल्याबद्दल. मी त्यांच्या बरोबर गेलो. रात्री दोनला समारंभ संपला. बाराला समारंभ सुरू झाला होता. दोन वाजता आम्ही जेवलो सगळेजण आणि पहाटे चार वाजता पवार साहेबांनी मला सासवडला आणून सोडलं. तेव्हापासून माझी जी ॲटॅचमेंट झालेली आहे, ती आजपर्यंत गेली ३८ वर्षे मी त्यांच्या बरोबरच आहे, मनानी, विचारांनीसुद्धा.




१९८५मध्ये सकाळमध्ये बातमीदार म्हणून नोकरीला लागल्यानंतर पवार साहेबांच्याबरोबर सातत्यानं जाण्याचा योग आला. अनेक समारंभांना. मग त्यांनी अनेकदा मला हेलिकॉप्टरने नेलं, विमानातनं नेलं, कारमधून नेलं. आणि म्हणून मला जी सवय होती लहानपणापासून, की शब्दश: भाषण सगळं लिहून घ्यायचं. अशा जवळपास चारशे ते पाचशे डायऱ्या आज माझ्याकडे आहेत आणि जी मोठी माणसं बोलली



# शरद पवार साहेबांची भाषणं हा फार मोठा वैचारिक ठेवा


**डॉ. सुधीर भोंगळे**

ते शब्दन् शब्द लिहून घेतलेला आहे. आणि त्याच्यावरनं हे भाषणांचं पुस्तक लिहून काढलेलं आहे. ही भाषणं कुठंही छापून आलेली नाहीत यापूर्वी किंवा याचं ऑडिओ, व्हिडिओ रेकॉर्डिंग सुद्धा कुठंही नाही. पण, कुणाला जर संशय असेल, की हे बोलले की नाही शरद पवार, आणि हे सुधीर भोंगळेंनी मनानेच लिहिलंय का मग, तर त्यांना जर पाहिजे असेल, तर मी माझी डायरी दाखवू शकतो. अशा ज्या वह्या आहेत त्या सगळ्या दाखवू शकतो आणि तोच प्रूफ आहे असं मला स्वत:ला वाटतं.

आता अनेक विषयांवर ते जे बोलले, चार-पाचशे डायऱ्या एकावेळी शोधणं हे मला शक्यच नव्हतं. या सगळ्या कामाच्या धबडग्यामध्ये मला जेवढ्या डायऱ्या शोधता आल्या, त्यातल्या पाच-पन्नास डायऱ्यांमधनं जी काही भाषणं लिहून काढता आली, माझ्या हाताशी लागली, त्यातनं हा पहिला खंड तयार केलाय. ६१ भाषणं याच्यामध्ये समाविष्ट आहेत. अजून पुढं आणखी काही खंड तयार होतील, जसं हळू हळू ते शोधत जाऊ आपण सगळ्या डायऱ्या. तर ही साधारणत: ८८ ते ९६ या काळामध्ये केलेली भाषणं आहेत. आठ वर्षातलीच ही भाषणं आहेत, ज्याचा उल्लेख मघाशी टकले साहेबांनी केला, की साधारणत: मुख्यमंत्री, संरक्षणमंत्री आणि विरोधी पक्षनेते या तीनही क्षेत्रामध्ये कार्यरत असताना, पण सभागृहाच्या बाहेर केलेली ही भाषणं आहेत. म्हणून ही भाषणं कोणाला फारशी माहिती नाहीत. ही काही इलेक्शनच्या प्रचारार्थ केलेली भाषणं आहेत. रात्रीच्या अकरा, बारा वाजता सुद्धा सभा झालेल्या आहेत आणि त्यावेळेला केलेली ही भाषणं आहेत. हा फार मोठा वैचारिक ठेवा आहे. ही दूरदृष्टी आहे आणि पुढच्या संबंध पिढ्यांना जे काम करायचंय, त्याचं मार्गदर्शक सूत्रसुद्धा या भाषणांच्या माध्यमातून आपल्याला उपलब्ध होणार आहे. म्हणून मी जेव्हा सुप्रियाताईंना असं म्हणालो, की अशी भाषणं माझ्याकडं आहेत. ताईंनी लगेच माझा पिच्छा पुरवला आणि सांगितलं, की तुम्ही हे काम सुरू करा. लिहायला लागा.

मला सहज गोष्ट आठवली. काही दिवसांपूर्वी आप्पासाहेब पवारांच्यावरती लिहियाला सुरूवात केली. पाच चॅप्टर लिहून झाले आणि बारामतीला जाऊन राजेंद्र पवारला ते वाचून दाखवले. राजूदादाच्या डोळ्यात पाणी आलं ते चॅप्टर वाचल्यानंतर आणि राजूदादा मला असं म्हणाला, की आमचे वडील आमच्यापेक्षा तुम्हाला जास्त कळले. आणि त्यावेळेला त्यांनी मला गोष्ट सांगितली. तो म्हणाला, की मेंडेल हा जो शास्त्रज्ञ होता, त्यानी असं डायऱ्यांमध्ये सगळं लिहून ठेवलं. मेंडेल अचानक गेला आणि त्याच्या डायऱ्या सात वर्षांनी त्याच्या घरातली लोकं रद्दीत घालायला निघाली, तेव्हा एक जरा शहाणा माणूस त्यांना म्हणाला, की अहो त्या

डायऱ्या बघूद्यात जरा. काय लिहिलंय त्याच्यामध्ये. त्यानं त्या डायऱ्या मागून घेतल्या आणि तो वाचायला लागला तर त्या डायऱ्यांमध्ये संबंध अनुवंश शास्त्राचा सिद्धांत लिहिलेला होता. जर त्या डायऱ्या त्यावेळेला रद्दीत गेल्या असत्या, तर आपल्याला अनुवंश शास्त्राचा सिद्धांत कळला नसता. तसं दादा मला म्हणाला, की तु गेल्यानंतर ही भाषणं कुणाला कळतील. कुणाला माहिती होणार, की पवार साहेबांनी एवढे मोठे विचार व्यक्त केलेत. एवढी दूरदृष्टी या माणसाला आहे आणि पुढची पन्नास, शंभर वर्षे या देशाच्या विकासाचं काम कसं करावं याचं मार्गदर्शक सूत्र या भाषणांच्यामध्ये त्यांनी नमूद करून ठेवलेलं आहे. आपण सगळे मर्त्य आहोत. पण विचार अमर्त्य असतो आणि त्या विचारांमध्ये जर ताकद असेल तर तो कधीच मरत नाही. तो केव्हाना केव्हातरी उगवतोच. अशी विचारांची ताकद या पुस्तकांच्यामध्ये आहे. या भाषणांच्यामध्ये आहे. म्हणून ही भाषणं लिहून काढली पाहिजेत असं मला वाटलं. मी जर ते लिहून काढलं नसतं, तर मी कर्तव्यात चुकारपणा केला. काहीतरी कमीपणा केला असं मला वाटलं असतं.



आता आटोपतं घ्यायचं म्हणून एकच प्रसंग सांगणार आहे आणि मी थांबणार आहे. अनेक प्रसंग मी पवार साहेबांच्या जीवनावर सांगू शकतो. कारण अनेक वर्षे मी त्यांच्याबरोबर सगळीकडं गेलेलो आहे. एक दिवस त्या पेरणे-वाडेबोल्हाई परिसरामध्ये मोठी गारपीट झाली. शेकडो शेळ्या-मेंढ्या मेल्या. साहेब विरोधी पक्षनेते होते. सुशीलकुमार शिंदे फायनान्स मिनिस्टर होते. सकाळी सहा वाजता पवार साहेबांनी मला सर्किट हाऊसमध्ये बोलवलं

**राज्याच्या महसूल विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव डॉ. नितीन करीर यांच्याशी समारंभाच्या सुरुवातीला अनौपचारिक गप्पा मारताना सुप्रियाताई सुळे व डॉ. सुधीर भोंगळे**



पुण्याच्या. बरोबर सहा वाजता जाऊन सगळी चर्चा केली. साडेसहा-पावणेसातला सुशीलकुमार शिंद्यांना फोन लावला. त्यांना सांगितलं, की अहो हे काय आहे. शेळी मेली तर शंभर रूपये नुकसानभरपाई देताय. काय चेष्टा चालवलीय म्हणाले. किमान हजार-दोन हजार रूपये तरी मदत करा. त्यादिवशी मग ते मला म्हणाले, की तु बस गाडीत. आम्ही ते बघायला गेलो. जेव्हा वाडेबोल्हाईच्या डोंगराच्या परिसरामध्ये आम्ही गेलो, तर तिथे गाडी जात नव्हती. मग एक टेम्पो होता सोळा सीटरचा. त्या टेम्पोमध्ये आम्हाला बसवलं आणि पवार साहेब स्वत: टेम्पो चालवायला बसले. बघा गंमत. स्वत: टेम्पो चालवायला बसले. मला म्हणाले, तु पुढं बस शेजारी. इतक्या जोरात टेम्पो चालवत होते, असा धडाधड धडाधड टेम्पो उडत होता आणि आम्ही उडून आमचं डोकं त्या टपाला लागत होतं.

होती. महाविकास आघाडी तयार करून ते अशीच महाराष्ट्राची गाडी जोरात चालवतायंत आणि आणखीही पुढं चालवावी. एवढ्याच त्यांना शुभेच्छा देतो, सहस्त्रचंद्रदर्शनाच्यानिमित्तानं.

चंद्रमे जे अलांछन, मार्तंड जे तापहीन, ते सर्वांही सदा सज्जन, सोयरे होतु. चंद्रमे जे अलांछन ही उपमा ज्ञानेश्वरीतली, त्यांना बरोबर लागू होते. हे समाजमनश्क विवेकी संतांना ज्ञानेश्वरांनी लावलेलं विशेषण आहे. याचं कारण काय? तर त्याचं तेज, प्रकाश, ऊर्जा ही कधीही उणावत नाही. कमी होत नाही. शुक्ल पक्षामध्ये प्रतिपदेपासून पौर्णिमेपर्यंत कलेकलेनं चंद्र वाढत जातो आणि अशा व्यक्तींचं तेज, प्रकाश आणि ऊर्जा ही चिरंतन असते. म्हणून त्यांना चंद्रमे जे अलांछन ही उपमा मी देतो. हा चंद्र असाच प्रकाशित होत राहो आणि त्याच्या शीतल, कोमल प्रकाशामध्ये आपल्या सगळ्यांची जीवनं उजळून निघो.



शेवटी मी पवार साहेबांना म्हणालो, की अहो काय करतांय? गाडी चालवताय की विमान चालवतांय, की रणगाडा चालवतांय. म्हणाले, की पवारांना अशा बारीक गाड्या हळूहळू चालवायला जमतच नाही. बघताय तुम्ही. राज्य असंच चालवत आले धडाक्याने गेली ५५ वर्षे. म्हणजे आमचं डोकं तिकडं टपाला धडकत होतं. यांची गाडी जोरात चालली

त्यांना शतायुषी होण्याचं पाहण्याचं भाग्य आपल्याला मिळावं, एवढीच परमेश्वर चरणी प्रार्थना करतो. तुम्ही सगळेजण समारंभाला आलात. त्याबद्दल मनापासून आभार मानतो आणि माझं लांबलेलं प्रास्ताविक संपवतो. धन्यवाद!

## ‘नेमकचि बोलणें’ या ग्रंथ प्रकाशनाच्या कार्यक्रमात पत्रकार, नाटककार, कवी, साहित्यिकांनी ग्रंथातील पवार साहेबांच्या भाषणाचे वाचन केल्यानंतर विचारलेल्या प्रश्नांना मा. शरद पवार साहेबांनी दिलेली उत्तरे.....



### माणसामाणसांमधलं अंतर वाढविणे हेच भाजपचे सूत्र



**अनंत बागाईतकर : साहेब, तुम्ही १९९६मध्ये नागपूरमध्ये भाषण केले होते आणि आता देशामध्ये जी काही परिस्थिती आहे, ही आपण सर्वचजण अनुभवत आहोत. ज्या पद्धतीनं देशात नॅरेटिव्ह चेंज केलं जातंय, तर या पुढच्या पाच किंवा दहा वर्षांमध्ये तुम्हाला भारत हा कसा दिसतो.**

**शरद पवार :** जे काय सध्या चाललंय ते पाहिल्याच्यानंतर, एक योजनाबद्ध अशा धोरणाची उभारणी करून त्याची अंमलबजावणी करण्याची प्रक्रिया सुरू झालेली आहे. मला सतत याच्याबद्दल चिंता असते, की शैक्षणिक अभ्यासक्रमाबद्दलची. शैक्षणिक अभ्यासक्रमामध्ये प्रचंड बदल करून त्याच्यातून एक वेगळा वाद निर्माण करणारा विचार रूजवण्याचा प्रयत्न त्याठिकाणी सुरू झालाय आणि तो जर रूजवण्यात यश आलं, तर पुढं एक पुढची पिढी एका वेगळ्या विचारांची तयार होईल. आणि नागपुरातल्या भाषणामध्ये या घटकांना रोखण्यासाठी एकसंघतेची गरज आहे हे जे मी सांगितलं. याच्यासाठी जे कुणी जाणकार असतील त्यांनी जे काय हल्ली सांगितलं जातं त्याचा प्रत्येक गोष्टीचा गांभीर्यानं विचार केला पाहिजे. कालच भारतीय जनता पार्टीचे एक सदस्य बोलले आणि त्यांनी सांगितलं, की राम मंदिराच्या संदर्भात जे काय करायचं होतं, ते आता झालं आणि आता आम्हाला आणखी दोन गोष्टी करायच्यात. त्या गोष्टी करण्याच्यासाठी सगळ्यांनी सामूहिक शक्ती पणाला लावली पाहिजे. याचा अर्थ स्वच्छ, की पुन्हा एका बाबरी मशिदीमुळं संबंध देशामध्ये एक प्रकारचे जातीय दंगे झाले. जीवितहानी झाली. मुंबईसारख्या

शहरामध्ये अक्षरशः मोठ्या संख्येनं लोक मृत्युमुखी पडले. ते चित्र आणि ते काही कारणाच्यामुळं पुन्हा तयार करावं आणि माणसामाणसामधलं अंतर वाढवावं हे त्याच्या पाठीमागचं सूत्र आहे. ही एक प्रकारची स्थिती आहे. या स्थितीला सामोरं जाण्यासाठी सगळ्यांना एकसंघत्व टिकवावं लागेल.

## मराठी शाळा चालवून, टिकवून तिचा दर्जा सुधारला पाहिजे



**चिन्मयी सुमीत : माझ्यासारखी कार्यकर्ती जेव्हा आज सरकारी शाळा वाचवण्यासाठी सरकारच्या दारात जाते आणि आम्हाला भेटीची वेळसुद्धा दिली जात नाही, अशी परिस्थिती आहे. मराठी शाळांच्याबद्दल आता महानगरपालिकांच्या शाळांमध्ये सीबीएसई बोर्ड होऊन त्या सर्व शाळा आता इंग्लिश होतील आणि मराठी शाळा कालांतरानी महाराष्ट्रात उरणारच नाहीत का अशी जी भीती आज आम्हाला वाटते आहे. ती खरी होईल का? खरंच मराठी शाळा बंद होतील का? आणि या होऊ नयेत याच्यासाठी जे काय करावं लागेल याच्यासाठी तुम्ही आम्हाला मार्गदर्शन कराल का? कारण, तशी आज खूप गरज आहे.**

**शरद पवार :** आज काल मी अनेक ठिकाणी पाहतो, विशेषतः महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात सुद्धा, लोकांची इच्छा इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये मुलांना घालावं. अगदी शेतकरी, शेतमजूर हासुद्धा कधी कधी माझ्याकडं येत असतो. महाराष्ट्रातल्या काही शैक्षणिक संस्थांच्यामध्ये माझी काही जबाबदारी आहे. उदाहरणार्थ, रयत शिक्षण संस्था, तिथं मी अध्यक्ष आहे. लोक भेटायला येतात, त्यावेळी ते सांगतात, की साहेब, इंग्रजी माध्यमाच्या शाळेमध्ये माझ्या मुलाला ठेवा. हा जो समज आपल्या लोकांच्यामध्ये झालेला आहे. तो घालवायचा विचार करावा लागेल. तो करत असताना दोन गोष्टी आहेत. एक, मराठी शाळा ही चालवली पाहिजे, टिकवली पाहिजे, तिचा दर्जा सुधारला पाहिजे याच्याबद्दल यत्किंचितही तडजोड नाही. हे करणं गरजेचंच आहे. ते आपण करूच सगळे मिळून. पण, हे सगळं करत असताना इंग्रजीचा दुस्वास मी करणार नाही. पण नागरिकांना आग्रहानं हे सांगायचा प्रयत्न करीन, की तुम्ही मराठी माध्यमाच्या शाळांपासून बालकांना बांधून ठेऊ नका. ज्ञानाची भाषा, व्यापाराची भाषा म्हणून उद्या तुम्हाला इंग्रजी शिकायचं असेल तर त्यासाठी एक विशिष्ट कालावधी गेल्यानंतर जरूर त्याचा विचार करा. पण, आज आपला पाया हा मराठीवर आधारित आहे आणि मला ठाऊक आहे. अलिकडं मी वाचतोय, की विशेषतः मुंबईमध्ये महानगरपालिकेमध्ये मराठी शाळांबद्दलची अवस्था चिंतनीय होईल असं स्पष्ट दिसतंय. आणि त्याच्याशिवाय मुंबईच्या आजूबाजूला, उदाहरणार्थ वसई, विरार आणि आजूबाजूच्या परिसरामध्येसुद्धा मराठी शाळा दिवसेंदिवस कमी व्हायला लागलेल्या आहेत. शेवटी भाषेच्यासंबंधी आणि राज्यासंबंधी विचार करणारे आपण सगळे घटक बसून याचा विचार केला पाहिजे. काही करून मराठी टिकवली पाहिजे. राज्यकर्त्यांनासुद्धा त्यासंबंधीची आग्रहाची भूमिका घ्यायला भाग पाडलं पाहिजे.

## गरजेनुसार बदल करण्याची तयारी आपण ठेवली पाहिजे



**शंभू पाटील : आज ज्या कालखंडात आपण आहोत आणि ज्या सांस्कृतिक संक्रमणाला आम्ही लोक तोंड देतो आहोत. तर येणारा कालखंड जो आहे, तो राजकीय संघर्षाचा आहे की सांस्कृतिक संघर्षाचा आहे. आणि जर सांस्कृतिक संघर्षाचा असेल, तर त्याच्यासाठी आम्ही तयार आहोत का? राजकीयदृष्ट्या पण आणि सांस्कृतिकदृष्ट्या पण.**

**शरद पवार :** एक असं आहे, की जे तुम्ही भाषण केलं. त्याचा एक दुसरा भाग आहे. हे माझं भाषण हिंजवडीतलं आहे आणि त्याठिकाणी खासगी कारखाना काढण्यासंबंधीचा निर्णय होता. हे भाषण दिल्याच्यानंतर शेवटची चार वाक्यं मी जे बोललो, की आपण साखर कारखानदारी काढायची. पण, त्यासाठी तुम्ही निवडलेली जागा योग्य नाही. अनेक हातांना काम मिळणार आहे. म्हणून आपण इथं आयटी सेंटर करू आणि साखर कारखाना वीस मैलावर नेऊ. आज तुम्ही हिंजवडीला गेलात, तर साधारणतः ८० हजार मुलं-मुली आयटी सेक्टरमध्ये त्याठिकाणी काम करतात. आणि संबंध पुण्याचं अर्थशास्त्र बदलण्याच्यासंबंधीची कामगिरी त्यांनी केली. ते फक्त त्यांनीच नाही, अनेक ठिकाणी आता तो विचार गेलेला आहे. पण यासाठी आम्ही ती कारखानदारी वीस मैलावर पुढं नेली आणि त्याठिकाणी ती कारखानदारी उत्तमरितीनं चालू आहे. शेतकऱ्यांच्या मालाला चांगली किंमत मिळते. कारण,



त्या भागातला जो शेतकरी आहे, तो थोडा वेगळा शेतकरी आहे. त्याचं अधिक लक्ष, तुम्हाला आश्चर्य वाटेल, दोनच गोष्टींवर असतं. दूध आणि कुस्ती. कुठेही कुस्त्यांचा हंगाम बघितला तर त्या भागातील तरूण मुलं अधिक असतात. त्यांची सगळी तयारी घरात दुधाचा व्यवसाय जाणीवपूर्वक करायचा हे जे संस्कार आहेत, त्यातून झालेले आहेत. माझं म्हणणं एकच आहे, की गरजेनुसार बदल करण्यासंबंधीची तयारी आपण ठेवली पाहिजे आणि ती तयारी आपण ठेवली, तर आपल्यापुढच्या अनेक प्रश्नांना आपण उत्तर देऊ शकतो. चित्र बदलू शकतो. आज त्या भागात बदललेले आहे. तोच विचार जर अनेक ठिकाणच्या लोकांनी घेतला, तर आपण जे काय बदल करायचे म्हणतो, त्या बदलात यशस्वी होतो.

## कलाक्षेत्रातील कामगारांच्या प्रश्नांबाबत चर्चा करून न्याय मिळवून देऊ



**संदीप मेहता : मी गेली २७–२८ वर्षे कला क्षेत्रात काम करतो. एक अडचण मी बघतो सतत आजूबाजूला होत असताना, राऊत साहेब तुम्ही पण आहात. तुम्ही पण याच्याकडं लक्ष द्या. सर, लेबर लॉ फिल्म इंडस्ट्रीला, टेलिव्हिजन इंडस्ट्रीला, थिएटर इंडस्ट्रीला का लागू होत नाही? कारण, १३ ते १५ तास नॉनस्टॉप शूटिंग चालू असतं. त्यात लाईटमन असतात, सेट डिझायनर असतात, स्पॉट बॉयज् असतात, ड्रायव्हर असतात. अनंत लोक अडकलेली असतात. पगार मात्र दहा–बारा तासांचाच मिळतो. आता एखादी बुटाची जरी कंपनी असली तरी तेथील कामगार आठ तासाची शिफ्ट करतो. त्यामुळे तो चांगलं काम करतो. २४ तासांत तिथे तीन शिफ्ट होतात. इथे तसं नाही. इथे एकदा सकाळी ९ला सुरू झालं, की रात्री ११ पासून २ वाजेपर्यंत प्रत्येकाला कॉम्प्रमाईज करावं लागतं. माझी विनंती आहे, की कृपया काहीतरी करा आणि कला क्षेत्रात लेबर लॉ आणता आला तर प्लीज बघा सर.**

**शरद पवार :** सुरूवातीला जे तुम्ही माझं भाषण वाचून दाखवलं, ते जुन्नर तालुक्यातल्या एका धरणाच्या कामाचा शुभारंभ, त्याचं ते भाषण आहे. ते धरण झालं आता. एकेकाळी जुन्नर तालुक्यातले लोक हे मुंबई शहरामध्ये भाजी विकायला यायचे. फुलं विकायला यायचे. आज जर तुम्ही गेलात तिथं, तर सगळं चित्र बदललंय. एक, दोन, तीन, चार, पाच, सहा अशी धरणं झाली. पाणी आलं. शेती अतिशय उत्तम झाली. वेगवेगळ्या प्रकारची शेती, फळं, फुलं आणि देशाच्या बाहेरसुद्धा त्यांचा माल जायला लागला. त्यामुळं समस्त परिसर बदलला. तुम्ही जो दुसरा विषय काढला, त्याबद्दलचं ज्ञान फारसं आम्हाला नाही. याच्यामध्ये एक गोष्ट खरी आहे, की तुमच्या बोलण्याचं सूत्र मी असं समजतो, की या कलेच्या क्षेत्रामध्ये काम करणारी जो कर्मचारी आहे, त्याला एकंदर जे दिवस द्यावे लागतात आणि त्याच्यातनं त्याला जे काय अर्थसहाय्य मिळतं याच्यात कुठंतरी समन्वय दिसत नाही किंवा तिथं कुठंतरी अन्याय, अत्याचार होतोय असं दिसतं.

म्हणून या सगळ्या प्रश्नाच्यासंबंधी आम्ही आमचे जे दुसरे सहकारी आहेत, जे विशेषत: कामगार विभाग वगैरे समजतात, त्यांच्याशी जरूर चर्चा करू. त्यांना कसा न्याय देता येईल याची जरूर काळजी घेऊ.

## महिलांनी एकत्र येऊन अन्यायाविरुद्ध रिॲक्ट होण्याची भूमिका स्वीकारावी



**मनस्विनी लता रवींद्र : मी एक लेखिका आहे आणि मला ॲक्च्युअली तुम्हाला एक प्रश्न विचारायचा आहे. म्हणजे असं होतं, की आपल्याकडे समाजात आपण म्हणतो, की स्त्री-पुरूष भेदभाव हा हळूहळू बदलणार, खरोखरच कारण जे फुलेंनी काम केलं आहे, जे आंबेडकरांनी काम केलं आहे, ते हळूहळू झिरपत झिरपत ते बदलणार आहे. पण, आपण बघतो, की ते बदलत नाही आणि ते खूप नेणिवेच्या पातळीवर असतं. म्हणजे आपण पुरूष लेखक असं म्हणत नाही. पण आपण स्त्री लेखिका असं म्हणतो किंवा खूप अशा छोट्या छोट्या गोष्टी असतात, की आपण जसं छोट्या शहरात जातो, गावात जातो, तर तसं तसं बंधनं स्त्रियांवरची बदलतही जातात. शहरातही ती असतात. म्हणजे साधं एखादं मूल जसं एखाद्या नाक्यावर जाऊ शकतं, तसं एखादी मुलगी जरी कुठंतरी पाणीपुरी खात असेल तर तिच्याबद्दल चर्चा होते आणि लेखक म्हणून काम करताना हे जाणवतं, की स्त्रियांना धमक्या देणं, म्हणजे आताच्या काळात जे काही सुरु आहे, की लगेच देशद्रोही ठरवलं जातं. लगेचच जेलमध्ये टाकलं जातं. कॉमेडियन्सचे शोज् बंद होतायत. आणि त्यावेळेस तुम्ही काम करत असताना स्त्रियांना तर धमकी देणं खूप सोपं आहे. अश्लाघ्य भाषेमध्ये बोललं जातं. खूप घाणेरड्या, विचित्र प्रकारे लोकं बोलू शकतात. बोलतायंत. तर अशावेळेस मला असं वाटतं, की तुम्ही काय म्हणाल, की हा जो भेदभाव आहे, जो नेणिवेच्या पातळीवर आहे आणि मोठ्या पातळीवर योजनांच्या पातळीवर गोष्टी बदल असतात. पण हे जे समाजात नेणिवेच्या पातळीवर आहे, ते बदलण्यासाठी काय करता येईल आणि तुमचे त्याबद्दल काय विचार आहेत हे मला जाणून घ्यायला आवडेल.**

**शरद पवार :** तुम्ही जे सांगितलं, अशी उदाहरणं ऐकायला मिळतात. पॉईंट असा आहे, की अशी उदाहरणं ऐकायला मिळाल्याच्यानंतर ज्यांना याच्या यातना सहन कराव्या लागतात, त्यांनी बघ्याची भूमिका घेऊ नये. याच्यासंबंधी आपली प्रतिक्रिया ही तातडीने द्यायला हवी. गेल्या तीन-चार दिवसाच्यापूर्वी कदाचित तुम्ही वर्तमानपत्रामध्ये वाचलं असेल, की मुंबईच्या महापौरांना कुणीतरी अश्लाघ्य पद्धतीनं काहीतरी टीका-टिप्पणी केली आणि त्याच्या बाबतीत मुंबईच्या महापौरांनी तातडीनं सार्वजनिकरित्या आपलं सगळं म्हणणं मांडलं आणि जे कुणी महापौरांना यातना देणारे आहेत त्या सगळ्यांच्याबद्दल जनमाणसामध्ये एक प्रकारची तीव्र प्रतिक्रिया आली आणि नंतर काही लोक खुलासा करायला लागले, की आम्ही नाही. माझं म्हणणं असं आहे, की असे प्रकार होतात. ते प्रकार झाल्याच्यानंतर बघ्याची भूमिका घेऊन चालणार नाही. त्याला रिॲक्ट व्हावं लागेल. सगळ्या मुलींनी एकत्र येऊन रिॲक्ट होण्याची भूमिका घेतली, तर कुणी नादाला लागणार नाही तुमच्या.

## मराठीच्या अभिजात दर्जाबाबतची मागणी सातत्याने करावीच लागेल



**किशोर कदम (सौमित्र) : आत्ताच आपलं साहित्य संमेलन पार पडलं. नरके सरांबरोबर आम्ही बोलत होतो, तेव्हा तमिळ भाषेचं साहित्य संमेलन होताना त्यांचा खर्च एकूण जवळजवळ दोनशे करोडच्याजवळ असतो असं त्यांनी मला सांगितलं आणि मला हबका बसला. यावेळेला मराठी साहित्य संमेलनाला ज्या संख्येने लोक आले, इतकी पुस्तकं विकली गेली, ज्या पद्धतीचं संमेलन, भुजबळ साहेब खरंच तुम्ही आयोजित केलं ते अतिशय उत्तम होतं आणि पुन्हा एकदा नाशिक हे किती सुसंस्कृत शहर आहे. लिहित्या हातांचं, वाचत्यांचं शहर आहे हे पुन्हा लक्षात आलं. पण, मराठी भाषेबद्दल गेली कित्येक वर्षे पठारे सर आणि कित्येक दिग्गज लोक नरके सर, अभिजात दर्जा मिळावा म्हणून काम करतायंत आणि खूप वर्षे काम करूनही आपलं बजेट ३०० करोडपर्यंत साहित्य संमेलनाचं कधी जाईल, जेव्हा अभिजात भाषा होईल तेव्हाच. आपण कुठे कमी पडतो आहोत अभिजात दर्जा मिळवायला हा माझा तुम्हाला एक छोटासा प्रश्न आहे.**

**शरद पवार :** असं आहे, की यासंबंधी गेली काही वर्षे सातत्यानं महाराष्ट्रातून विविध क्षेत्रातले, साहित्य, कला

आणि राजकारण या तिन्ही क्षेत्रातल्या लोकांची सामुदायिक केंद्र सरकारकडं सतत मागणी आहे, की अभिजात दर्जाच्यासंबंधीची. पण, दुर्दैवानं अद्याप त्याला यश आलेलं नाही. यश आलं नाही म्हणून आपल्याला थांबून चालणार नाही. आपल्याला त्याच्यात सातत्य ठेवावं लागेल आणि याच्यात कधीतरी आपल्याला अंतिम निकाल हा घ्यावा लागेल.

## नाव लक्षात ठेवण्याच्या गुणामुळे समाजात कायम स्वरुपी स्थान मिळते

**किशोर कदम (सौमित्र) : परवाच मी एक पुस्तक वाचत होतो. या पुस्तकामध्ये एक मेमरी कॉम्पिटिशन चाललेली आहे. तिकडे एक वार्ताहर गेलेला आहे, जो खरं तर स्पोर्टस् कव्हर करायला गेलांय, पण मेमरी कॉम्पिटिशन चालली आहे. तो खाली उतरतो, विचारतो, की तुझं नाव काय. शेवटपर्यंत जातो, सगळ्यांची नावं घेतो आणि येऊन तो स्टेजवर उभा राहतो आणि सुरू करतो आणि एकेकाचं नाव त्याच त्याच क्रमानं तो सांगत जातो. साहेब, तुमच्याबद्दल अशी अख्यायिका आहे, की तुम्ही एकदा माणसाला भेटलात, की त्याचं नाव लक्षात ठेवता. आम्ही नट असून पाठांतरात कमी पडतो. तुम्ही कसं काय करता. याची ट्रिक काय आहे.**

**शरद पवार :** राजकारणामध्ये फार कमी खर्चामध्ये, फार कमी भांडवलामध्ये तुम्हाला यश मिळतं. फक्त तुम्ही समोरच्या व्यक्तीचं नाव लक्षात ठेवलं पाहिजे. एक साधी गोष्ट सांगतो. मी मुख्यमंत्री असताना एक दिवस एक बाई भेटायला आली. ती माझ्या मतदारसंघातली होती. तिचं ऐकून घ्यायच्या आधीच मी तिला विचारलं, की काय गं कुसूम, काय काढलं मुंबईला? साहेबांनी मला कुसूम म्हणून हाक मारली. काम होवो न होवो. आपल्याकडच्या लोकांचं, म्हणजे ते फार छोट्या गोष्टींनी संतुष्ट होतात. समाधानी होतात. या गोष्टी जर आपण जाणीवपूर्वक लक्षात ठेवल्या आणि असे दोन-तीन लोक मी राजकारणात पाहिले आहे. एक यशवंतराव चव्हाण, दुसरे वसंतदादा पाटील. वसंतदादांना सुद्धा नावाच्यासंबंधी व्यक्तीच्या, कधी पन्नास वर्षापूर्वी तुरूंगामध्ये होते, तिथपासून सगळं सांगायचे. पण या गुणामुळं त्यांना समाजामध्ये कायमस्वरूपाचं स्थान प्राप्त व्हायला यश मिळालं.




Nanded City, Pune
Sinhagad Road, Pune
प्रत्येक घराला एक मन असतं.
प्रत्येक शहराला एक व्यक्तिमत्त्व असतं.
CBSE व ICSE शाळा
Call: 020-67275800 / 1 / 2
www.nandedcitypune.com
info@nandedcitypune.com
NAGARPATTA CITY

# चीनच्या सुरूच कुरापती

**तथागत दास**




नववर्षाच्या शुभेच्छा आणि मिठाईची देवाणघेवाण करुन भारतीय व चिनी सैनिकांनी पूर्व लडाखसह भारत–चीन सीमेवरील प्रत्यक्ष नियंत्रण रेषा(एलएसी) परिसरात दहा ठिकाणी नववर्ष साजरे केले. या प्रकाराचे सर्वांनीच स्वागत केले. परंतु आतापर्यंतच्या अनुभवानुसार एकीकडे गोडीगुलाबी दाखवताना दुसरीकडे द्विपक्षीय संबंधात तणाव निर्माण होईल अशा काही कृति करायच्या हा चीनचा स्वभाव आहे आणि त्याचे प्रत्यंतर आताही येतच आहे. नववर्षानिमित्त शुभेच्छांची देवाणघेवाण करतानाच चिनी सैनिकांनी गलवान खोऱ्यात चिनी राष्ट्रध्वज ते फडकवीत असल्याची छायाचित्रे प्रसारित केली. 'एक इंचही भूमि सोडणार नाही' अशा प्रकारच्या ओळीही या छायाचित्राखाली प्रसिध्द करण्यात आल्या होत्या. १ जानेवारी २०२२ रोजी चिनी माध्यमांमध्ये हे छायचित्र ठळकपणे प्रसिध्द करण्यात आले. साहजिकच भारतात त्याचे पडसाद उमटणे स्वाभाविक होते. त्याला प्रत्युत्तर म्हणून भारतीय सैनिकांनीही गलवान खोऱ्यात त्यांनी भारतीय तिरंगा फडकविण्याची छायाचित्रे प्रसारित केली. त्यामध्ये एका बाजुला भारतीय ठाणे दिसत असून त्या ठाण्यावरही



**एकीकडे चीनच्या वाढत्या कुरापती, भारत-अमेरिका संबंधात आलेला थंडावा, अमेरिकेतील जो बायडेन प्रशासनाचा पाकिस्तानकडे वाढता कल, बायडेन प्रशासनातर्फे अमलात आणले जाणारे चीन-केंद्रित परराष्ट्र धोरण व नकळत किंवा केवळ अमेरिकेच्या लांगूलचालनासाठी भारतीय राज्यकर्त्यांचा अमेरिका-धार्जिणेपणा, चीनच्या विरोधात अमेरिका व त्यांचे युरोपीय मित्रदेशांना साथ देण्याची भारताची भूमिका यामुळे भारत व चीन संबंधांमध्ये तणाव निर्माण झाला आहे. त्याचबरोबर वर्तमान राज्यकर्त्यांकडून पाकव्याप्त काश्मीर, अक्साई चिन पुन्हा ताब्यात घेण्याबाबत करण्यात आलेली फाजील साहसवादी निवेदने यांचाही या तणावनिर्मितीत मोठा भाग आहे. पाकव्याप्त काश्मीरमधील पाकिस्तान-चीन आर्थिक विभाग, चीनचा बेल्ट अँड रोड प्रकल्प यांना भारताकडून धोका निर्माण होत असल्याच्या शंकेने चिनी राज्यकर्त्यांनी बहुधा आक्रमक धोरण स्वीकारले व त्यातून हा तणाव निर्माण झाल्याचे निदान या क्षेत्रातील तज्ज्ञांनी केले आहे. भारताला यासंदर्भात चीनच्या शंकांचे निरसन करणे आवश्यक आहे. त्यामुळे भारत-चीन सीमेवरील तणाव हलका होण्यास मदत होऊ शकते.**

तिरंगा फडकत असल्याचे दिसत आहे. परराष्ट्र मंत्रालयाने यासंदर्भात खुलासा करताना गलवान खोऱ्यातील छायाचित्र चीनने प्रसारित केले असले तरी ते चिनी हद्दीतील आहे. गलवानमध्ये नव्याने जो 'बफर झोन' तयार करण्यात आला आहे त्या परिसरातील हे छायाचित्र नाही. ते चिनी हद्दीत आणि वाटाघाटीत ठरविण्यात आलेल्या सीमारेषेपासून चिनी हद्दीत बऱ्याच अंतर्भागातील आहे. परराष्ट्र मंत्रालयाच्या खुलाशावर समाधान मानण्याखेरीज तूर्तास अन्य पर्याय नाही.

हा प्रकार होतो न होतो तोच चीनने अरुणाचल प्रदेशातील पंधरा स्थानांचे त्यांनी केलेल्या नामकरणाची घोषणा केली. अरुणाचल प्रदेशातील ज्या भागांना भारतात अधिकृत नावे देण्यात आलेली आहेत त्यांची नावे आपल्या नोंदीत बदलून ती जाहीर करण्याचा प्रकार चीनने केला. वास्तविक पाहता ही सारी ठिकाणे भारताच्या ताब्यात आहेत आणि ती हिसकावून घेण्याचे चीनचे धाडस नाही परंतु केवळ या भूभागावर आपला परंपरागत हक्क सांगण्याच्या भूमिकेतून चीनने हा आगाऊपणा केलेला आहे. अरुणाचल प्रदेश हे राज्य भारतात असल्याचे चीन मान्य करीत नाही आणि त्यावर चीनने आपला हक्क सोडलेला नाही. अरुणाचल प्रदेशाला चीनमध्ये 'दक्षिण तिबेट'(झाग्नान) म्हणून ओळखले जाते. ज्या पंधरा स्थानांचे नामकरण चीनने केले आहे त्यात से-ला(से खिंड), आठ गावे, चार पर्वत किंवा टेकड्या आणि दोन नद्यांचा समावेश आहे. भारतातर्फे से-ला येथे बोगदा बांधण्यात येत आहे. यामुळे या खिंडीच्या परिसरात तसेच पुढे जाऊन तवांग या अत्यंत मोक्याच्या ठाण्यापर्यंत भारतीय सैन्याची वेगवान वाहतूक करणे आणि त्यांना तैनात करण्यात सुलभता येणार आहे. तवांग ही चीनची अत्यंत दुखरी नस आहे. तवांगवर भारताचा असलेला कब्जा चीनला नेहमीच खुपत आलेला आहे आणि त्यामुळेच मिळेल तेव्हा ते त्यावर हक्क सांगितल्याखेरीज रहात नाहीत. गेल्या वर्षीच चीनतर्फे या ठिकाणी घुसखोरीचा प्रयत्न झाला होता व तो अयशस्वी करण्यात आला होता. सामरिक दृष्टीने तवांगचे अनन्यसाधारण महत्व आहे. याठिकाणी भारताला सामरिक वरचष्मा प्राप्त आहे. त्यामुळेच हा भूभाग भारताच्या ताब्यात असणे ही चीनला सतत डचणारी गोष्ट आहे.

याच्याच जोडीला चीनने त्यांच्या हद्दीतील पॅन्गाँग जलाशयाच्या भागात एक पूल बांधत आहे. चीनची हिमालयात रस्ते बांधण्याची जी योजना आहे त्या अंतर्गत येणाऱ्या सिंकियांग(शिनजियांग)-तिबेट महामार्गा अंतर्गत या पुलाची बांधणी सुरु आहे. यामुळे जवळपास १८० ते २०० किलोमीटरच्या अंतराची बचत होणार असून या दोन्ही प्रांतातून चिनी सैन्याची वाहतूक अधिक वेगाने आणि कमी वेळेत करणे चीनला शक्य होणार आहे. तसेच या जलाशयाच्या

परिसरातही त्यांना चिनी सैन्य वेगाने आणून तैनात करणे आता शक्य होणार आहे व त्याचा भारताला खरा धोका आहे. या जलाशयाच्या बहुतांश भागावरही चीन हक्क सांगतच आहे आणि त्यामुळेच त्यांच्या या आक्रमक हालचालींवर भारताला डोळ्यात तेल टाकून बारीक नजर ठेवावी लागणार आहे. तिबेट आणि शिनजियांग हे दोन्ही प्रांत ही चीनची डोकेदुखी आहे. शिनजियांगमध्ये उईघुर किंवा इस्लामी-मुस्लिम समाज आहे तर तिबेटमध्ये बौध्द धर्मीय आहेत. दोन्ही प्रांतांना चीनपासून वेगळे व स्वतंत्र व्हावयाचे आहे आणि या दोन्ही ठिकाणी त्यासाठी सतत आंदोलने व चळवळी सुरु असतात.

हा असंतोष दडपून टाकण्यासाठी या दोन प्रांतात चिनी सैन्य मोठ्या प्रमाणात तैनात करण्यात आलेले आहे. या दोन भागांना जोडणारा महामार्ग बांधण्याचे काम चीनने केले असून त्यात आता या पुलाची भर पडणार आहे. शिनजियांगपासून दक्षिण चिनी समुद्रापर्यंत हैनान पर्यंत












महामार्ग बांधण्याची चीनची योजना आहे व त्याचे कामही सुरु आहे. थोडक्यात चिनी कुरापती थांबलेल्या नाहीत आणि त्याला अपेक्षित प्रत्युत्तर देण्याचा अभाव भारताच्या वर्तमान नेतृत्वात आहे. उलट चीनला अपेक्षित प्रत्युत्तर देण्याच्या क्षमतेचा असलेला अभाव लपविण्यासाठी चीनने फार काही मोठी कुरापत केलेलीच नाही असा अत्यंत आत्मघातकी पवित्रा वर्तमान राजवटीतर्फे घेतला जात आहे. त्याचे प्रत्यंतर आताही येत आहे.

दुसरीकडे लडाखमधील घुसखोरीचे प्रकरण अद्याप पूर्णपणे शमलेले नाही. यासंदर्भात लष्कर आणि परराष्ट्र मंत्रालयाचे अधिकारी यांच्या पातळीवर आता तेरा चर्चेच्या फेऱ्या झाल्या. ऑक्टोबर-२०२१ मध्ये शेवटची तेरावी फेरी झाली आणि ती अनिर्णित अवस्थेत संपली. काही मुद्यांवर परस्परांच्या भूमिका मेळ खात नसल्याने वाटाघाटी असफल झाल्याचे उभय बाजूंकडून सांगण्यात आले. तरीही



नव्याने प्रस्ताव तयार करुन लवकरात लवकर पुन्हा भेटण्याचे व चर्चेची चौदावी फेरी करण्याचे दोन्ही देशांनी मान्य केले असले तरी अद्याप त्या फेरीच्या तारखा निश्चित करण्यात आलेल्या नाहीत.

दरम्यानच्या काळात चीनतर्फे या तणाव वाढविणाऱ्या कुरापती करण्यात येत आहेत. चीनच्या या तळ्यात-मळ्यात वर्तनाचा हेतु भारताला चिथावणी देणे हा असतो हे स्पष्ट आहे. त्या चिथावणीने भारत काहीतरी आततायी हालचाली करील यासाठीही चीनची धडपड सुरु



असते. परंतु त्यांच्या दुर्दैवाने भारत त्या जाळ्यात अजुनतरी सापडलेला नाही. असे असले तरी लडाख परिसरात अद्याप उभय बाजुंचे प्रत्येकी पन्नास हजार सैनिक उपस्थित आहेत. ते युध्दसज्ज अवस्थेत आहेत हेही खरे आहे आणि अशा पध्दतीने दीर्घकाळ ते तैनात राहणेही सामरिकदृष्ट्या उचित मानले जात नाही. एखादी लहानशी चूक मोठ्या संघर्षाला कारणीभूत ठरु शकते व म्हणूनच उभय देशांनी व विशेषतः नेतृत्वाने समंजस व सामोपचाराच्या मार्गानेच परिस्थिती हाताळणे श्रेयस्कर राहणार आहे.

जे पाकिस्तानबरोबर शक्य झाले नाही ते भारत व चीनच्या दरम्यान घडले आहे हाही एक वेगळा असा भारत-चीन संबंधांचा पैलू मानावा लागेल. लडाखमधील घुसखोरीच्या संदर्भात उभय देशातील शिखर नेतृत्वात थेट किंवा प्रत्यक्ष बोलणी-चर्चा-वाटाघाटी झाल्या नाहीत. परराष्ट्रमंत्र्यांच्या पातळीपर्यंत त्या चालू राहिल्या. त्यातूनच दिशा निश्चित करण्यात आली आणि प्रत्यक्षातील वाटाघाटी व त्याद्वारे तणावमुक्ति सैन्यमाघारीचे तपशील सेनाधिकारी आणि परराष्ट्र मंत्रालयाचे अधिकारी यांच्या पातळीवर ठरविण्यात येऊन त्याआधारे कार्यवाही करण्यात आली आणि आतापर्यंत तरी ही यंत्रणा यशस्वीपणे चालू राहिली आहे. चीनमध्ये चिनी सैन्यावर राजकीय नेतृत्वाची पकड आणि अधिकार आहे. भारतातही सैन्यही राजकीय नेतृत्वाच्या मार्गदर्शनाखाली कामकाज करते. पाकिस्तानात वरवर दिसायला राजकीय नेतृत्व असले तरी परराष्ट्र संबंधांपासून पाकिस्तानच्या अंतर्गत बाबींवरही पाकिस्तानी सेना-लष्कर आणि आयएसआय ही गुप्तचर संघटना यांचे निर्विवाद वर्चस्व आहे. त्यामुळेच काही वर्षांपासून अनेक मुत्सद्दी व परराष्ट्रविषयक तज्ञांनी भारताने थेट लष्करी अधिकाऱ्यांच्या पातळीवर पाकिस्तानबरोबर बोलण्याची प्रक्रिया सुरु करण्याची कल्पना मांडून तिचा पुरस्कार केलेला आहे. अद्याप ती मूर्त स्वरुपात आलेली नाही. असे असले तरी चीनच्या बाबत ते शक्य झाले हेही नसे थोडके. एकीकडे चीनच्या वाढत्या कुरापती, भारत-अमेरिका संबंधात आलेला थंडावा, अमेरिकेतील जो बायडेन प्रशासनाचा पाकिस्तानकडे वाढता कल, बायडेन प्रशासनातर्फे अमलात आणले जाणारे चीन-केंद्रित परराष्ट्र धोरण व नकळत किंवा केवळ अमेरिकेच्या लांगूलचालनासाठी भारतीय राज्यकर्त्यांचा अमेरिका-धार्जिणेपणा, चीनच्या विरोधात अमेरिका व त्यांचे युरोपीय मित्रदेशांना साथ देण्याची भारताची भूमिका यामुळे भारत व चीन संबंधांमध्ये तणाव निर्माण झाला आहे. त्याचबरोबर वर्तमान राज्यकर्त्यांकडून पाकव्याप्त काश्मीर, अक्साई चिन पुन्हा ताब्यात घेण्याबाबत करण्यात आलेली फाजील साहसवादी निवेदने यांचाही या तणावनिर्मितीत मोठा भाग आहे. पाकव्याप्त काश्मीरमधील पाकिस्तान-चीन आर्थिक विभाग, चीनचा बेल्ट अँड रोड प्रकल्प यांना भारताकडून धोका निर्माण होत असल्याच्या शंकेने चिनी राज्यकर्त्यांनी बहुधा आक्रमक धोरण स्वीकारले व त्यातून हा

तणाव निर्माण झाल्याचे निदान या क्षेत्रातील तज्ञांनी केले आहे. भारताला यासंदर्भात चीनच्या शंकांचे निरसन करणे आवश्यक आहे. त्यामुळे भारत–चीन सीमेवरील तणाव हलका होण्यास मदत होऊ शकते. अमेरिकेने अफगाणिस्तानात तालिबानची राजवट आणण्यास मदत केली याबाबत आता कुणाच्याही मनात तिळमात्र शंका राहिलेली नाही. त्याची सुरुवात तऱ्हेवाईक डोनाल्ड ट्रंप यांनी केली व जो बायडेन यांनी अध्यक्षपद स्वीकारल्यानंतर ती प्रक्रिया पूर्ण केली. दोहा येथे अमेरिकेने तालिबानच्या प्रतिनिधींबरोबर वाटाघाटींच्या अनेक फेऱ्या करुन करार केला. अफगाणिस्तानातील अब्दुल घनी यांचे सरकार बरखास्त करुन त्यांची जागा तालिबानने घ्यावी यासाठी अमेरिका व त्यांचे युरोपीय मित्रदेश तसेच पाकिस्तान, रशिया व चीन यांचे त्रिकूट यांच्याशी संगनमत करुन तालिबानला अफगाणिस्तानात सुलभ प्रवेश करुन दिला. या सर्व प्रक्रियेत अमेरिकेने पुन्हा एकदा पाकिस्तानशी जवळीक गेल्याच महिन्यात बायडेन प्रशासनाच्या पुढाकाराने जगातील लोकशाही देशांची एक परिषद झाली. त्यात भारताला निमंत्रण होते परंतु आश्चर्यकारकरीत्या त्यात पाकिस्तानचाही समावेश करण्यात आला. पण खरा धक्कादायक प्रकार हा होता की नियमित निवडणुका आणि लोकशाही पध्दती असूनही बांगला देशाला मात्र या परिषदेतून वगळण्यात आले होते. फिलिपिन्स सारख्या देशालाही या परिषदेला बोलाविण्यात आले होते. पाकिस्तान काय किंवा फिलिपिन्स हे देश नागरी स्वातंत्र्य, लोकशाही मूल्ये, मानवाधिकार यांची पायमल्ली करण्यातले आघाडीवरील देश असताना अमेरिकेने या देशांना निमंत्रित करणे यावरुन अमेरिकेचा कल कोठे अधिक झुकलेला आहे हे लक्षात येते. बांगला देश व भारताची मैत्री अभंग मानली जात असली तरी चीनचा अग्नेय आशियातील वाढता वावर, वाढत्या हालचाली आणि वाढती सक्रियता ही अमेरिकेला अस्वस्थ करणारी आहे. त्यासाठीच बायडेन प्रशासनाने आशियावर व विशेषतः दक्षिण आशिया आणि अग्नेय आशियावर लक्ष केंद्रित करण्याचे धोरण अवलंबिले आहे. यामागे चीनला







सुरु केली. निमित्त अफगाणिस्तानात तालिबानची फेरस्थापना हे असले तरी अमेरिकेचा अंतःस्थ हेतु पाकिस्तानला चीनपासून कसे तोडता येईल हा आहे आणि त्या दिशेने बायडेन प्रशासनाने पावले टाकण्यास सुरुवात केली आहेत.

वेसण घालणे किंवा त्यांची नाकेबंदी करणे हा उघड व स्पष्ट हेतु दिसून येतो. तज्ञांच्या म्हणण्यानुसार भारताने या गटबाजीतून स्वतःला स्वतंत्र राखणे आवश्यक आहे. तरच भारताला सीमेवरील व विशेषतः चीनबरोबरचे तणाव हलके करणे शक्य होईल.

अफगाणिस्तानातून अमेरिकेची सैन्यमाघारी व त्यातून निर्माण झालेले मुद्दे, अमेरिका व चीनदरम्यान सुरु असलेला आर्थिक संघर्ष व आर्थिक वर्चस्वाची लढाई, चीनने आशियात घेतलेली विस्तारवादी भूमिका हे बदलत्या जागतिक राजकारणातले काही नवीन विषय आहेत. करोनाचे जागतिक संकट सर्वांच्या डोक्यावर आहे हे वास्तवही सर्वांसमोर आ वासून उभे आहे. यामुळेच बहुधा अफगाणिस्तानातील परंपरागत व ऐतिहासिक संबंधांचे पुनरुज्जीवन करण्याच्या दृष्टीने भारताने मध्य आशियाई गणराज्ये तसेच रशिया व इराण यांच्या मदतीने पावले टाकण्यास सुरुवात केली आहे. अमेरिका यामुळे अस्वस्थ होणे स्वाभाविक आहे. कारण या प्रक्रियेत भारत व रशियाची जवळीक वाढणे अटळ आहे.





संरक्षण साधनसामग्री पुरवठ्यामध्ये अजुनही रशिया एक महत्वपूर्ण भागीदार देश आहे. अमेरिकेपासून स्वतःला वेगळे करुन भारताने किमान दक्षिण आशिया आणि अग्नेय आशियात संबंधांची फेरजुळणी केल्यास चीनबरोबरचा तणाव कमी करण्यास ती बाब मदतीची ठरेल. त्यासाठी भारताला शेजारी राष्ट्रांबरोबरच्या संबंधांमध्येही गति निर्माण करावी लागेल. चीनला हाताळण्यासाठी शांघाय कोऑपरेशन ऑर्गनायझेशन आणि ब्रिक्स सारख्या व्यासपीठांचा सक्षमतेने वापर करणेही सहाय्यभूत ठरणार आहे. भारत–चीन संबंधांचा समतोल जो आधीच्या भारतीय राज्यकर्त्यांनी अतिशय कुशलतेने सांभाळला होता त्याचे यशस्वी अनुकरणच उचित ठरेल व संबंध सुधारणेस उपयुक्त होईल.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचा जन्म २३ एप्रिल १८७३ रोजी झाला. ७१ वर्षांचे समृद्ध आयुष्य जगून महर्षींनी अखेरचा श्वास २ जानेवारी १९४४ रोजी घेतला. २०२२ मध्ये त्यांच्या जन्माला जवळपास १४९ वर्षे आणि मृत्यूला ७८ वर्षे होत आहेत. नव्या वर्षात त्यांचे कृतज्ञ स्मरण करणे आपले कर्तव्य आहे.



# महर्षी विठ्ठल रामजी शिंदे
## एक कृतज्ञ स्मरण

प्रा. डॉ. गणेश राऊत

'चरित्र-महर्षींचे' अलिकडच्या काळात सुहास कुलकर्णी यांनी लिहिलेले पुस्तक प्रसिद्ध झाले आहे. पुण्यातील गंधर्व - वेद प्रकाशन यांनी हे २०० पृष्ठांचे पुस्तक प्रसिद्ध केले आहे. या पुस्तकाच्या मलपृष्ठावर कुलकर्णी यांनी महर्षींचे मोठेपण पुढील शब्दात मांडले आहे. "महात्मा जोतिराव फुले यांच्यानंतर अस्पृश्यता निवारणाच्या क्षेत्रात मोलाची कामगिरी करणाऱ्या सुधारकांत महर्षी शिंदे अग्रस्थानी आहेत. 'डिप्रेस्ड क्लासेस मिशन' या संस्थेमार्फत त्यांनी अस्पृश्यता निवारणाचे प्रयत्न केले. समाजशास्त्रीय संशोधन करून 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न' हा ग्रंथ त्यांनी लिहिला. 'अस्पृश्यता' हे हिंदू धर्माला लागलेले विकृत फळ आहे. अशी मांडणी करून, समकालीन सुधारकांनी व चळवळींनी अस्पृश्यता निर्मूलनाचा कार्यक्रम प्राधान्याने स्वीकारावा असा आग्रह त्यांनी धरला. बौद्ध धर्म, भागवत धर्म, युनिटेरियन धर्म आणि सार्वजनिक सत्यधर्म यांच्यातील पटतील तेवढयाच बाबींचा स्वीकार करण्याची त्यांची शिकवण होती. कृष्ण, बुद्ध, महावीर, वारकरी संत, महात्मा फुले व महात्मा गांधी हे भारतातील धर्म सुधारणेच्या परंपरेतील पाईक आहेत अशी मांडणी करून, उदार धर्मपरंपरेच्या मांडणीला महर्षींनी नवा आशय दिला. अस्पृश्यता निर्मूलन, धर्म सुधारणा व राष्ट्रीय स्वातंत्र्य यासाठी आग्रही राहून अस्पृश्य, बहुजन व शेतकरी अशा उपेक्षित वर्गांना समाजाच्या मूळ प्रवाहात आणण्यासाठी ते सतत प्रयत्नशील राहिले."

**जीवनचरित्र** - आता आपण महर्षिंच्या जीवनाकडे वळूयात. १८७३ मध्ये तत्कालिन जमखिंडी संस्थानात महर्षींचा जन्म झाला. मातोश्री यमुनाबाई आणि वडील रामजीबाबा यांनी विठ्ठलरावांचे लक्षपूर्वक संगोपन केले. त्यांचे वडील रामजीबाबा संस्थानच्या जमाखर्चाचे काम पहात असत. रामजीबाबांना अनेक विषयात रस होता. त्यांनी मुलींची शाळा स्थापली होती. ही जमखिंडीतली पहिली मुलींची शाळा होय. वडिलांकडूनच महर्षींना सामाजिक सुधारणांचा वारसा मिळाला. वडिलांना अनेक भाषांमध्ये गती होती. महर्षींच्या बालपणी आर्थिक संपन्नतेत असणारे घर पुढे वडिलांच्या नोकरी सोडण्याच्या निर्णयाने विपन्नावस्थेत गेले. घर सांभाळण्याचे कामं आईने केले. आईने विठ्ठलाच्या शालेय शिक्षणात खंड पडू दिला नाही. वडिलांप्रमाणेच महर्षींनी भाषा शिकण्यात आनंद घेतला. इंग्रजी, मराठी, संस्कृत आणि संतवाड्.मय यांची गोडी त्यांना लागली. त्यांच्या घरी सर्व जाती - धर्माचे लोक येत असत. घरातच त्यांच्यावर समानतेचे संस्कार झाले. विठ्ठलरावांचा विवाह त्यांच्या वयाच्या ९व्या वर्षी आत्तेबहीण रूक्मिणीबाईंशी झाला. १८९१ मध्ये महर्षी मॅट्रिकच्या परीक्षेत सर्वप्रथम आल्यावर जमखिंडीतील शाळेत शिक्षक झाले. पुढे ते उच्चशिक्षणासाठी पुण्यात फर्ग्युसन महाविद्यालयात आले. अत्यंत विपरित परिस्थितीला तोंड देऊन त्यांनी आपला प्रथम क्रमांक सोडला नाही. याच काळात त्यांच्यावर प्राचार्य आगरकर यांच्या विचारांचा आणि लेखणीचा




मँचेस्टर कॉलेज ऑक्सफर्डमध्ये अध्ययन करीत असताना

डोक्यावर फेटा नाही असा महर्षी शिंदे यांचा दुर्मिळ छायाचित्र

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे दुर्मिळ छायाचित्रे

प्रभाव पडला. यातूनच त्यांचा कल नास्तिकवादाकडे झुकला. मिल मेकॉले यांचे लेखन त्यांनी वाचले मात्र त्यांच्यावर खरा प्रभाव पडला तो हर्बर्ट स्पेन्सरचा त्यांची दोन पुस्तके (एज्युकेशन, इन्ट्रोडक्शन ऑफ द स्टडी ऑफ सोशोलॉजी) विशेष महत्त्वाची ठरली. याच काळात आपल्या भगिनी जनाक्का शिंदे यांच्या शिक्षणाची सोय विठ्ठलरावांनी पुण्यात केली. या कामी त्यांना मिस हर्फर्ड आणि मिस मेरी भोर यांची मदत झाली. अशातच त्यांचा प्रार्थना समाजाशी संबंध आला. पूर्वी त्यांच्या मनावर एकेश्वरवादाचा प्रभाव होताच प्रार्थनासमाजात गेल्यावर तो अधिक दृढ झाला. म.फुले यांचे समर्थक रामचंद्र अण्णाजी कळसकर आणि न्या.रानडे यांची याच काळात शिंदे यांच्याशी भेट झाली. प्रार्थना समाजाच्या कार्याकडे आकृष्ट होऊन त्यांनी समाजाची दीक्षा घेतली.

**परदेशगमन –** इंग्लंडमधील युनिटेरियन पंथांच्या वतीने भारतातील ब्राम्हो समाजाच्या एका अभ्यासू तरुणास 'ब्रिटिश अँण्ड फॉरेन' असोसिएशन च्या मदतीने इंग्लंड मध्ये ऑक्सफर्ड विद्यापिठात धर्मशिक्षणासाठी दोन वर्षे पाठविण्याची योजना आली. त्यानुसार मोती बुलासा यांची निवड झाली.मोती बुलास परदेशात निघाले.मात्र, भारत- इंग्लंड प्रवासातच त्यांचे निधन झाले.या रिकाम्या झालेल्या जागेसाठी शिंदे यांची निवड झाली. महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी त्यांना परदेशात जाण्यासाठी खर्च दिला. १९०१ मध्ये शिंदे परदेशात गेले. येथे गेल्यावर (मँचेस्टर कॉलेज) शिंदे अंतर्बाहय बदलून गेले. अखंड वाचन,थोरामोठयांशी भेटी, स्थलदर्शन, व्याख्याने, चर्चा यांद्वारे शिंदे यांनी हा कालखंड व्यतीत केला. इंग्लंड, स्कॉटलंड, फ्रान्स, जर्मनी, हॉलंड, स्वित्झर्लंड, इटली या देशांना त्यांनी भेटी दिल्या. लिव्हरपूल येथील 'त्रैवार्षिक युनिटेरियन परिषदेस ते उपस्थित राहिले. हॉलंडमधील ॲमस्टरडॅम येथे 'आंतरराष्ट्रीय उदार परिषदेत' त्यांनी भाषण दिले. १९०३ मध्ये भारतात परतल्यावर मुंबईच्या प्रार्थना मंदिराच्या आवारात 'सेवाव्रती' या नात्याने




थॉमस मेकॅलो हर्बर्ट स्पेन्सर गोपाळ गणेश आगरकर सयाजीराव गायकवाड

ऑक्सफर्ड विद्यापीठ

त्यांचे काम सुरू झाले.

**समाजाचे कार्य –** महाराष्ट्रात परतल्यावर शिंदे यांनी प्रार्थना समाजाचे कार्य सुरू केले. मुंबई, पुणे, नगर, सातारा येथे प्रार्थना समाजाचे कार्य चालले होते. या वेळी प्रार्थना समाजाचे मुखपत्र 'सुबोधपत्रिका' चालू होते. रात्रशाळा चालविणे व अन्य सामाजिक कार्ये यात प्रार्थना समाजाचा सहभाग होता.

आले, तरी शिंदे डगमगले नाहीत. त्यांनी साप्ताहिक उपासना, कौटुंबिक धर्माचरण, स्नेहसंमेलने, स्त्रियांसाठी 'आर्य महिला समाज', मुलांसाठी धर्म व नीती शिकविण्याचे वर्ग, तरूणासाठी बाहय मंडळ, वृद्धांसाठी संगत सभा, बाहेरील उत्सुक लोकांसाठी व्याख्याने असे उपक्रम चालू



अशातच शिंदे यांनी १९०३ च्या मद्रास (चेन्नई)येथे भरणाऱ्या काँग्रेसच्या अधिवेशनास जाण्याचा निर्णय घेतला. अर्धा युरोप पाहिलेले शिंदे खऱ्या अर्थाने भारत बघत–बघत तेथे पोहोचले. येथे त्यांना भारतातील ब्राम्हो समाजाच्या कामातील मर्यादांची जाणीव झाली.

**प्रत्यक्ष अनुभव–** मद्रास दौरा आटपून शिंदे आंध्र, ओरिसा प्रांतात गेले. प्रार्थना स्थळांभोवतीची अस्वच्छता पाहून त्यांना वाईट वाटले. जमखिंडीत त्यांनी सामाजिक सुधारणांवर व्याख्याने दिली. या व्याख्यानांमुळे त्यांना विरोध सुरू झाला. येथेच त्यांनी एका दहा वर्षाच्या मुलीला मुरळी म्हणून ( देवाच्या नावावर सोडून दिलेल्या) काम करणे सोडून देण्यासाठी तिला घरी बोलवून तिच्याशी व तिच्या पालकांशी चर्चा केली. गावातील लोकांना हे आवडले नाही. लोकांनी शिंदे कुटुंबियांना गावात राहणे त्रासदायक करून टाकले. शिंदे आई–वडिलांसह मुंबईल परतले.पुढे ते गुजरातमध्ये गेले असता तेथे सुद्धा त्यांना जातीभेदाचा विदारक अनुभव आला.

**कार्य विस्तार :–** एकीकडे नाऊमेद करणारे अनुभव ठेवलेच होते. उलट त्यात अधिकच भर घातली.

**पोस्टल मिशन :–** कुलकर्णी यांनी शिंदे यांच्या चरित्रात 'पोस्टल मिशन' च्या कार्याची माहिती दिली आहे. त्याचा थोडक्यात सारांश पुढीलप्रमाणे– शिंदे यांनी पोस्टल मिशन , उदार धर्मग्रंथ वाचन वर्ग, तरुण ब्राम्होसंघ अशा तीन नव्या संस्था उभारल्या. 'पोस्टल मिशन' ही संकल्पना त्यांना इंग्लंडमध्ये अनुभवायला मिळाली होती. ब्राहमधर्माच्या तत्वावर आणि उपासना पद्धतीवर पुस्तिका तयार करून, त्या टपालाद्वारे लोकांना पाठविणे आणि त्यावर वाचकांकडून ज्या शंका अथवा प्रश्न येतील, त्याबाबत पत्रव्यवहार करून आणि सवडीप्रमाणे त्यांना भेटीस बोलावून धर्मप्रसार करणे असे पोस्टल मिशनचे काम होते. उदार धर्मग्रंथ वाचन वर्ग सुरू करण्यामागे तरुण विद्यार्थ्यांना मूलभूत धर्मग्रंथांचे वाचन करण्याची सवय लागावी, हा हेतू होता. महाराष्ट्रीय, गुजराती, ख्रिश्चन, मुसलमान अश्या विद्यार्थ्यांचा समावेश या इंग्रजी भाषेतून चालविल्या जाणाऱ्या वर्गात होता. तरुण ब्राम्होसंघ चालविण्यामागे तरुणांस विधी करता यावेत हा उद्देश होता. मुंबईत मजुरांसाठी ज्या रात्रशाळा

चालविल्या जात होत्या त्याच्याच जोडीला पुण्यात सर्व जातींच्या मुलांना शिक्षण घेता येईल अशी रात्रशाळा त्यांनी सुरू केली. 'भारतीय एकेश्वरी धर्मपरिषद' या संस्थेचेही काम त्यांनी सुरू केले. या सगळ्यामधून शिंदे यांनी' प्रार्थना समाजाला जातीभेद आणि अस्पृश्यतेविरुद्ध उभे केले. ही त्यांची सक्रिय कामगिरी प्रार्थना समाजाच्या इतिहासातील अभूतपूर्व कामगिरी होय.

**भारतीय निराश्रित साहयकारी मंडळी–** शिंदे १९०५ मध्ये अहमदनगर येथील भिंगार गावी गेले असता त्यांस 'डिस्प्रेड क्लासेस मिशन ऑफ इंडिया' या (भारतीय निराश्रित साह्यकारी मंडळी–भानिसामं)संस्थेची कल्पना सुचली.१९०१ च्या जनगणनेची आकडेवारी जाहीर झाली तेव्हा १/६ लोकसंख्या साध्या माणूसपणाचे अधिकार नाकारली गेलेली लोकसंख्या होती. हे चित्र बदलून टाकायचे असेल तर आपणच व्यक्तिगत पुढाकार घेतला पाहिजे असे महर्षींना वाटू लागले, 'मिशन' स्थापनेचा निर्णय घेतल्यावर त्यांना शेठ सुखडवाला यांनी एक हजार रुपयांची देणगी तात्काळ दिली. न्या. चंदावरकर मिशनचे अध्यक्ष झाले. सेक्रेटरी पदी शिंदे होते. कार्यवाह म्हणून जनाक्का शिंदे यांनी स्वखुशीने कार्य स्वीकारले.

**मिशनचा उद्देश –** "हिंदूस्थानातील महार, मांग, चांभार पारिया वगैरे अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या वर्गाना आणि इतर अश्याच रीतीने निराश्रित झालेल्या लोकांमध्ये शिक्षणाचा प्रसार करणे ,त्यांना नोकऱ्या मिळवून देणे, त्यांच्या सामाजिक अडचणींचे निवारण करणे आणि सार्वजनिक धर्म,व्यक्तिगत शील व नागरिकता वगैरे गुणांचा प्रसार या गरीब लोकांमध्ये करणे." मिशनने तात्काळ कामाला सुरुवात करून मुला-मुलींच्या मोफत शाळा, रात्र शाळा, धर्मार्थ दवाखाना, वाचनालय, तालीम, शिवणवर्ग,प्रार्थना आणि व्याख्याने उपक्रमांस सुरुवात केली. दयाराम गिडुमल यांच्या मदतीने 'निराश्रित सेवासदन' सुरु करण्यात आले. या कामी जनाक्का शिंदे आणि त्यांच्या सहकारी यांनी पुढाकार घेतला.या सेवासदनने आरोग्य क्षेत्रात आणि मुलांच्या जीवनात बदल घडवून आणण्यात पुढाकार घेतला. याच्याच जोडीला 'सोमवंशीय मित्रसमाज', 'भजनसमाज हे उपक्रम सुरू झाले. एका जर्मन तज्ज्ञ उद्योजकांच्या मदतीने बूट तयार करायचा कारखाना सुरू करण्यात आला. मिशनच्या कामाची माहिती सर्वांना देण्यासाठी 'प्युरिटी सर्व्हंट' मासिक सुरू करण्यात आले. यासाठीचा खर्च देणग्या, स्कॉलरशिप यामधून गोळा करण्यात येऊ लागला . पैसाफंड, तांदूळफंड, कापडफंड, पेटीफंड अशा बहुविध उपक्रमांची आखणी करण्यात आली. शिंदे यांनी आपल्या कार्याचा व्याप प्रांत, जिल्हा,तालुका स्तरापर्यंत वाढवत नेला. सुरत काँग्रेसच्या अधिवेशनात 'अस्पृश्यता निवारण परिषद' आणि पुणे शहरात 'महाराष्ट्र परिषद' आयोजित करण्यात आली. शिंदे यांनी केंद्र सरकारला समाजाच्या सर्वांगीण विकासासंदर्भात सूचना केल्या.

**राजकारण –** समाजकारणाच्या क्षेत्रात प्रभावी वाटचाल केल्यावर महर्षींच्या जीवनात राजकारणाचे पर्व आले. राष्ट्रीय ऐक्याला प्राधान्य देण्याची भूमिका त्यांनी घेतली. यासाठी त्यांनी १९१७ मध्ये 'मराठा राष्ट्रीय संघ' स्थापन केला. 'बहुजन पक्ष' तयार करून त्यांनी निवडणूक लढविली परंतु त्यांना अपयशाचा सामना करावा लागला, तरीही त्यांनी आपली भूमिका सोडली नाही. विरोधी पक्षियांना आपली भूमिका ते समजावून सांगतच होते. मुलींना शिक्षण देण्याच्या संदर्भात पुण्यात त्यांनी टिळकपंथियांना जोरदार विरोध करून स्त्री शिक्षणास प्रोत्साहन दिले. पुण्यातील पर्वती मंदिर सर्वांसाठी खुले असले पाहिजे यासाठी शिंदे यांनी मंदिर प्रवेश सत्याग्रहात भाग घेतला.राष्ट्रीय सभेने(काँगेसने)अस्पृश्यता निवारण्याचा ठराव मांडावा असा प्रयत्न शिंदे १९०७ पासूनच करीत होते.अखेर १९१७च्या कलकत्ता अधिवेशनात(अध्यक्ष-ॲनी बेझंट)हा ठराव मांडण्यात आला.ॲनी बेझंट पुणे शहरात येऊन शिंदे यांच्या कार्याची पाहणी करून गेल्या होत्या. हे कार्य अधिक पुढे नेण्यासाठी शिंदे यांनी 'अखिल भारतीय अस्पृश्यता निवारक संघ'संस्था स्थापली.या संस्थेच्या माध्यमातून मुंबईत तीन दिवसांची एक परिषद घेण्यात आली.पुढे १९१७ मध्ये भारतमंत्री लॉर्ड एडविन माँटेग्यू यांनी लॉर्ड साऊथबरो यांच्या अध्यक्षतेखाली रिफॉर्म्स कमिटी नेमली होती.विविध प्रांतांमध्ये कायदे कौन्सिलमध्ये प्रतिनिधी पाठविण्यासाठी त्याचे स्वरूप काय असावे यासंबधी शिंदे यांनी जी साक्ष दिली त्यावरून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी त्यांचे वैचारिक मतभेद झाले.१९२०मध्ये माणगाव परिषदेत राजश्री छत्रपती शाहू महाराजांनी 'तुमच्या जातीचाच पुढारी तुम्ही नेमावा' अशी भूमिका घेतल्याने अस्पृश्यांचे पुढारपण शिंदे यांच्या कडे राहणे अवघड झाले.पुढे त्यांनी डिप्रेस्ड क्लासेस मिशनच्या कामासही आपल्या सहकाऱ्यांकडे दिले.मंगलोर येथे ब्राम्हो समाजाचे वर्षभर काम आणि विशेषतः व्हायकोम मंदिर सत्याग्रहात सक्रिय सहभाग देऊन शिंदे पुण्यास परतले.पुण्यात आल्यावर त्यांनी 'कौटुंबिक उपासना मंडल'काढले.पुढे त्यांना बौद्ध धर्माची गोडी लागली. त्यांनी धम्मपद या ग्रंथाचा पध्दतशीर अभ्यास केला.अधिक जिज्ञासेपोटी ते ब्रह्मदेश येथे गेले.


ब्रह्मदेशातून परतल्यावर इंग्रज सरकारच्या सारापाढ आणि तुकडेबंदीच्या कायद्याच्या विरोधात शिंदे यांनी केशवराव जेधे यांच्या सहकार्याने पाच हजार शेतकऱ्यांचा मोर्चा आयोजित केला.एक लाख शेतकऱ्यांच्या सह्यांचे निवेदन त्यांनी सरकारला पाठविले. सविनय कायदेभंग चळवळीत सहभागी झाल्याबद्दल इंग्रज सरकारने शिंदे यांस अटक केली.सरकारची माफी मागायला त्यांनी नकार देऊन कारावास पूर्ण केला.

**लेखन –** या सगळ्या धकाधकीच्या काळात त्यांनी लेखन

आणि वाचन,चिंतन आणि मनन अजिबात सोडले नाही.परदेशात आणि देशात रोजनिशी लिहिण्याची सवय,प्रार्थना समाजाचे मुखपत्र सुबोधपत्रिका मधील लेखन, उपदेश, प्रवचन, कीर्तन व्याख्याने, दीर्घ निबंध (भारतातील उदार पंथ,एलिव्हेशन ऑफ द डिप्रेस्ड क्लासेस,ए प्ली फॉर दी मिशन फॉर डिप्रेस्ड क्लासेस, बहिष्कृत भारत इ.)'ब्राम्होधर्मसूची' ग्रंथाचे संपादन, विठ्ठल रामजी शिंदे यांचे लेख, व्याख्याने व उपदेश (१९१२), भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न हे ग्रंथ,भारतीय भाषा आणि त्यांचे व्याकरणाचा अभ्यास (मराठी,इंग्रजी, कानडी, गुजराथी, बंगाली,कोकणी, सिंधी, उडिया,संस्कृत इ.), वृत्तपत्रीय लेखन (सुबोधपत्रिका, विजयी मराठा, रत्नाकर, केसरी, विविध ज्ञानविस्तार, जागृती, हंटर, सत्यवादी, नवा काळ, इंडियन डेली मेल,जस्टीस इ.), इतिहास संशोधनपर लेखन,महाराष्ट्र ज्ञानकोशाच्या संपादकांस मदत अशी भव्य कामे त्यांनी केली.१९३३मध्ये बडोदे संस्थानने त्यांना 'श्रीमंत सयाजीराव गायकवाड पारितोषिक' जाहीर केले. पारितोषिकाचे स्वरूप म्हणजे एक हजार रोख आणि शंभर रुपये प्रतिमाह तनखा अशा स्वरुपात हा सन्मान देण्यात आला.त्या काळचा विचार करता हे पारितोषिक भारतातील एक महत्त्वाचे पारितोषिक होय.

**समारोप–** ख्यातनाम अभ्यासक गो.मा.पवार महर्षींच्या मोठेपणाचे वर्णन पुढील शब्दात करतात–"अस्पृश्यता निवारणकार्याचे १९२०पर्यंतचे पहिले पर्व हे जागृतीचे म्हटले तर विठ्ठल रामजी शिंदे हे ह्या पर्वाचे प्रवर्तक ठरतात." "कानडी आणि मराठी या भाषांमधील संबंधांचा सविस्तर ऊहापोह करून कानडीचा शब्दसंग्रह तसेच व्याकरण यांचा मराठीवर मोठा प्रभाव पडला आहे, हे त्यांनी दाखविले आहे. 'भागवत धर्माचा विकास' ह्या लेखमालेमध्ये भक्ती या तत्त्वाचा विकास प्राचीन काळापासून वर्तमानकाळापर्यंत कसकसा होत गेला, याचे विवेचन केले आहे. विठ्ठल रामजी शिंदे यांचे लेख, व्याख्याने आणि उपदेश (१९१२) या पुस्तकात प्राधान्याने धर्मपर लेख, तर पुढील  कार्यकाळातील अनेकविध सामाजिक, शैक्षणिक व संशोधनपर विषयांवर लिहिलेले लेख, शिंदे लेखसंग्रह (१९६३) या पुस्तकात संग्रहित करण्यात आले आहेत. त्यांचे धर्मविषयक तसेच प्रवासवर्णनपर, व्यक्तिविषयक व अन्य स्फुट स्वरूपाचे लेखन धर्म, जीवन व तत्त्वज्ञान (१९७९) ह्या ग्रंथात एकत्रित केलेले आहे. शिंदे यांनी फर्ग्युसन कॉलेजात (१८९८), इंग्लंडमध्ये (१९०१-०३) व येरवड्याच्या तुरुंगात (१९३०) असताना लिहिलेली रोजनिशी (प्रकाशन १९७९) व माझ्या आठवणी व अनुभव (प्रकाशन १९४३; १९५८) हे पुस्तक त्यांचे आत्मपर स्वरूपाचे लेखन आहे. या लेखनातून त्यांच्या मनाची आध्यात्मिक ठेवण, तरल संवेदनशीलता, सूक्ष्म सौंदर्यदृष्टी आणि प्रसन्न विनोदवृत्ती हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विशेष प्रत्ययाला येतात.अस्पृश्यता निवारणासाठी व या वर्गाच्या उन्नतीसाठी शिंदे यांनी त्यागवृत्तीने व समर्पणाच्या भावनेने आयुष्यभर जे कार्य केले, त्याबद्दल त्यांचा 'कर्मवीर' तसेच 'महर्षी' या उपाधींनी गौरवपूर्ण उल्लेख केला जातो".








## परिवर्तनाचे शिल्पकार

### फुले-शाहू-आंबेडकर व्याख्यानमाला



# व्यापार, उद्योग व सहकाराचे आश्रयदाते

# राजर्षी शाहू महाराज



डॉ. जयसिंगराव पवार

**परिवर्तनाचे शिल्पकार : फुले–शाहू–आंबेडकर या व्याख्यानमालेअंतर्गत राजर्षि शाहू यांनी व्यापार, उद्योग व सहकाराचे आश्रयदातेसंबंधी राबविलेल्या धोरणांचा व केलेल्या कार्याचा राजर्षि शाहू चरित्राचे अभ्यासकार आणि ज्येष्ठ इतिहासकार डॉ. जयसिंगराव पवार यांनी घेतलेला संक्षिप्त आढावा.**

शाहू महाराजांनी कृषी क्षेत्रामध्ये केलेल्या अनेक उपाययोजना, अनेक प्रयोग आपण पाहिले आहेत. या प्रयोगांनी शाहू महाराजांना हरितक्रांतीचे जनक ही बिरूदावली प्राप्त करून दिली. आज आपला देश शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर ढवळून निघालेला आहे. आंदोलन चालू आहे. म्हणजे फुल्यांच्यापासून, शाहू महाराजांच्यापासून शेतकऱ्यांचा प्रश्न होताच. शेतकरी सुखी झाला पाहिजे, शेतकरी समृद्ध झाला पाहिजे. त्याच्या पिकाला, त्याच्या उत्पादनाला योग्य भाव मिळाला पाहिजे. बाजारपेठा निर्माण झाल्या पाहिजेत. या सगळ्या गोष्टी शाहू महाराजांनी त्या काळामध्ये शंभर वर्षांपूर्वी कशा केल्या, याचं उत्तर आपल्याला त्यांच्या चरित्रामध्ये मिळतं.

आज आपण पाहणार आहोत, की शाहू महाराजांनी व्यापार-उद्योगामध्ये, उद्योगधंद्याच्या क्षेत्रामध्ये आणि सहकाराच्या क्षेत्रामध्ये कोणकोणते उपक्रम राबवले. फक्त कृषीच नाही, व्यापार, उद्योगधंदे आणि सहकार. मराठी माणूस व्यापाराच्या भानगडीत पडत नाही, असं आजही म्हटलं जातं आणि शाहू महाराजांच्या काळातही म्हटलं जात होतं. पण, शाहू महाराजांची शिकवण जर आपण अंगिकारली असती, तर आज गुजराती व्यापाऱ्यांच्याबरोबर आज आपण व्यापारी झालो असतो. त्या महात्म्यानी आपल्याला खूप सांगितलं, की व्यापारात पडा. १९१७ साली खामगाव, प्रसिद्ध असे जे अधिवेशन झालं मराठा शिक्षण परिषदेचं, त्याच्या अध्यक्षपदावरून बोलताना शाहू महाराजांनी ही खंत बोलून दाखवलेली आहे. पहा ते काय म्हणतात, आम्ही शेतकरी किंवा सैनिक होऊनच राहावे ही स्थिती आम्हाला समाधानकारक नाही. म्हणून व्यापारधंदे आणि उच्च प्रतिचे व्यवसाय यात आम्हांस शिरण्याची जरूरी आहे. हल्ली आम्ही व्यापार-उदीम यात पडतच नाही. विसाव्या शतकात राष्ट्राची उन्नती, व्यापार व तत्संबंधीची चळवळ यावर अवलंबून आहे. खरोखरच व्यापार हा पाश्चिमात्य राष्ट्रांचा धर्मच आहे. हा राष्ट्रधर्म करायला पाहिजे. याठिकाणी धर्माची व्याख्या काय सांगितली आहे. धर्म म्हणजे रिलिजन नव्हे. तर धर्म म्हणजे बुद्धीयुक्त स्वहित साधणे आम्ही असे समजतो. व्यापार करण्याचे साहस आम्ही केले नाही, तर आमच्या सर्व चळवळी निस्तेज आणि निरर्थक होतील.

बऱ्याचशा गोष्टी या पैशांवर अवलंबून असतात. साधन संपत्तीवर अवलंबून असतात. ती जर तुमच्याकडं नसेल, तर नुसत्या चळवळी करून काय उपयोग आहे. त्या निरर्थक होतात. आता मोठं धरण बांधायचंय. त्याला पैसा पाहिजे. मोठं उत्पादन झालं, तर बराच मोठा कर हा राज्याला मिळेल. त्यातून मोठ मोठी धरणं बांधली जातील. मोठ मोठे उपक्रम उपयोजित केले जातील. म्हणजे काहीही तुम्ही केलं तरी शेवटी समृद्धी ही पाहिजे आणि समृद्धी येण्यासाठी तुम्हाला व्यापार हा एक चांगला मार्ग आहे. शाहू महाराजांनी जे सांगितलं, ते आज कोणत्या अर्थानं सत्य ठरलंय पाहा. आज सिंगापूरचं उदाहरण घेऊ. स्वतंत्र देश आहे. तिथं काहीही उत्पादन होत नाही. पण प्रचंड प्रमाणावर ट्रेड चालतो आणि पर कॅपिटा इन्कम जगातल्या अनेक प्रगत देशांच्या बरोबरीचं, किंबहुना त्याच्यापेक्षा जास्त आहे. या सिंगापूरचा व्यापार हा धर्म आहे. शंभर वर्षे गेली तरी अजून आमच्या लक्षात येत नाही.

मी आपणाला पटेल असं एक उदाहरण सांगतो. ५०-६० वर्षांपूर्वी आम्ही विद्यार्थीदशेत असताना, गावाकडून रेल्वेनी येत असताना सिंधी लोक गोळ्या विकायचे. खेळणी विकायचे. त्यावेळेलासुद्धा एकही सिंधी भिकारी, ज्याला आपण निर्वासित



वगैरे म्हणत होतो, भीक मागत नव्हता. त्यांनी गोळ्या विकल्या. त्यांनी सटरफटर काम केलं. त्यांनी किराणा मालाची दुकानं काढली. पण व्यापार केला. आज ५० वर्षांनंतर कोल्हापुरची काय, सांगलीची काय आणि मुंबईची काय, परिस्थिती अशी आहे, की काही उद्योग त्यांच्या हातात गेलेत. कापड उद्योग, क्रिकेट किंवा मोठ्या प्रमाणात ज्याच्यात खर्च येतो तशा प्रकारचे उद्योग. मोठमोठे खर्चिक उद्योग त्यांनी सुरू केलेले आहेत. व्यापारामध्ये आज ते पुढे आहेत. कोल्हापुरातला हार्डवेअरचा सगळा व्यापार त्यांच्याकडं आहे. तयार कपड्यांचा व्यापार त्यांच्याकडे आहे. हे आपणाला अनेक गोष्टींतून दिसून येतं, की व्यापार जेव्हा धर्म समजून समाज करतो, त्यावेळेला तो समृद्ध होतो.

तर राजापूर बंदरातनं आला. शाहू महाराजांनी हे सगळं बदलून टाकलं आणि कोल्हापूरला त्यांनी पेठ निर्माण केली. शाहूपुरी पेठ. मोठमोठे प्लॉट्स पाडले. निपाणी, शिरोळ, गडहिंग्लज, अन्य ठिकाणची संस्थानं, बाहेरचे व्यापारी त्यांना ते प्लॉट्स दिले आणि म्हणाले, की तुम्ही याठिकाणी वखारी काढा. आणि तशा प्रकारच्या वखारी काढून शाहूपुरी ही मोठी पेठ, हिंदुस्थानात पुढे गाजलेली अशी पेठ शाहू महाराजांनी स्थापन केली. १९०२ साली या बाजारपेठेतून ५० लाखाचा गूळ आणि २० लाखाची भूईमूग शेंग ही निर्यात झालेली होती.

त्याशिवाय दोन बाजारपेठा शाहू महाराजांनी निर्माण केल्या. एक म्हणजे जयसिंगपूर बाजारपेठ ही आपल्या वडिलांच्या नावे शिरोळजवळ म्हणजे रेल्वेच्याजवळ असणारी



व्यापार म्हटलं, की बाजारपेठा आणल्या पाहिजेत. बाजारपेठा निर्माण केल्या पाहिजेत. कोल्हापूर संस्थानामध्ये स्वत:ची बाजारपेठ नव्हती. आपल्याला आश्चर्य वाटतं, की त्यावेळी काय नव्हतं आणि शाहू महाराजांनी काय निर्माण केलं. कोल्हापुरामध्ये त्या काळापासून गूळ उत्पादन होतंय. आज जसा तो सर्व देशामध्ये प्रसिद्ध आहे, तसा तो त्या काळातही होता. पण तो कोल्हापुरचा गूळ म्हणून प्रसिद्ध नव्हता. तो राजापूरचा गूळ म्हणून प्रसिद्ध होता. कारण कोल्हापूरमधून घाट उतरून तो राजापूर बंदरामध्ये जायचा आणि राजापूर बंदरातून तो मुंबईला किंवा गुजरातला जायचा. तेव्हा गूळ कुठून आला,

नवीनच पेठ त्यांनी स्थापन केली. तिथेही मोठमोठे २ हजार, ३ हजार स्क्वेअर फुटाचे प्लॉट्स तयार केले. निपाणी, सांगली, गडहिंग्लजच्या व्यापारी लोकांना सांगितलं, की तुम्ही तिथं या. सेटलमेंट त्यांच्या त्याठिकाणी केल्या. आजही जयसिंगपूरची पेठ ही महाराष्ट्रातील सर्वात मोठी बाजारपेठ मानली जाते. तिसरी बाजारपेठ निर्माण केली, ती धरण जे बांधलं त्याला राधानगरी धरण म्हणतात, ती राधानगरी नावाची पेठ त्यांनी तिथं निर्माण केली. धरणाच्या खाली. सह्याद्रीचा जो घाट होता, त्या घाटाच्या दऱ्याखोऱ्यामध्ये वसलेली जी गावं होती, त्यांना किरकोळ कोणत्याही कामासाठी जर जायाचं झालं,

कोणताही माल आवश्यक असेल, वस्तू आवश्यक असेल तर त्यासाठी कोल्हापुरला यावं लागायचं. महाराजांनी ही अडचण ओळखली आणि घाटमाथ्यावर राधानगरी याठिकाणी नवीन पेठ त्यांनी स्थापन केली. त्याला राधानगरी हे नाव नंतर देण्यात आलं. तिथल्या लोकांचा जो प्रश्न होता, तो त्यांनी मिटवला.

तेव्हा व्यापार आणि उद्योग याच्यामध्ये बाजारपेठासुद्धा महत्त्वाच्या आहेत, त्या आपल्या असल्या पाहिजेत. दुसऱ्याच्या बाजारपेठांमध्ये आपला माल विकून काय करायचंय. आपले अडती निर्माण होतील, तिथं आपले हमाल असतील, म्हणजे आपल्या लोकांना उद्योग मिळेल. राजापूर बंदर काय शाहू महाराजांच्या संस्थानामध्ये नव्हतं. पण गूळ इथं शाहू महाराजांच्या संस्थानामध्ये निर्माण होऊन तो जात होता मात्र राजापूरचा गूळ म्हणून. आता शाहू महाराजांनी तो शिक्का पुसला आणि कोल्हापुरचा गूळ म्हणून तो सर्व भारतामध्ये जाऊ लागला.

केवळ व्यापारी क्षेत्रातच नव्हे; तर अन्य उद्योगधंद्यांच्या क्षेत्रामध्येही कोणकोणते उद्योग आपल्याला सुरू करता येतील यासाठी शाहू महाराजांनी राज्यावर आल्यानंतर जसा पाण्याचा सर्वे केला, तसा कोणकोणते उद्योग सुरू करता येतील आपणाला आणि कोणते आहेत, बहुतेक काही नव्हतंच. जे जे केलं त्याची सुरूवात शाहू महाराजांनीच केलेली आहे. पण शाहू महाराजांकडं जबरदस्त निरीक्षणशक्ती आहे. जंगलामध्ये केवळ शिकारीसाठी ते जात असत असं नाही. तर या जंगलाचं उत्पादन संस्थानाच्या समृद्धीसाठी कसं वापरता येईल, याचाही ते विचार करत होते. कोणकोणते उद्योग जंगलावर आधारित, तर त्यांच्या लक्षात आलं, की जंगलावर आधारित, जंगलामध्ये ज्या वनस्पती आहेत, त्यातून सुगंधी तेल आपल्याला निर्माण करता येईल. काष्ठाक नावाचा पदार्थ, तो निर्माण करता येईल. म्हणजे झाडाच्या खोडापासून अर्क काढणं आणि त्यातून व्हिनेगार, लोणारी कोळसा, डांबर यांसारखे पदार्थ, म्हणजे यासारखे उद्योग आपणाला संस्थानामध्ये सुरू करता येतील. आणि म्हणून त्यांनी याच्यावर इंडस्ट्रियल इन्स्पेक्टर नावाचा एक तज्ज्ञ माणूस, जो जपानहून शिकून आला होता केमिस्ट्री, त्याला नेमलं. सर्वे तर केलाच. सर्वे केल्यानंतर लक्षात आलं, की याठिकाणी अशा प्रकारचे उद्योग आपल्याला सुरू करता येतील आणि त्याप्रमाणं शाळीग्राम नावाचे जे इन्स्पेक्टर होते, त्यांच्या देखरेखीखाली त्याठिकाणी कोल्हापुरामध्ये काष्ठाध उद्योग आणि सुगंधी तेलाचे उद्योग सुरू झाले.



शाहू महाराजांनी याठिकाणचं सुगंधी तेल म्हैसूरच्या राष्ट्रीय प्रदर्शनामध्ये पाठवलं आणि त्याठिकाणी या तेलाचं इतकं कौतुक झालं, की चांदीचं पदक त्यांना कोल्हापुरच्या संस्थानाला बहाल करण्यात आलं आणि त्यावर अशी टिप्पणी करण्यात आली, की सुगंधित औषधी तेलाचे उत्पादन करण्याचा कोल्हापूर संस्थानातील हा उद्योग एक नाविन्यपूर्ण








उद्योग आहे. एक नाविन्यपूर्ण असा प्रयोग आहे. आणि अशा प्रकारचा प्रयोग भारतातील कोणत्याही संस्थानात आजपर्यंत कोणीही केलेला नाही. आम्ही प्रत्येकवेळी सांगतो, की शाहू महाराज पहिले आहेत. हे करणारे शाहू महाराज पहिले आहेत. माझ्या माहितीप्रमाणं, सह्याद्रीच्या जंगलातील लाकडापासून डांबर निर्माण करण्याचा प्रयोग अन्य कोणी केलेला आहे असं मला वाटत नाही. लोणारी कोळसा निर्माण करणं. लोणारी कोळसा, व्हिनेगर, डांबर सुद्धा मुंबईच्या प्रदर्शनात पाठवलं आणि तिथं सुद्धा चांदीचं पदक त्यांना मिळालं. शाहू महाराजांना मिळालं म्हणजे संस्थानाला मिळालं.

या क्षेत्रामध्ये अनेक प्रयोग करत असताना, सर्वात महत्त्वाचा प्रयोग जो होता, तो म्हणजे मधुमक्षिका पालन. आज अनेक ठिकाणी मधुमक्षिका पालन सुरू आहे. पण, शाहू महाराजांच्या काळामध्ये हा उद्योग अत्यंत नाविन्यपूर्ण होता. उद्योग म्हणून तर नाविन्यपूर्ण होताच, भारतामध्ये कुठंही सुरू नव्हता. शाहू महाराजांना वाटलं, की एवढं मोठं जंगल आहे, इतकी फुललेली झाडं आहेत, त्याठिकाणी मधुमक्षिका पालन उद्योग आपण सुरू केला, तर मोठ्या प्रमाणावर मध आपल्याला तयार करता येईल. म्हणून त्यांनी आपला एक चिटणीस नावाचा अधिकारी कलकत्त्याला पाठविला. तेव्हा कलकत्ता ही भारताची राजधानी होती हे लक्षात घ्या. सगळ्या खात्याची डिपार्टमेंटस् याठिकाणी होती. तर डायरेक्टर ऑफ ॲग्रीकल्चर यांच्याकडं पाठवला आणि त्यांच्यामार्फत त्यांना विनंती केली, की आम्हाला आमच्या संस्थानामध्ये हा उद्योग सुरू करायचाय. तेव्हा आम्हाला मार्गदर्शन करा. हे चिटणीस तिथे कलकत्त्याला गेले, राहिले, डायरेक्टरना भेटले. तिथल्या लोकांनी सांगितलं, की अशा प्रकारचा उद्योग आम्हाला माहित नाही. फक्त एक कोणतरी हौशी माणूस मधुमक्षिका पालन करत होता. तोही प्रयोग त्याचा बंद पडला. तो अधिकारी शाहू महाराजांना हे सांगत आला. शाहू महाराज म्हणाले, की यावरची सगळी पुस्तकं, परदेशातूनही गोळा करा, कोल्हापुरला आणा आणि त्याचा अभ्यास करा आणि आपल्या संस्थानामध्ये हा उद्योग सुरू करा. त्याप्रमाणं पुस्तकं, ग्रंथ आणले गेले. त्याच्या अध्ययनासाठी अधिकारी बसवले. आणि मधुमक्षिका पालन हा उद्योग कोल्हापूर संस्थानामध्ये सुरू केला, जो या देशातला पहिला उद्योग मानावा लागेल. म्हणजे याचे जनकसुद्धा शाहू महाराज आहेत.

किती किती गोष्टी सांगाव्यात. अहो, होमिओपॅथी औषध हे माहित होतं लोकांना. फक्त पंजाबमध्ये रणजितसिंहांनी ते वापरलं होतं. सर्व हिंदुस्थानामध्ये संस्थानिकांनी होमिओपॅथीला फारसा थारा दिला नव्हता. होमिओपॅथी शाहू महाराजांनी सुरू केली. म्हणजे आज हे होमिओपॅथीच्या विद्यार्थ्यांनासुद्धा माहित असायला पाहिजे. तेव्हा मधुमक्षिका पालन हा जो


उद्योग आहे, हा भारतामधला पहिला प्रयोग आणि त्याचे जनक शाहू महाराज असं मानलं पाहिजे.

या क्षेत्रामधला एक मोठा प्रयोग म्हणजे शाहू मिल ही कापडाची गिरणी, याचा





उल्लेख करावा लागेल. शाहू महाराजांना असं वाटत होतं, की छोटे छोटे उद्योग ठीक आहेत, पण मुंबईला ज्याप्रमाणं गिरण्या असतात, तशा गिरण्या आपल्याकडं का सुरू होऊ नयेत. राधानगरीसारखं धरण, म्हणजे जगात धरणं आहेत, पण माझ्या संस्थानामध्ये होणारं धरण हे सर्व देशामधलं मोठं धरण ठरलं पाहिजे. माझ्या संस्थानामध्ये मुंबईच्या गिरणीसारखी गिरणी सुरू झाली पाहिजे. म्हणून त्यांनी काही प्रतिष्ठित लोकांना, व्यापारी लोकांना एकत्र बोलावलं आणि सांगितलं, की मी पाहिजे ते सगळं सहकार्य तुम्हाला देतो, पन्नास हजारांचं भांडवल, २७ एकर जमीन, एक मोठंच्यामोठं तळं या सगळ्या गोष्टी शाहू महाराजांनी उपलब्ध करून दिल्या आणि शाहू महाराजांच्या या प्रयत्नातून कोल्हापुरामध्ये जी मील निर्माण झाली, तिला शाहू मिल असं नाव देण्यात आलं. या शाहू मिलचं उद्घाटन १९०६ साली शाहू महाराजांनी केलं आणि त्यावेळेला त्यांनी जे उद्गार काढले, ते फार महत्त्वाचे आहेत. ते म्हणतात, कोणत्याही परिस्थितीत हा चालू केलेला उद्योग बड्या गिरणी मालकांच्या किंवा धनिकांच्या ताब्यात जाणार नाही यासाठी कोल्हापुरच्या लोकांनी दक्ष राहिले पाहिजे. जसं वसतिगृह त्या त्या जातीतल्या लोकांनी सुरू केलेलं आहे असं शाहू महाराज भासवायचे, तसं इथंसुद्धा ते म्हणतायंत, की हे तुम्ही निर्माण केलेलं आहे, मी तुम्हाला जमीन दिली असेल, पण हा जो उद्योग आहे तो तुमचा आहे, तो कोणत्याही परिस्थितीमध्ये बड्या गिरणी मालकांच्या ताब्यात जाता कामा नये. यासाठी कोल्हापुरच्या लोकांनी दक्ष राहिलं पाहिजे आणि या उद्योगात असं यश संपादन केलं पाहिजे, की जगाला हे समजून चुकायला हवे की व्यापारी तंत्रातील कौशल्य, उद्योगधंद्यातील कौशल्य ही केवळ मुंबईचीच मक्तेदारी आहे असे नाही.



अनेक उद्योगधंदे, अनेक फॅक्टरीज शाहू महाराजांच्या काळात पहिल्यांदा सुरू झाले. शिरोळ, इचलकरंजी, गडहिंग्लज याठिकाणी जिनिंग्ज फॅक्टरी सुरू झाल्या. यानंतर दुसरी फॅक्टरी म्हणजे फौंड्री. फौंड्रीचं करजगार नावाचे गृहस्थ होते, लोहार मास्तर म्हणून, राजाराम इंडस्ट्रियल स्कूलमध्ये शिक्षण झालेलं, मोठा हुशार माणूस होता. त्यांच्याकडं बरचंसं काम त्यांनी सोपवलेलं होतं. नुसतं पारंपरिक पद्धतीनं उद्योगधंदे



करायचे, याच्यापलिकडं जाऊन वेगळ्या वाटा शोधण्याचं काम शाहू महाराजांनी केलं आणि दुसऱ्यांना त्या वाटा शोधण्यासाठी उद्युक्त केलं. त्या लोहार मास्तरांना सांगितलं, की एका बैलावर दोन मोटा चालल्या पाहिजेत असं यंत्र सुरू करा. खरं म्हणजे एका मोटेसाठी कमीत कमी दोन बैलं लागतात किंवा चार बैलं लागतात. तर इथं महाराज म्हणाले, की एका बैलावर दोन मोटा चालल्या पाहिजेत. म्हणजे याठिकाणी अर्थातच टेक्नॉलॉजीचा भाग आला. पुढं काय झालं, दुर्दैवानं याचा शोध लागला की नाही हे आपल्याला माहित झालं नाही.

सॉ मिल, ऑईल मिल यांसारखे उद्योग पहिल्यांदा शाहू महाराजांनी सुरू केले. त्यानंतर ट्रान्सपोर्ट कंपनी सुरू केली. त्यानंतर इलेक्ट्रिक कंपनी सुरू केली. असे कित्येक उद्योग शाहू महाराजांनी, अगदी ज्याला बेसिक उद्योग म्हणू अशा प्रकारचे उद्योग त्यांनी सुरू केले. यामध्येसुद्धा त्यांनी सहकार तत्त्वाचा अवलंब केलेला दिसतो. शाहू महाराजांनी शाहू मिलच्या निर्मितीमध्ये सहकाराचं तत्त्व अवलंबलं होतं. त्या काळामध्ये सहकारावर उद्योगधंदे चालू शकतात ही कल्पना अतिशय नाविन्यपूर्ण होती. कोल्हापूर संस्थानामध्ये अनेक उद्योग सुरू झाले. त्याच्यामध्ये सहकार तत्त्व शाहू महाराजांनी आणलं. १९१८ला मुंबईच्या गिरणी कामगारांच्यासमोर शाहू महाराजांनी दोन मोठी व्याख्याने दिली, त्याच्यामध्ये त्यांनी सहकार तत्त्वाचा अवलंब करा, एकीचा अवलंब करा असं सांगितलं होतं. गवताची एक काडी लगेच मोडते, पण त्याचा दोर जर आपण वळला तर हत्तीलासुद्धा बांधता येतं असं शाहू महाराज म्हणाले. म्हणून सहकारी पेढ्या काढ्या, पतपेढ्या काढा, सावकाराकडं जाऊ नका हे शाहू महाराजांनी शंभर-दीडशे वर्षापूर्वी सांगितलेलं आहे.

थोडासा अभ्यास केला तर आपल्याला लक्षात येईल, की त्या काळातले संस्थानिक काय करत होते. मनमौजी होते. शाहू महाराज काय करत होते. शाहू महाराज शेतकऱ्याचा विचार करत होते. कामगाराचा विचार करत होते. हे सगळे एकत्र कसे येतील. त्यांच्यामधला सहकार कसा वाढीस लागेल. तेव्हा सहकारी तत्त्वाचा अवलंब करणारा, त्याचा पुरस्कार करणारा हा भारतातला पहिला राजा आहे, हे आपण लक्षात घेतलं पाहिजे. मघाशी मी त्या करजगारांचं नाव घेतलं. ते जिनगर समाजातले. त्यांनी पहिली फौंड्री कोल्हापुरामध्ये स्थापन केली. शाहू महाराजांच्या प्रोत्साहनानं. आज अनेक फौंड्री आहेत. कोल्हापूर हे ऑईल इंजिनच्या बाबतीमध्ये सर्व जगात प्रसिद्ध झालं. कोल्हापूर ऑईल इंजिनची एक मोनापॉली आपल्या देशात त्यांनी निर्माण केली आणि मध्य आशिया,





महाद्वार रोडवरील वणकुद्रे यांच्या भांड्याच्या दुकानाचे जुने छायाचित्र

अतिपूर्वेकडील राज्यं अशा सगळीकडं कोल्हापूरची ऑईल इंजिन्स गेली. याचा पाया शाहू महाराजांनी घातलेला दिसतो. जिनगर हे फार कसबी कारागिर होते. घोड्याच्या पाठीवरची जीन तयार करणारे. तर त्यांच्याठिकाणी जी एक कलासक्ती होती, कलाप्रियता होती त्याचा उपयोग शाहू महाराजांनी केलेला दिसतो. ते म्हणाले, की अरे, त्यातच अडकून पडू नका. अनेक गोष्टी तुमच्या हाताशी आहेत. सध्या राजाश्रयापेक्षा लोकाश्रय विशेष श्रेयस्कर आहे. मी देऊन देऊन किती देणार तुम्हाला. पण लोकांचा जर आश्रय तुम्ही केलात, म्हणजे लोकांना पाहिजे त्या वस्तू तुम्ही तयार केल्या, तसेच आता प्रत्येकाने निरनिराळे काम करण्याचे दिवस गेले. एकच काम करायचं असं नाही. तर पुष्कळ लोकांनी आपली कुशलता, अक्कल, पैसा, अंग मेहनत एकत्र केली पाहिजे. म्हणजे कोणाकडं कौशल्य आहे, पण पैसा नाही, कोणाकडं पैसा आहे, पण कौशल्य नाही तर अशा दोघांनी एकत्र आलं पाहिजे. ही भूमिका शाहू महाराजांनी याठिकाणी मांडलेली दिसते. अक्कल, पैसा, अंग मेहनत एकत्र केली पाहिजे, म्हणजेच सहकार्य केलं पाहिजे. पूर्वी फार तर एक कुटुंब एका ठिकाणी काम करीत. येणारा नफा त्या कुटुंबातल्या माणसास उपयोगी पडे. आता आपली ही कुटुंबपद्धती, कुटुंबाची व्याख्या पुष्कळ विस्तृत केली पाहिजे. दहा, वीस, पन्नास कुटुंबे उद्योगधंद्यासाठी एकत्र आली पाहिजेत. त्यांच्या योग्यतेप्रमाणे प्रत्येकाला वेतन मिळाले पाहिजे. होणारा नफाही वाटून मिळाला पाहिजे, यासाठी सहकार्य करण्यास शिका व सहकारी पेढी काढा.

१९१२ला शाहू महाराजांनी सहकारी कायदा केला. कारण, सहकारी संस्था रजिस्टर कुठे होणार. त्यासाठी एक रजिस्ट्रार निर्माण केला. १९१२पासून १९२२पर्यंत रेकॉर्ड असं सांगतंय, की ३७ उद्योगधंदे सहकार तत्त्वावर रजिस्टर झाले. शाहू महाराज हे कोल्हापुरातीलच नव्हे; तर देशातील, मुंबई इलाख्यातील सहकारी तत्त्वाचा पुरस्कार करणारे एक आदर्श राज्यकर्ते म्हणून त्यांची नोंद इतिहासामध्ये केलेली आहे.

आज कोल्हापूर हे अनेक क्षेत्रात आघाडीवर आहे. सहकाराच्या क्षेत्रामध्ये जी काही राज्ये आघाडीवर असतील, त्या सर्व राज्यांचे जे काही जिल्हे आघाडीवर असतील, त्या सर्व जिल्ह्यांमध्ये कोल्हापूर पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या क्रमांकावर आहे. कोल्हापुरचं पर कॅपिटा इन्कम २०१३–१४मध्ये एक लाख आणि काही वर आहे. आता कदाचित पर कॅपिटा इन्कम दीड लाखावर गेला असेल. पर कॅपिटा इन्कममध्ये दोन जिल्ह्यांच्या स्पर्धा सारख्या व्हायच्या. त्यातला एक जिल्हा आहे पंजाबमधला भटिंडा. एकतर भटिंडा पहिला,

नाहीतर महाराष्ट्रातला कोल्हापूर पहिला. ही सुबत्ता कोणी दिली तुम्हाला? या सुबत्तेचा पाया कोणी रचला? कोणी आदर्श निर्माण केले? ही श्रीमंती काय आकाशातून पडलेली नाही हे लक्षात घ्या. इथल्या लोकांनी कष्ट करून, शाहू महाराजांची प्रेरणा त्यांच्या पाठीमागं होती, शाहू महाराजांची शिकवण त्यांच्या पाठीशी उभी होती म्हणून आज गावोगावी तुम्हाला सहकारी सोसायट्या दिसतील. सहकारी सोसायटीच्या माध्यमातून सगळे व्यवहार शेतकऱ्यांचे चाललेले दिसतात. आज दूध उत्पादनामध्ये राष्ट्रीय स्तरावर जवळजवळ आम्ही पहिले आहोत. राष्ट्रीय पातळीवर दूध उत्पादनाची अनेक बक्षिसे कोल्हापूर जिल्हा दूध उत्पादक संघाने, गोकुळने मिळविली. कोल्हापुरचा शेतकरी हा अतिशय कष्टाळू आहे.


कोल्हापुरातील पद्माळा तलावाच्या परिसरातील रेसकोर्स मैदान.



एक तसूभरसुद्धा जमीन तो वाया जाऊ देत नाही. हे जरी खरं असलं तरी त्याच्या पाठीमागचा इतिहास आपणाला माहित पाहिजे, की हीच माणसं कष्टाळू कशी काय झाली? शाहू महाराजांची प्रेरणा आहे. कष्टासाठीही प्रेरणा आहे आणि कष्टानं मोठं होण्याचीही प्रेरणा आहे.

आपणाला आणखीन एक उद्योग सांगावा लागतो, तो म्हणजे सूत उत्पादन. म्हणजे कोल्हापुरामध्ये साखर, दूध आणि सूत या तीन गोष्टींचं उत्पादन मोठ्या प्रमाणावर होतं. कोल्हापुरात कापसाचं उत्पादन घेतलं जात नाही, तरीही अनेक सुताच्या गिरण्या निर्माण झालेल्या दिसतात. या गिरण्या आपला माल यूरोपियन कंट्रीजना एक्स्पोर्ट करतात. तिथेही सहकार आला. काही खासगी आहेत, काही सहकारी आहेत. म्हणजे आज कोल्हापुरातला सामान्य शेतकरी जरी घेतला तर उसाचा पैसा तर त्याला मिळतोच. पण त्याचा सर्व घरखर्च



हा एक-दोन ज्या म्हशी असतात त्यावर चालतो. त्याच्या कारभारणीकडे हा पैसा जातो. तशी व्यवस्थाच केली आहे, की दुधाचा पैसा हा शेतकऱ्याच्या बायकोकडे गेला पाहिजे. तीसुद्धा स्वयंभू व्हायला पाहिजे. ही आमच्या शाहू महाराजांची शिकवण आहे. त्यामुळेच आम्हाला पदोपदी शाहू महाराजांची आठवण होते. समृद्धी, संकटामध्येही येते.

समाजामध्ये शेतकऱ्याच्या बरोबरीनं दुसरा एक महत्त्वाचा घटक म्हणजे कामगार आणि या कामगारांच्या हिताच्या संदर्भात शाहू महाराजांनी जे विचार मांडले आहेत ते मूलगामी स्वरूपाचे आहेत. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय राजकारणाचा चांगला अभ्यास होता त्यांचा. महायुद्ध नुकतंच संपलेलं होतं. जगामध्ये मोठमोठ्या उलथापालथी होत होत्या. जर्मनी आणि

रशिया याठिकाणच्या राजेशाह्या उलथवून टाकण्यात आल्या होत्या आणि कामगार पक्षांचे राज्य आले होते. यूरोपमध्ये कामगारांच्या हिताची आंदोलने सुरू होती. कामगारांचे मोठमोठे संघ झाले होते. १९१८ला शाहू महाराज जेव्हा मुंबईतील कामगारांच्या पुढं भाषण करताना म्हणतात, की यूरोपात







मोठमोठे संघ निर्माण झालेत. तसे संघ तुम्ही का निर्माण करत नाही. म्हणजे राजकीयदृष्ट्या तुम्ही जागृत राहिले पाहिजे. मताधिकार मागितला पाहिजे. त्यावेळी सार्वत्रिक मताधिकार नव्हता. जमीन किंवा घर असणाऱ्यांनाच तो मताधिकार होता. शाहू महाराज म्हणतात, की तुम्ही राज्यकारभारामध्ये, प्रशासनामध्ये आपला वाटा मागितला पाहिजे. इंग्लंडमधले कामगार यशस्वी होतायंत. रशियामध्ये तर त्यांनी क्रांतीच केली. तर तुम्हाला तुमचे स्वतंत्र संघ बनवता आले पाहिजेत आणि संघाच्या मार्फत तुम्ही सरकारवर दबाव निर्माण केला पाहिजे. त्यावेळी तुमचे प्रतिनिधी कायदे मंडळात तुमचे प्रश्न मांडतील. आपली उन्नती आपल्याला करावी लागेल आणि त्यासाठी स्वावलंबी बनले पाहिजे. शाहू महाराजांनी याठिकाणी स्वावलंबन हा महत्त्वाचा संदेश दिला आहे.

म्हणजे शाहू महाराजांच्या समोर फक्त शेतकरी नाहीये, कामगार आहे, दलित आहे, अस्पृश्य आहे. असा राजा जो सर्व लोकांचा राजा आहे. सर्वांचं हित व्हावं, अगदी व्यापारी लोकांचंसुद्धा हित व्हावं. व्यापार कसा वाढील लागेल, व्यापारी मंडळी आपल्या संस्थानात कसे येतील या गोष्टी शाहू महाराजांच्या राजनीतीमध्ये, प्रशासकीय नीतीमध्ये आपल्याला दिसतात. एक गोष्ट सांगायची राहून गेली. शाहू महाराज फक्त संस्थानापुरतं पाहात नव्हते. कामगारांची सभा मुंबईला झालेली होती. म्हणजे फक्त संस्थानामधला कामगार त्यांच्या डोळ्यासमोर नाहीये. ज्यावेळी कम्युनिस्ट पक्षांची निर्मितीसुद्धा झालेली नव्हती, त्याच्याही अगोदर चार-पाच वर्षे आधी शाहू महाराजांनी हे विचार मांडलेले आहेत. म्हणून त्याला अतिशय महत्त्व आहे. सर्वांचा विचार शाहू महाराजांनी केलेला आहे. संस्थानच्या बाहेरच्या लोकांसाठीसुद्धा शाहू महाराजांनी मुक्त हस्ते मदत केलेली दिसते. शाहू महाराजांनी समाजाचा सर्वांगिण विचार केलेला दिसतो. केवळ शेती, केवळ व्यापार, केवळ सहकार तर या सगळ्या गोष्टी एकमेकांशी निगडित आहेत. वेगवेगळ्या लोकांना ते नव्या क्षितीजाकडे नेतायंत. स्वातंत्र्याचा इतिहास पाहिला तर स्वातंत्र्यानंतर सरकारनं सहकाराचं तत्त्व जास्त अवलंबलं. विशेषत: पंडित नेहरूंनी सहकाराचा नारा लावला. त्याची सुरूवात कोठून आहे, तर शाहू महाराजांपासून आहे. म्हणजे स्वातंत्र्यानंतर सरकारने ज्या ज्या गोष्टी म्हणजे शेती असेल, व्यापार असेल, उद्योगधंदे असतील, ज्या गोष्टी अवलंबल्या त्या सगळ्या गोष्टी शंभर वर्षांपूर्वी शाहू महाराजांनी राबवलेल्या आहेत.

# एकजुटीकडे दुर्लक्ष विनाशकारक!

अनंत बागाईतकर





उत्तर प्रदेश सरकारने त्यांच्या तथाकथित प्रगतीची जाहिरात करताना चक्क उत्तर प्रदेशातील हिंदू समाजाला आता कसे मोकळे वातावरण अनुभवण्यास मिळत आहे असे म्हटलेले आहे. एवढी धादांत सांप्रदायिक जाहिरात असूनही अजुनही कुणी त्याची दखल घेताना आढळत नाही. योगी आदित्यनाथ अजुनही स्मशानभूमि विरुध्द दफनभूमि असा जहरी प्रचार करीतच आहेत. राहूल गांधी हे अपघाताने झालेले हिंदू आहेत अशी अभद्र टिप्पणी त्यांनी करुनही त्याचा साधा निषेध करण्याचे धैर्यही कुणी दाखवत नाही ही या देशाची शोकांतिका आहे.

सेनादलांचे माजी प्रमुख, वरिष्ठ पदे भूषविलेले माजी सनदी अधिकारी, वकील अशा विविध क्षेत्रातील प्रतिष्ठितांनी राष्ट्रपति, पंतप्रधान आणि सरन्यायाधीशांना पत्रे लिहून हरिद्वार व त्यानंतर रायपूर येथे झालेल्या तथाकथित (अ)धर्मसंसदेत करण्यात आलेल्या भाषणांची त्वरित दखल घेऊन कारवाईची मागणी केली. प्रत्यक्षात त्यांनी व्यक्त केलेली चिंता ही पालथ्या घड्यावरील पाण्यासारखी ठरली. वर्तमान राज्यकर्त्यांना या समाजातील प्रतिष्ठित आणि संवेदनशील व्यक्तींनी व्यक्त केलेली चिंता ही समजली नसेल असा निष्कर्ष काढणे वेडेपणाचा ठरेल. राज्यकर्त्यांनी बहिरेपणाचे सोंग घेतलेले असल्याने ही चिंता ऐकली नसल्याचेच ढोंग ते करणार हे स्पष्ट आहे. उलट या तथाकथित धर्मपरिषदा पुरस्कृत असल्याचा संशय यावा अशा रीतीने त्यांची पाठराखणही कोडगेपणाने केली जात आहे. अन्यथा देशातील मुस्लिम समाजाच्या विरोधात सशस्त्र संघर्षाचे आवाहन करणाऱ्यांना




क्षणार्धात बंदिवान करणे अपेक्षित होते. उत्तर प्रदेशात मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यावर किंवा त्यांच्या सरकारवर साधार टीका करणाऱ्या पत्रकारांना तत्परतेने देशद्रोहाच्या आरोपाखाली बंदिवान करणारे हे राज्यकर्ते, उघडउघड राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्याविरुध्द गरळ ओकतात आणि त्यांना मारणाऱ्या नथुराम गोडसेचे समर्थन करतात, त्या साधूच्या वेषातील समाजकंटकांविरुध्द कारवाई करणे टाळतात, तेव्हाच त्यांचे ढोंग आणि सोंग उघडकीस येते. देशात पध्दतशीरपणे बहुसंख्यकवादाचा प्रचार व प्रसार सुरु करण्यात आलेला आहे. अल्पसंख्यक समाजाने दुय्यम स्थान स्वीकारुन मुकाट्याने चूपचाप बसावे ही अपेक्षा केली जात आहे. धर्मांतराच्या विरोधात कायदे करणे, मंदिरांवरील सरकारी व्यवस्थापन मागे घेऊन पुन्हा ती पुरोहित व महंतांच्या ताब्यात देण्याचे म्हणजेच घड्याळाचे काटे उलटे फिरविण्याचे प्रकार राजरोसपणे सुरु करण्यात आले आहेत. स्वातंत्र्याच्या पंच्याहत्तरीत उदारमतवादी लोकशाही भारताचे रुपांतर बहुसंख्यकवादी सर्वंकष व एकाधिकारवादी राज्यव्यवस्थेत रुपांतर करण्याच्या दिशेने वाटचाल केली जात आहे. यासाठी लोकशाही संस्थांचे देखील पध्दतशीरपणे खच्चीकरण करुन देशाची सूत्रे व राज्यकारभार मूठभर व्यक्तींच्या हाती एकवटण्याचा किंवा केंद्रित करण्याचा योजनाबध्द प्रकारही बिनदिक्कतपणे व विधिनिषेधशून्यपणे सुरु आहे.

हरिद्वार येथील धर्मसंसदेत मुस्लिम समाजाच्या




विरोधात सशस्त्र संघर्षांचे उघड आवाहन करण्यात आले. या धर्मसंसदेत भाजपचे नेतेही सामील होते. उत्तराखंडचे मंत्रीही या संमेलनाला उपस्थित होते. अल्पसंख्यक समाजांच्या विरोधात एका मागून एक वक्त्यांनी विष ओकले. एवढेच नव्हे तर वृत्तवाहिन्यांच्या प्रतिनिधींनी जेव्हा त्यांना प्रक्षोभक भाषा व निवेदनाबद्दल विचारल्यानंतर त्यांनी त्यांच्या भूमिकेचे समर्थनच केले. देशाच्या राज्यघटनेत समाविष्ट धार्मिक बंधुभाव व सलोख्याचे तत्व असो किंवा समाजात उघडपणे संघर्षाची प्रक्षोभक व चिथावणीखोर भाषेचा वापर

हा बेकायदेशीर आहे आणि त्याबाबत कारवाई होऊ शकते याकडे लक्ष वेधल्यानंतर देखील काषाय वस्त्रधारी तथाकथित साधूंनी त्यांनी केलेली भाषणे बरोबर आहेत आणि त्यात चूक नाही असे निगरगट्टपणे सांगितले. हरिद्वारच्या या संमेलनानंतर लगेचच छत्तीसगढची राजधानी रायपूर येथे अशीच धर्मसंसद भरली व त्यामधील साधू-संत महात्मा गांधी यांच्यावर घसरले आणि त्यांनी या राष्ट्रपित्याबद्दल वाटेल ती निर्गळ भाषणे केली. हरिद्वारमध्ये एका वक्त्याने तर आपल्याला पिस्तुल मिळाले तर आपण मनमोहनसिंग यांना मारले असते असे सांगितले. देशात हिंदू राष्ट्र स्थापन केलेच पाहिजे अशी आग्रही




मागणी या मंडळींनी केली. विश्व हिंदू परिषदेच्या पुढाकाराने ही धर्मसंसद आयोजित करण्यात आली होती. २०१३मधील मुझफ्फरनगर दंग्यातील आरोपी असलेल्या आणि स्वतःला साधू म्हणवून घेणाऱ्याची यामध्ये प्रमुख भूमिका होती. यति नरसिंगानंद सरस्वती यामध्ये आयोजक होते. साध्वी अन्नपूर्णा देवी, धर्मदास महाराज(बिहार) अशी काही नावे समोर आली आहेत. हिंदूंना जागृत करण्यासाठी हे प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले. मनमोहनसिंग यांना पिस्तुलाने ठार मारण्याची इच्छा धर्मदास महाराज याने व्यक्त केली. नरसिंगानंद यांनी त्यास दुजेराही दिला. रायपूरच्या धर्मसंसदेत कालीचरण महाराज नावाच्या साधूने महात्मा गांधींबद्दल अभद्र भाषेचा वापर करुन तो कोणत्या लायकीचा साधू आहे ते दाखवून दिले. या मंचावर भाजपचे अनेक स्थानिक नेते उपस्थित होते. एक माजी काँग्रेसनेतेही विराजमान होते.

या साधूंच्या अभद्र आचरण व वर्तनाचे वर्णनही करण्याची गरज नाही. त्यांनी वापरलेली भाषा किंवा शुध्द भाषेत त्यांनी केलेली शिवीगाळ याचाही पुनरुच्चार करुन त्याला विनाकारण आणखी प्रसारित व प्रचारित करण्याची गरजही नाही. यानिमित्ताने सत्तेत बसलेले सत्ताधारी देशात कोणते ध्रुवीकरणाचे जहर पसरवू इच्छितात आणि त्याद्वारे देशात कोणता समाज तयार करु पहात आहेत याची दखल घेण्याची आवश्यकता आहे. या अभद्र टोळीला सत्ताधाऱ्यांचा पाठिंबा आहे हे आता स्पष्ट दिसू लागले आहे. या तथाकथित साधूंच्या टोळक्याविरुध्द उत्तराखंडमधील सरकारने कोणतीही




तत्काळ कारवाई केली नाही. जेव्हा जनमताचा आणि विरोधी पक्षांचा दबाव वाढू लागला तेव्हा नाईलाजाने आणि जिवावर आल्यासारखी उत्तराखंड पोलिसांनी व तेथील भाजप सरकारने या साधूंविरुध्द तक्रार नोंदवून घेतली. या साधूंविरुध्द केवळ तक्रार नोंदवून घेण्याखेरीज पुढची कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. उलट या भोंदू साधूंच्या टोळक्याबरोबर हास्यविनोद करतानाचे उत्तराखंड पोलिसांचे फोटो प्रसिध्द झाले आहेत. पोलिस हे सत्ताधाऱ्यांच्या हुकमाचे ताबेदार असतात. त्यामुळे या भोंदू साधूंच्या विरुध्द कारवाई करताना पोलिसांचे हात बांधलेले असणे हे स्वाभाविक आहे. छत्तीसगढमध्ये कारवाई झाली आणि कालीचरण नामक साधूला अटक करण्यात आली. परंतु देशात वातावरण अशा रीतीने प्रक्षोभक करण्यात आले आहे की साधूच्या वेषात समाजात


तिरस्कार-घृणा आणि विद्वेषाचे वातावरण पसरविणाऱ्यांनाही जनतेच्या एका मूठभर कंपूकडून समर्थन दिले जात आहे. या समर्थनाबरोबरच केंद्रीय सत्ताधाऱ्यांचा या सर्व प्रकारांना असलेला मूक पाठिंबा हा देखील या मूठभरांना धैर्य देत आहे. त्यामुळेच माजी सेनाप्रमुख, वरिष्ठ वकील, बुध्दीजीवि, सनदी अधिकारी, पोलिस अधिकारी यांना जी चिंता वाटू लागली आहे ती त्यांनी पत्राद्वारे प्रकट केली आहे किंवा त्यांना ती करावी लागली एवढे देशातले सामाजिक वातावरण खालावलेले आहे आणि बिघडत चालले आहे. या पत्राची दखल सत्ताधारी घेतील ही वेडी आशा करण्यात काहीच अर्थ नाही. परंतु सुजाण आणि सुबुध्दांनी त्या पत्राची दखल घेऊनच वेगाने फोफावणाऱ्या सांप्रदायिक आणि कट्टरपंथीयांच्या या विषारी मोहिमेचा मुकाबला करण्यासाठी स्वतःला सुसज्ज करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.



एस.पी. त्यागी



ज्युलियो रिबेरो





ॲडमिरल एल. रामदास



ॲडमिरल आर.के. धवन



ॲडमिरल विष्णू भागवत



ॲडमिरल अरुण प्रकाश

माजी सेनाधिकाऱ्यांना किंवा बुध्दीजीवींनी हे पत्र राष्ट्रपति आणि पंतप्रधानांना लिहिले आहे. याच्या प्रती त्यांनी उपराष्ट्रपति व राज्यसभेचे सभापति, लोकसभा अध्यक्ष आणि देशाच्या सरन्यायाधीशांना पाठविल्या आहेत. पत्र लिहिणाऱ्यांमध्ये माजी नौदलप्रमुख ॲडमिरल एल.रामदास, ॲडमिरल विष्णु भागवत, ॲडमिरल अरुण प्रकाश, ॲडमिरल आर.के.धवन, माजी हवाईदल प्रमुख एस.पी.त्यागी, ज्युलिओ रिबेरो यांच्यासारख्या अतिशय आदरणीय सेना व सुरक्षादलातील व सनदी क्षेत्रातील उच्चाधिकाऱ्यांबरोबरच कला, कायदा, पत्रकारिता, सामाजिक आणि सार्वजनिक, मानवाधिकार क्षेत्रात अग्रेसर असलेल्या धुरीणांच्या या खुल्या पत्रावर स्वाक्षऱ्या आहेत. मुस्लिमांप्रमाणेच ख्रिस्ती, शीख अशा अल्पसंख्यक समाजाबरोबरच दलित समाजाविरुध्द सशस्त्र संघर्षाची भाषा करुन तथाकथित वांशिक शुध्दीकरणाचा पुरस्कार करणाऱ्या या टोळक्याबद्दल या पत्रलेखकांनी चिंता व्यक्त केली आहे. या टोळक्याचे पाठीराखे या पत्रलेखकांमध्ये सेनादले व सुरक्षा दले किंवा सनदी अधिकाऱ्यांच्या सहभागाबद्दलही हरकती घेताना आढळतात. परंतु हाच मुद्दा या पत्रलेखकांनी स्पष्ट करताना म्हटले आहे की सुरक्षा

दले, सेनादले किंवा सनदी अधिकारी हे देशाच्या राज्यघटनेची शपथ घेऊन कर्तव्य पार पाडत असतात. त्यांची बांधिलकी राज्यघटनेशी असते. राज्यघटनेने सामाजिक सलोखा, सौहार्द, बंधुभाव यांच्याशी बांधिलकी व्यक्त केलेली असताना त्या तत्वांचे नुसतेच पालन नव्हे तर त्यांचे संरक्षण करणे आणि ती समाजात लागू करण्याच्या दृष्टीने प्रयत्नशील राहणे अपेक्षित असते. त्यामुळेच या पत्रलेखकांनी कायदा व सुव्यवस्थेची जबाबदारी असलेल्या यंत्रणांना देखील तसे आवाहन करताना या तत्वांचे बूज राखण्याची जबाबदारी त्यांच्यावर आहे याची जाणीव त्यांना करुन दिली आहे. त्याचबरोबर देशाच्या दोन सीमांवर म्हणजेच पाकिस्तान व चीनसारख्या भारताबद्दल शत्रुत्वाची भावना बाळगणाऱ्या शक्तींच्या कारवाया सुरु असताना देशातील अंतर्गत वातावरण अशा रीतीने सतत संघर्षाचे ठेवणे आणि अल्पसंख्यक समाजाच्या विरोधात पाडण्याचे आवाहन त्यांनी राष्ट्रपति व पंतप्रधानांना केले आहे. या पत्रलेखकांनी हे पत्र सर्व राजकीय पक्षांच्या प्रमुखांनाही पाठविले आहे आणि त्यांनी देखील राष्ट्रहिताच्या भूमिकेतून धर्माचा राजकारणासाठी वापर करु नये असे आवाहन केले आहे.

या सर्व धुरीणांनी अतिशय कळकळीच्या व राष्ट्रहिताच्या भावनेतून लिहिलेल्या पत्रावर सत्ताधाऱ्यांनी नेहमीप्रमाणेच मौन पाळले आहे. हे त्यांचे मौनच बोलके आहे. त्यांना परकी शत्रूशी देणेघेणे नाही. देशातल्या अल्पसंख्यक समाजाला धमक्या देण्यात ते पुरुषार्थ मानतात. या अल्पसंख्यक समाजाला धाकात ठेवणे हेच त्यांच्या दृष्टीने महत्वाचे व अग्रक्रमाचे व शौर्याचे कृत्य वाटते. चीनच्या घुसखोरीबद्दल तोंड लपविणारे ५६ इंची नेतृत्व या देशातल्या अल्पसंख्यक समाजाला धडा शिकविण्याची भाषा वापरण्यात धन्यता मानतात हे या देशाचे




सार्वजनिक आणि जाहीररीत्या प्रक्षोभक विधाने वातावरण भडकविण्याचे प्रकार देशाला दुर्बळ आणि कमकुवत करणारे आहेत. देशाशी शत्रुत्व बाळगणाऱ्या शक्ती याचाच गैरफायदा उठविण्याच्या प्रयत्नात असताना देशात सामाजिक सलोखा, एकजूट राखण्याची सर्वांची जबाबदारी आहे असे आवाहन करताना त्यांनी या एकजुटीच्या विरोधात काम करणाऱ्या या शक्तींना वेळीच रोखण्याची आवश्यकता व्यक्त केली आहे. शत्रुत्वाच्या बाह्य शक्ति आक्रमक असताना अंतर्गत वातावरण बिघडवून देशच कमजोर व दुर्बळ करण्याचा हा प्रकार हाणून दुर्दैव आहे. केवळ हे ५६ इंची नेतृत्वच नव्हे तर उत्तर प्रदेशाचे मुख्यमंत्री असोत किंवा स्वतःला पोलादी पुरुष क्रमांक २ मानणारे देशाचे गृहमंत्री असोत त्यांचे पौरुषत्व केवळ देशातल्या मुस्लिमांना घाबरविणे आणि त्यांना दहशतीखाली ठेवण्यातच खर्ची पडत आहे. चीन व पाकिस्तानपुढे त्यांचे पौरुषत्व गलितगात्र होते. या सर्व बाबी लक्षात घेता देशाच्या वाटचालीची दिशा लक्षात यावी.

देशातील सांप्रदायिक वातावरण बिघडविणे आणि धार्मिक ध्रुवीकरण कशासाठी? उत्तर साधे सोपे व सरळ

आहे. उत्तर प्रदेशासारख्या देशातल्या सर्वात मोठ्या राज्यात विधानसभा निवडणूक होत आहे. या राज्याचे मुख्यमंत्री योगीमहाराज आदित्यनाथ यांनी गेल्या पाच वर्षात सांप्रदायिक राजकारणाखेरीज काहीही केले नाही. कारण तो त्यांचा पिंडच आहे. सुधारणा, प्रगती व विकास यांच्याशी त्यांना देणेघेणेच नाही. अन्यथा नीती आयोगाने गरीबी व निर्धनतेत त्यांच्या राज्याला तिसरा क्रमांक दिला नसता. आरोग्य क्षेत्र व त्यातील सोयी सुविधांच्या संदर्भातील आरोग्य निर्देशांकात उत्तर प्रदेशाचे स्थान देशात शेवटचे आहे. आर्थिक आघाडीवर तर आनंदीआनंदच आहे. नीती आयोग तर सरकारी आणि वर्तमान राज्यकर्त्यांच्या कृपाछत्राखालीच काम करीत आहे. तरीदेखील त्यांनी उत्तर प्रदेशाचे हे मूल्यमापन केले आहे.

एवढे असूनही डोळे उघडलेले नाहीत. देशाचे पंतप्रधान दररोज उत्तर प्रदेशात जाऊन जणूकाही तेथे पृथ्वीवरील स्वर्गच अवतरला आहे अशा थाटात प्रमाणपत्रे वाटत आहेत. एखाद्या बनावट विद्यापीठातर्फे खोटी सर्टिफिकिटे वाटली जातात आणि मागाहून त्याचा भंडाफोड होतो तसाच हा प्रकार चालू आहे. उत्तर प्रदेशात रोज जाहीर सभा घेऊन योगीमहाराजांना अशी खोटी प्रमाणपत्रे वाटण्याचे काम दिल्लीपति करीत आहेत. प्रगती–विकास–सुधारणांची ही प्रमाणपत्रे खोटी असल्यानेच दुसऱ्या बाजुला सांप्रदायिक आणि धार्मिक ध्रुवीकरणाचा हुकमी पत्ता खेळत रहायचा अशी ही रणनीती आहे. त्यामुळे उत्तर प्रदेश, उत्तराखंड या राज्यातील सत्ता टिकविण्यासाठी कट्टर हिंदुत्वाचे मुद्दे उभे करायचे. तिकडे गोव्यात जाऊन आपण व्हॅटिकनला जाऊन पोप महाशयांना कसे आलिंगन दिले याचे भांडवल करायचे असे नाट्यप्रयोग विश्वप्रिय ब्रह्मांडनायकांनी सुरु केले आहेत. हरिद्वार काय किंवा रायपूर येथील धर्मसंसदांचा उपयोग याच ध्रुवीकरणासाठी केला जात आहे आणि म्हणूनच त्यातील भोंदूंविरुध्द कारवाई देखील न करता त्यांची पाठराखण केली जात आहे.

धार्मिक ध्रुवीकरणासाठी दिल्लीपतींकडून मोठ्या चतुराईने काही प्रतीके जाणीवपूर्वक वापरली जात असतात. हरिद्वार किंवा रायपूरमधील धर्मसंसदा हा त्यातला रानटी प्रकार आहे. परंतु कोणत्याही निवडणुका जवळ आल्या की काश्मीरच्या खोऱ्यात अचानक दहशतवादी कारवाया वाढू लागतात. दहशतवाद्यांचे म्होरके अचानक मारले जाऊ लागतात. वरवर दिसायला या चकमकी वाटत असल्या तरी यानिमित्ताने या कारवायांमागे पाकिस्तानचा असलेला हात आणि पाकिस्तान व काश्मीर म्हटल्यानंतर मुस्लिमांबद्दलच्या सर्वसाधारण रागात भर पडत जाणे स्वाभाविक असते. याखेरीज दिल्लीपति त्यांच्या भाषणातून धार्मिक ध्रुवीकरणास पोषक अशी विधाने करीतच असतात.


उत्तर प्रदेश सरकारने त्यांच्या तथाकथित प्रगतीची जाहिरात करताना चक्क उत्तर प्रदेशातील हिंदू समाजाला आता कसे मोकळे वातावरण अनुभवण्यास मिळत आहे असे म्हटलेले आहे. एवढी धादांत सांप्रदायिक जाहिरात असूनही अजुनही कुणी त्याची दखल घेताना आढळत नाही. योगी आदित्यनाथ अजुनही स्मशानभूमि विरुध्द दफनभूमि असा जहरी प्रचार करीतच आहेत. राहूल गांधी हे अपघाताने झालेले हिंदू आहेत अशी अभद्र टिप्पणी त्यांनी करुनही त्याचा साधा निषेध करण्याचे धैर्यही कुणी दाखवत नाही ही या देशाची शोकांतिका आहे.



असाच एक ताजा प्रकार निदर्शनाला आला आहे. त्यासाठी माहिती तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. सामाजिक क्षेत्रात आणि विशेषतः नागरी स्वातंत्र्य रक्षण आणि मानवाधिकार क्षेत्रात सक्रिय असलेल्या मुस्लिम महिला कार्यकर्त्यांच्या विरोधात अत्यंत खालच्या पातळीवर जाऊन प्रचारमोहिम सुरु करण्यात आली. यामध्ये त्यांचे फोटो देखील त्यांच्या परवानगीशिवाय वापरण्यात आलेले आहेत. कुणाचेही फोटो परवानगीशिवाय वापरण्यास व मुख्यतः सोशल मीडियावर वापरताना संबंधितांची परवानगी घेणे आवश्यक आहे. अन्यथा तो त्यांच्या व्यक्तिगत स्वातंत्र्याचा भंग मानला जातो. परंतु केवळ या कार्यकर्त्या मुस्लिम असल्याने त्याबद्दलच्या कारवाईमध्ये दिरंगाई व टाळाटाळीचे प्रकार केले जात आहेत. या मुस्लिम महिलांविरुध्द अत्यंत अभद्र टिप्पण्या करुन त्यांच्या ऑनलाईन विक्रीचा अतिशय गलिच्छ प्रकार करण्यात आलेला आहे. सायबरक्राईम विभाग आणि पोलिसांना याबाबत त्वरित पावले उचलून कारवाई करण्याचे अधिकार असूनही व हे प्रकार करणाऱ्या सोशल मीडियाच्या कंपन्यांविरुध्द देखील कारवाई करणे अपेक्षित असताना बळजबरीच्या धर्मांतराच्या विरोधात कायदे अस्तित्वात आहेत. परंतु बसवराज यांनी धर्मांतर ही बाबच बेकायदेशीर ठरवून टाकली आहे. त्यांच्या या एक पाऊल पुढे टाकण्यामुळेच त्यांच्याच पक्षातले एक अत्यंत कट्टर हिंदुत्ववादी तरुणनेते तेजस्वी सूर्या यांना त्यांचेच शब्द मागे घेण्याची पाळी आली. धर्मांतर ही बाब अपराधाच्या श्रेणीत टाकणे हे केवळ अतार्किक आहे. परंतु हिंदुत्वाचे अधिक आक्रमक आविष्कार कोण करते यामध्ये सध्या जी चढाओढ व शर्यत सुरु झाली आहे त्यामध्ये सद्सद्विवेक नावाला उरलेला नाही. अविवेकीपणा करुन प्रसिध्दीच्या झोतात राहणे आपण किती कट्टर हिंदू आहोत याचे हिडीस प्रदर्शन करण्यात धन्यता मानणाऱ्यांसाठी सध्या सुगीचा हंगाम आहे. बसवराज बोम्मई यांनी हाच प्रकार केला आहे. तिकडे आसाममध्ये नव्याने बाटून भाजपतर्फे मुख्यमंत्री झालेले हिमांत बिश्श सरमा देखील असेच बेताल वागत आहेत.

या सर्वच राजकीय सर्कशीचा मनमुराद आनंद दिल्लीपति घेत आहेत. हा आनंद तूर्तास बरा वाटतही असेल. परंतु यातूनच भस्मासूर निर्माण होत असतात आणि ते जीवघेणे होऊ लागतात. कॉंग्रेस राजवटीत जर्नेलसिंग भिंद्रावालां यांच्या रुपाने


हिमांत बिश्श सरमा


बसवराज बोम्मई

नेहमीची टाळाटाळ सुरु आहे.असे किती प्रकार देशात या एका विशिष्ट विचारसरणीच्या मंडळींमार्फत सुरु आहेत. कर्नाटकात सध्या बसवराज बोम्मई मुख्यमंत्री आहेत. ते भाजपमध्ये असले तरी ते माजी मुख्यमंत्री आणि जनता दलाचे एकेकाळचे राष्ट्रीय अध्यक्ष एस.आर.बोम्मई यांचे चिरंजीव आहेत. त्यांचे वडिल हे पुरोगामी होतेच परंतु एकेकाळचे रॉयवादी होते. मानवेंद्रनाथ रॉय हे भारतातील फार मोठे विद्वान मार्क्सवादी विचारवंत होते. त्यांचा अनुयायीवर्ग मोठा होता आणि बोम्मई त्यापैकी एक होते. त्या बोम्मईंचे बसवराज हे चिरंजीव असूनही त्यांनी केवळ पदाच्या मोहापायी कट्टरपंथीयांसारखे वर्तन व आचरण करावे हे आश्चर्यकारक आहे. या बसवराजांनी कर्नाटकात धर्मांतरविरोधी कायदा केला आहे. देशात सत्तीच्या किंवा असाच एक नेता निर्माण झाला होता ज्याच्यामुळे भारताच्या एकतेला व एकात्मतेलाच सुरुंग लागण्याची पाळी आली होती. त्यातून निर्माण झालेल्या आगडोंबात देशाच्या एका पंतप्रधानाला जीव गमवावा लागला होता. तो इतिहास फार जुना नाही. सांप्रदायिकतेचे भूत खतरनाक असते. त्याचप्रमाणे समाजात सतत संघर्षाचे वातावरण खदखदत ठेवणेही देशाला नुकसानकारक असते. विशेषतः परकी व बाह्य शक्ति देशाच्या विरोधात आक्रमक असताना देशाची आणि सामाजिक एकजूट टिकविणे ही अग्रक्रमाची बाब असते. त्याकडे दुर्लक्ष करणे देशाला परवडणारे नसते. थोडेसे दुर्लक्ष विनाशाला आमंत्रण देणारे ठरु शकते!

# पद्मविभूषण शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त अमरावती जिल्ह्यात १२००० नेत्रदृष्टीचा शुभारंभ संकल्प संपन्न

## राजमाता अहिल्यादेवी फाऊंडेशन व महात्मे आय बँक आय हॉस्पीटलचा अनोखा उपक्रम पहिल्या टप्प्यात ७२२ रुग्णांची तपासणी तर २१० रुग्णांचे मोतीबिंदु शस्त्रक्रियेकरीता निवड

### सौ. सुरेखाताई ठाकरे व संतोष महात्मे मित्रमंडळाचे आयोजन

राजमाता अहिल्यादेवी फाऊंडेशन,अमरावती व महात्मे आय बँक आय हॉस्पीटल यांच्या संयुक्त विद्यमाने आदरणीय पद्मविभूषण शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त दि.१२/१२/२०२१ रोजी श्री हरी सभागृह वाठोडा शुक्लेश्वर ता.भातकुली जि.अमरावती येथे संकल्प १२००० नेत्रदृष्टीचा हा अनोखा उपक्रम मोफत नेत्रतपासणी, मोतीबिंदु ऑपरेशन शिबिराचे उद्घाटन आदरणीय साहेबांना ८१ वर्ष पुर्ण झाल्याने ८१ अंकाच्या आकारात ८१ दिव्यांचे दिपप्रज्वलन करुन शुभारंभ मा.ना.यशोमतीताई ठाकुर, महिला व बालकल्याण मंत्री तथा पालकमंत्री, कार्यक्रमाचे अध्यक्ष सौ.सुरेखाताई ठाकरे माजी जिल्हा परिषद अध्यक्ष तथा रा.अ.फाऊंडेशन चे मार्गदर्शक, श्री बाळासाहेब निमकर, फाऊंडेशनचे उपाध्यक्ष डॉ.गणेश काळे, सचिव माधुरीताई ढवळे, सहसचिव अनुश्री निखिल ठाकरे, श्री रविंद्र गोरटे, श्री रविंद्र बुरघाटे, यांच्या उपस्थितीत पार पडला. पहिल्याच टप्यात ७२२ रुग्णांची तपासणी तर २१० रुग्णांची मोतीबिंदु शस्त्रक्रिया करण्यात आली. संकल्प १२००० नेत्रदृष्टीचा. १२००० शस्त्रक्रिया १ वर्षात पूर्ण करण्यात येणार असल्याचे कार्यक्रमाचे आयोजक श्री संतोष महात्मे यांनी सांगितले. राजमाता अहिल्यादेवी फाऊंडेशन ही स्थानिक संस्था समाजामध्ये ज्या महिलांच्या सशक्तीकरणासाठी प्रेरणादायी कार्य करतात त्यांना राज्यस्तरीय अहिल्यादेवी स्त्री शक्ती पुरस्कार देऊन सन्मानित करण्याचे कार्य करते. आदरणीय पद्मविभूषण शरदचंदजी पवार साहेब यांच्या जिवनी विषयी काही बोलायचे धारिष्ट कदापी होणे नाही. राज्यातील जाणता राजा ही उपाधी जनसमुहाने बहाल केली आहे. त्या







देशव्यापी व्यक्तीमत्वाच्या ८१ व्या वर्षी शक्तिदायक जन्मदिवस साजरा करण्याचे भाग्य राजमाता अहिल्यादेवी फाऊंडेशन अमरावतीला लाभले आहे. हा सुवर्णक्षण आहे. आदरणीय साहेबांना पुढे असेच सेवाभावी सुदृढ उदंड आयुष्य लाभो या मनोकामनेने राजमाता अहिल्यादेवी फाऊंडेशन अमरावती च्या वतीने सन २०१५ पासून राज्यस्तरीय स्त्री शक्ती पुरस्कार प्रदान केल्या जातो. कला, क्रिडा, उद्योग,प्रशासन व समाजसेवा या क्षेत्रात दिशादर्शक महिलांच्या उत्कर्षासाठी कार्य करणाऱ्या स्त्री शक्ती चा सन्मान ही फाऊंडेशन करते. आजतागायत हे पुरस्कार उज्वलजी निकम, लोकसभा अध्यक्ष सुमित्राताई महाजन,








सिंधुताई सपकाळ, सांसद रत्न खा.सौ.सुप्रियाताई सुळे महामहिम राज्यपाल भगतसिंह कोश्यारी, पद्मश्री डॉ.विकास महात्मे यांचे शुभहस्ते प्रदान करण्यात आलेत.

महिलांच्या कार्यक्रमाला गौरवांकित करतांना त्यांचा वसा करण्याचे कार्यही राजमाता अहिल्यादेवी फाऊंडेशन ने केले.

या देशातील प्रभावी नेतृत्व आदरणीय पद्मविभूषण शरदचंद्रजी पवार साहेब देशाचे कृषिमंत्री असतांना त्यांनी केलेले भरीव कार्य सर्वश्रुत आहे. महिला बचत गटांना प्रोत्साहित व सक्षम करण्यासाठी ह्यांना अल्पदरात कर्ज उपलब्ध करुन देण्यासाठी बँकांचे धोरण व महिलांना ५०% आरक्षण आज जे महिला बचत गट कार्यान्वित आहेत व सक्षम आहे यात पवार साहेबांचा वरदहस्त आहे.

१२/१२/२०१२ ला आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेबांच्या जन्मदिनी विद्यार्थीनी तरुणी व महिला आत्मरक्षणासाठी संरक्षणाचे प्रशिक्षण देण्याचा उपक्रम राष्ट्रवादी कॉंग्रेस व ऑल महाराष्ट्र थां गता असोसिएशन चे महाविर धुलधर व राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे तत्कालिन जिल्हा अध्यक्ष संतोष महात्मे यांनी पुढाकार घेऊन सुरु केला व १२ हजार तरुणींना स्वयंसरक्षणाचे प्रशिक्षण देण्यात आले. हा उपक्रम सुरु असतांनाच दिल्लीच्या निर्भया प्रकरणाने अखखा देश हादरुन गेला याचे समाजात सर्वदूर पडसात उमटले आणि शासनस्तरावर तसेच विविध सामाजिक संस्थानी शालेय विद्यार्थीनी, तरुणी, महिलांना सक्षम करण्यासाठी त्यांना आत्मरक्षा करता यावी यासाठी मोहिम सुरु झाली. परंतू याची मुहुर्तमेढ अमरावतीला १२/१२/२०१२ ला रोवण्यात आली. आजही महिला सक्षमीकरणाचे काम अव्याहत सुरु आहे.

घंटाकर्ण




# योगीराज आदित्यनाथ आणि अखिलेश कोठून लढणार?

योगी आदित्यनाथ उत्तर प्रदेशातील आगामी विधानसभा निवडणूक लढविणार का?

कोठून? गोरखपूर, वाराणसी, मथुरा



की अयोध्या?

उत्तर प्रदेशातील विधानसभा निवडणुकीचे वेळापत्रक अजुन जाहीर व्हायचे आहे. पण प्रचाराचा गाजावाजा मोठा आहे. जणू काही लगेचच निवडणूक होत असल्याचा आभास त्यामुळे होत आहे.

तारखाच नव्हे तर तिकिटवाटपही अजुन गुलदस्तातच आहे.

मुख्य चर्चा आहे की मुख्यमंत्री विधानसभा लढविणार का?

कारण गेल्यावेळी ते संसदसदस्य होते आणि त्यांना मुख्यमंत्री करण्यात आल्यानंतर पोटनिवडणूक टाळण्यासाठी ते विधान परिषदेवर निवडून गेले. त्यामुळे आता यावेळी ते निवडणूक लढविणार का हा प्रश्न चर्चिला जात आहे. उत्तर प्रदेशात मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री हे विधानपरिषदेचे सदस्य आहेत.

मुख्यमंत्र्यांनी विधान परिषदेचे सदस्य राहण्यात गैर काहीच नाही. परंतु शक्यतोवर मुख्यमंत्री प्रत्यक्ष लोकांमधून निवडून आलेले असावेत अशी एक प्रथा किंवा पायंडा आहे. तसेच ज्याप्रमाणे गेल्यावेळी संसदसदस्य असल्याने त्यांना विधान परिषदेचा मार्ग निवडावा लागला ती बाबही अनुचित नाही. पण आता मुख्यमंत्रीपदावर असताना व निवडणूक होणार असताना त्यांनी ती लढविण्याची अपेक्षा चुकीची नाही.

भाजपमध्ये देखील हीच चर्चा आहे की सरकारचे नेतृत्व करणाऱ्यांनी प्रत्यक्ष लोकांमधून निवडून आलेले जास्त चांगले! त्यामुळेच दिनेश शर्मा आणि केशवप्रसाद मौर्य तसेच योगी महाराज यांच्यासाठी मतदारसंघांचा शोध सुरु झाला आहे.

योगीराजांनी कोणत्यातरी धार्मिक स्थळाहूनच निवडणूक लढवावी असे प्रयत्न चालू आहेत. एका अटकळीनुसार योगीराज बहुधा मथुरेहून निवडणूक लढवतील कारण त्यांनी अयोध्येनंतर कृष्णजन्मस्थानाच्या मुद्याचाही उल्लेख केलेला होता आणि मथुरेलाही जास्तच चकराही मारल्या होत्या. वाराणसीहून निवडणूक लढविणे कितपत शक्य आहे याची चाचपणी सुरु आहे. कारण पंतप्रधानांचाही तोच



मतदारसंघ आहे. गोरखपूर हा योगीराजांचा मतदारसंघ असला तरी तेथे भाजपचे दोन दबंग नेते विजयी होत असतात त्यापैकी कुणाचे तिकिट कापायचे असा प्रश्न निर्माण होऊ शकतो. मग शेवटचा पर्याय म्हणून अयोध्येचाही विचार केला जात आहे.

यामध्ये समान सूत्र किंवा धागा

हाच आहे की योगीराजांनी धार्मिक स्थळाहूनच निवडणूक लढवावी म्हणजे भाजपच्या धर्माधिष्ठित राजकारणाला त्यामुळे बळ मिळेल!

तिकडे भाजपचे प्रमुख प्रतिस्पर्धी समाजवादी पक्षाचे अखिलेश यांच्याबद्दलही अशीच अटकळबाजी सुरु आहे. कारण मुख्यमंत्री असताना तेही विधान परिषदेचेच सदस्य राहिले होते. सध्या ते लोकसभा सदस्य आहेत आणि आता भाजपच्या विरोधात ते नेतृत्व करीत असल्यामुळे ते विधानसभेची निवडणूक लढवून नेतृत्व देणार का अशी चर्चा विरोधी वर्तुळात सुरु आहे.

चला पाहू या कोण कोठून निवडणूक लढवते ते!

अर्थात विधानसभा निवडणूक लढविण्याचा निर्णय ते घेतील काय ते प्रथम पहावे लागेल!


## खड्डा खणला दुसऱ्यासाठी ........... पडले स्वतःच?

उत्तर प्रदेश विधानसभेची निवडणूक तारखा जाहीर होण्यापूर्वीच गाजू लागली आहे.

उत्तर प्रदेश पुन्हा काबीज करण्यासाठी भाजपच्या नेतृत्वाने जी काही धडपड सुरु केली आहे ती विलक्षण आहे.

एका राज्यातल्या सत्तेसाठी देशाचे पंतप्रधान रोजच्या रोज ज्या पध्दतीने दौरे, प्रचारसभा, निरनिराळ्या योजना, प्रकल्पांची नुसती भूमिपूजने करीत सुटले आहेत ते देखील तोंडात बोटे घालायला लावणारे आहे. गेल्या सत्तर वर्षात कोणत्याच पंतप्रधानाने जीव टाकून एका राज्यातील विधानसभेत विजयासाठी आपले सर्वस्व पणाला लावले नव्हते.

गंगेत नाहण्यापासून ते निरनिराळे पोशाख, पगड्या घालून



आणि नेहमीप्रमाणेच विरोधी पक्षांची निंदानालस्ती आणि हेटाळणी करीत प्रचार सुरु करण्यात आला आहे.

या निवडणुकीत भाजपला पर्याय म्हणून समाजवादी पक्षाने आघाडी घेतली आहे.

समाजवादी पक्षाचे एवढे धाडस? मग दिल्लीपति त्या पक्षाच्या मागे लागणे अपेक्षितच होते.

सत्तापक्षाने निवडणुकीच्या रणनीतीचा भाग म्हणून प्रमुख विरोधी पक्षांना बदनाम करण्याचे प्रकार अमलात आणण्याचा प्रकार सुरु केला आहे. त्यामध्ये त्या विरोधी पक्षाशी संबंधित किंवा प्रमुख नेत्यांच्या मागे ईडी, सीबीआय यासारख्या तपाससंस्थांना

ससेमिरा लावून द्यायचा ही प्रमुख गोष्ट! त्यासाठी जुनीजुनी प्रकरणे शोधायची ही सत्तापक्षाची व सत्ताधाऱ्यांची नेहमीची चलाखी झाली आहे.

परंतु एकदा वापरलेली युक्ति वारंवार वापरली की लोकांनाही त्यामागील चलाखी लक्षात येते हे सत्तेच्या नशेतच धुंद झालेल्यांना कळत नाही. त्यात मग अनेक वेळेस गडबडगुंडा होऊ शकतो.

समाजवादी पक्षाला बदनाम करण्यासाठी कानपूरमधील एक अत्तर निर्माता पियुष जैन याच्या घरावर नुकताच कर अधिकाऱ्यांनी छापा टाकला. त्यावेळी त्याच्याकडे सुमारे दोनशे कोटि रुपयांची रोकड रक्कम, अत्तर निर्मितीसाठी लागणाऱ्या सुगंधी सामानाचा मोठा साठा सापडला.







एवढे सर्व झाल्यावर सत्तापक्षाचे प्रवक्ते, त्यांच्या प्रचारकी टोळ्या, प्रचारक कामाला लागले. त्यांच्या मदतीला पाळीव माध्यमे होतीच.

यातच भर म्हणून विश्वप्रिय ब्रह्मांडनायकांनीही त्यांच्या परनिंदेच्या सवयीनुसार कोट्या करीत समाजवादी पक्षाला दूषणे लगावली.

पण झाले भलतेच!

समाजवादी पक्षाशी निगडित अत्तर निर्माते आणि त्या पक्षाचे विधान परिषद सदस्य पुष्पराज जैन उर्फ पंपी यांच्यावर छापा मारणे अपेक्षित असताना काहीतरी घोटाळा होऊन भाजप समर्थक पियुष जैन यांच्या घरावरच छापा टाकण्यात आला.

केवढा विचका आणि विस्कोट हो? करायला गेले एक आणि झाले भलतेच!

पाळीव वृत्तवाहिन्यांनी पियुष जैनच्या घराच्या व मालमत्तेच्या दृष्यांचा माराही प्रेक्षकांवर केला.

अखेर समाजवादी पक्षाचे आमदार पुष्पराज जैन उर्फ पंपी यांनी स्वतःहोऊन या पाळीव वृत्तवाहिन्यांना बोलावून सांगितले की ते जी मालमत्ता दाखवीत आहेत ती त्यांची आहे आणि कायदेशीर व वैध आहे. त्यांचे सर्व व्यवहार नियमानुसार आहेत. ज्याच्या विरुध्द कारवाई झाली तो केवळ त्यांचा शेजारी आहे. असा खुलासा झाल्यावर सर्व मुसळच केरात गेले! मग हे चुकीने पकडले गेलेले पियुष जैन कोण आहेत?

पियुष जैन हे म्हणे भाजपशी संबंधित आहेतच परंतु त्यांचे गुजरात आणि अहमदाबादशी देखील कनेक्शन असल्याचे सांगण्यात येते. तेही अत्तर व्यवसायात आहेत.

आता अहमदाबाद कनेक्शन म्हटले की कुणाचे?? असा प्रश्न करु नका आणि सगळंच सांगायला लावू नका! तर मंडळी फाजील उत्साह आणि आपल्या प्रतिस्पर्ध्यांना बदनाम करण्यासाठी खेळलेली चाल चांगलीच अंगाशी आली.

आता या सरकारपुरस्कृत छापाखोर संस्था-संघटनांच्या गोटातून कानावर आलेली कुजबूज ही की या पियुष जैनला म्हणे ५५ कोटि रुपयांचा दंड भरायला सांगितला आहे आणि तो त्याने मान्यही केला आहे.

आता मग झाले काय? तो दंड भरणार आणि सहीसलामत सुटून जाणार! मग काय? सगळ्यांनी हे प्रकरण विसरुन जायचे!

आहे किनई गंमत?

विश्वप्रिय ब्रह्मांडनायकांनी अगदी नाटकी हावभाव करीत आणि अभिनय करुन प्रचारसभेत या छाप्याचा उल्लेख केला आणि आपण फार मोठा विनोद किंवा कोटि करीत असल्याचा आव आणून या पैशाचा वास कसा दरवळतोय म्हणून समाजवादी पक्षाला हिणविण्याचा प्रयत्न केला. पण अरेरे!!! अगदी तोंडावर आपटी खावी तसेच झाले की हो!!! आता तरी या कारवाया बंद व्हाव्यात अशी अपेक्षा करायला हरकत नाही!

## रविशंकर प्रसाद आणि जावडेकर कुठे आहेत?

राजकारण निष्ठूर असतं!

जोपर्यंत चलती आहे तो पर्यंत सर्व ठीक असते पण एकदा राजकारणात पिछाडीवर पडलात की मग चित्र बदलते!

कालपर्यंत जे तुमच्या पुढेपुढे करीत असतात ते अचानक अदृष्य होतात, त्यांना तुमच्यासाठी वेळ मिळेनासा होतो.

तुम्ही एकाकी होत जाता.

पहा ना, एकेकाळचे कायदामंत्री, इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञान विभागाचे मंत्री असलेले रविशंकर प्रसाद हे मंत्रीपद गेल्यानंतर दिसेनासेच झाले.





तीच अवस्था प्रकाश जावडेकर यांची! तेही कुठे आहेत ते कळेनासे झाले आहे.

विश्वप्रियांनी आपल्या मंत्रिमंडळाची फेररचना आणि विस्तार केला त्यावेळी या दोन वरिष्ठ मंत्र्यांना अर्धचंद्र मिळाला. या निर्णयामुळे अनेक भृकुट्या वक्र झाल्या होत्या.

मंत्री आणि पक्षाचे प्रवक्ते अशा दोन्ही जबाबदाऱ्या सांभाळणाऱ्या या दोन नेत्यांच्या हातून असा कोणता प्रमाद घडला की ज्यामुळे त्यांना मंत्रिमंडळातून हद्दपार व्हावं लागलं असा प्रश्न अनेकांना पडला होता. त्यावेळी या दोन मंत्र्यांना संघटनात्मक जबाबदारी दिली जाईल असे सांगून वेळ मारुन नेण्यात आली होती.

प्रत्यक्षात तसे काहीही अद्याप घडलेले नाही.

रविशंकर प्रसाद आणि जावडेकर यांनी मध्यंतरी एक दोन लेख लिहून सरकार आणि विश्वप्रिय नेत्याची तळी उचलून धरण्याचा प्रयत्न करुन पाहिला पण त्यातून काहीच साध्य होऊ शकले नाही. दोघांनाही संघटनात्मक जबाबदाऱ्या देखील देण्यात आल्या नाहीत. रविशंकर प्रसाद यांच्याबद्दल सर्वांनाच मोठे आश्चर्य वाटलेले आहे की त्यांना डच्चू देण्याचे कारण काय?

विलक्षण आक्रमकता, घमेंडखोरपणा, अहंमन्यता ही त्यांच्या स्वभावाची प्रमुख वैशिष्ट्ये होती. विरोधी पक्षांना तुच्छ लेखून त्यांच्यावर टिप्पणी करण्यात त्यांचा हातखंडा होता. त्यामुळे त्यांना अर्धचंद्र मिळणे हे आश्चर्यकारक मानले गेले.

अर्थात या दोघांसारख्या वरिष्ठ मंत्र्यांना काढण्यामागे तेवढीच उचित कारणेही असतील आणि ती कारणे केवळ ब्रह्मांडनायकांनाच माहिती असतील त्यामुळे त्याबद्दल केवळ अंदाज बांधण्याखेरीज दुसरे काही करता येणार नाही.

पक्ष आणि सरकारमधून बहिष्कृत हे नेते सध्या करतात तरी काय?

रविशंकर प्रसाद पाटणा उर्फ पाटलिपुत्र मतदारसंघातून निवडून आले आहेत. त्यांना डच्चू मिळाल्यापासून त्यांनी मतदारसंघातच मुक्काम ठोकलेला आहे. त्यांना भीती वाटते की पुढच्या लोकसभा निवडणुकीत कदाचित त्यांचे तिकिटही कापले जाऊ शकते. बहुधा त्यामुळेच ते मतदारसंघाबाहेर पडेनासे झाले आहेत. इतके की भाजपच्या दिल्लीत झालेल्या



कार्यकारिणीतही ते सहभागी झाले नाहीत. संसदेत देखील ते अभावानेच दिसतात.

तीच गोष्ट जावडेकरांची आहे. त्यांचा मुक्काम पुण्यात असतो. त्यांची अधिवेशनातील उपस्थितीही फारशी आढळून आली नाही.

२५ डिसेंबरला अटलबिहारी वाजपेयींची जयंती होती. त्या दिवशी या दोघांनीही ट्वीट करुन वाजपेयी-अडवानी यांच्या नेतृत्वाखालील



भाजपच्या आठवणी जागविल्या.

वाजपेयी-अडवानी यांच्या नेतृत्वाखालच्या भाजपचे गुणगानही त्यांनी केले. बहुधा त्यांना ही जाणीव नसावी की आताच्या भाजपमध्ये केवळ एकाच व्यक्तीची चलती आहे आणि त्या व्यक्तीमुळेच भाजपला हे यश मिळाले अशी बहुतांश भाजप कार्यकर्त्यांची भावना आहे.

कालबाह्यता यालाच म्हणत असावेत!

# बुडत्याचा पाय खोलातच!


बिहारमध्ये एक माजी मुख्यमंत्री आहेत. त्यांचे नाव आहे जीतनराम मांझी. त्यांच्या पक्षाचे नाव आहे हिंदुस्तानी आवाम मोर्चा!

पूर्वी देखील त्यांच्या राजकीय भूमिका, राजकीय विधाने ही वादग्रस्त राहिलेली आहेत. बिहारच्या राजकारणातली चैतन्यशीलता व गतिमानता याला तेही अपवाद नाहीत. कधी लालूप्रसाद, कधी नीतीशकुमार कधी स्वतंत्र अशा पध्दतीने त्यांचे राजकारण चालू असते.

अलीकडेच त्यांनी ब्राह्मण समाजाविरुध्द अनुचित उद्‌गार काढले व त्यावरुन प्रचंड गदारोळ झाला आहे.

हिंदू समाज आणि विशेषतः या समाजात पाळली जाणारी जातींची प्रथा यावर त्यांनी टीका केली. ते स्वतः बिहारमधील अतिमागास किंवा महादलित म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुसहार किंवा मुसाहार समाजाचे आहेत. एकेकाळी खरोखर उंदीर मारुन खाणारे लोक म्हणून त्यांना वरील नावाने संबोधले जाऊन त्यांच्या समाजाला तेच नाव चिकटले.

सध्या ते भाजप व नीतीशकुमार यांच्याबरोबर आहेत. परंतु त्यांना




रामराम करण्याच्या तयारीत ते आहेत.

तर त्यांनी अलीकडेच बिहारमधील ब्राह्मण समाजाचा राग ओढवून घेतला. ब्राह्मण हे दलितांच्या घरी पूजापाठ करायला पौरोहित्य करायला जाऊ लागले आहेत. परंतु तेथे पाणीही पीत नाहीत. पण दक्षिणा मात्र मागून घेतात असे ते म्हणाले. या ढोंगीपणाबद्दल नाराजी व्यक्त करतानाच त्यांनी तेही हिंदू म्हणून नव्हे तर बौध्द म्हणून अखेरचा श्वास घेऊ इच्छितात असेही त्यांनी जाहीर केले.

यावर एकच गोंधळ सुरु झाला. बिहारमध्ये जातीवर आधारित राजकारण प्रभावी असल्याने या विधानाची तीव्र प्रतिक्रिया होणे अपेक्षितच होते.

भाजपचे एक ब्राह्मण नेते गजेंद्र झा यांनी मांझी यांची जीभ कापून आणणाऱ्याला ११ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले.

पण त्यांचा हा अगोचरपणा पक्षाने सहन केला नाही व त्यांना पक्षातून हाकलून लावले.

मांझी यांना चूक उमगल्यानंतर त्यांनी ब्राह्मण समाज व दलित समाजाच्या संयुक्त भोजनाचा कार्यक्रम जाहीर केला. पण त्याबद्दलही त्यांनी आक्षेपार्ह विधाने केली. जे ब्राह्मण शुध्द शाकाहारी आहेत तसेच ज्यांनी कधी मद्याला स्पर्शही केला नाही आणि ज्यांच्याविरुध्द एकही अपराधी खटला किंवा तक्रार नाही अशा ब्राह्मणांनाच भोजनाला आमंत्रित केले जाईल असे त्यांनी जाहीर करुन पुन्हा वाद निर्माण केला. या परिस्थितीतही त्यांच्या निवासस्थानी भोजन झाले. तेथे मोठ्या प्रमाणात ब्राह्मण समाजाची मंडळीही गेली. परंतु भोजनाच्या आयोजनाच्या व एकंदरीतच वाढण्याच्या प्रकारावरुन ब्राह्मण मंडळींनी हरकत घेतली व भोजनास नकार दिला. त्यानंतर ब्राह्मण समाजाच्या लोकांनी भोजन करावे म्हणून मांझी यांच्या समर्थकांनी लोकांवर जबरदस्ती केलीच पण विरोध करणाऱ्यांना चोपही दिल्याची तक्रार काही ब्राह्मण मंडळींनी केली.

मांझी यांचा हा तऱ्हेवाईकपणा योजनाबध्द आहे. बिहारमध्ये रामविलास पास्वान यांच्या निधनानंतर दलितांच्या नेतृत्वात पोकळी निर्माण झाली आहे. मांझी यांना पास्वान यांच्या निधनामुळे निर्माण झालेली ती पोकळी भरायची आहे आणि बिहारचे दलित नेते म्हणून त्यांना स्वतःचे स्थान निर्माण करण्याची ओढ लागली आहे. त्यासाठी हा खटाटोप ते करीत आहेत असे सांगितले जाते.

याला म्हणतात राजकारण आणि तेही बिहारचे राजकारण! जय हो!



# हिंदुत्वाचे वाढते आक्रमक आविष्कार

मध्य प्रदेशाचे गृहमंत्री नरोत्तम मिश्रा सातत्याने चर्चेत आहेत. बहुधा योगीराज आदित्यनाथ यांच्या स्पर्धेत ते असावेत.

कपाळावर ठळक असा गंधाचा टिळा लावून त्याद्वारे स्व-हिंदुत्व प्रतिमा तयार करण्याच्या प्रयत्नात ते आहेत.

देशात कुठेही हिंदू समाज, देव-देवता वगैरेंबाबत किंचित जरी वेगळा आवाज ऐकायला आला तर सर्वप्रथम तक्रार मध्य प्रदेशात दाखल होते.

त्या तक्रारीच्या आधारे नरोत्तम मिश्रा साहेब संबंधितांना इशारा देऊन आक्षेपार्ह आणि हिंदूंच्या भावना कथितपणे दुखावल्या जाणाऱ्या गोष्टी मागे घ्यायला सांगतात व माफीही मागायचे फर्मानही मध्य प्रदेशातूनच सोडतात. हे न केल्यास संबंधितांवर कारवाईची धमकीही देतात.



अलीकडेच सनी लिओने नावाच्या एका तारकेने 'मधुबन में राधिका नाचे रे' गाण्याची तुलना जंगलात नाचणाऱ्या मोराशी केली.

झाले...........! नरोत्तमपंत खवळले. यामुळे हिंदूंच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत आणि हे गाणे तत्काळ मागे न घेतल्यास कारवाईसाठी तयार रहा असा फतवा त्यांनी जारी केला. असल्या गोष्टींची सवय नसलेल्या त्या कलाकारांनी माफी मागितली व संबंधित दृष्ये किंवा संदर्भही त्यांच्या कार्यक्रमातून काढून टाकले.

जबरदस्त! काय वट आहे नरोत्तमपंतांची!



भोपाळचा हास्य कलाकार मुनव्वर फारुकी तर नरोत्तमपंतांच्या रागाची शिकार झालेलाच आहे. त्याने भारतावर काही व्यंगात्मक टिप्पणी अमेरिकेतील कार्यक्रमात करताच इकडे मध्य प्रदेशातील नरोत्तमपंतांच्या अंगाचा भडका झाला. त्याच्यावर बहिष्कार टाकण्यापर्यंत मजल गेली. तो बिचारा भोपाळपासून दूरच राहू लागला आहे.

हा प्रकार एकंदरीतच अनाकलनीय आहे.

ज्या ठिकाणी अपराध घडतो सर्वसाधारणपणे त्या ठिकाणीच त्याविरुध्द तक्रार नोंदविणे अपेक्षित असते. परंतु नरोत्तम पंतांनी जो पुढाकार आणि स्वयंघोषित हिंदुत्व नायकाची भूमिका घेतली आहे त्यामुळे मध्य प्रदेश ही हिंदुत्वाची नवी प्रयोगशाळा आणि धर्मनिरपेक्ष व उदारमतवाद्यांसाठी धाक दाखविणारा प्रदेश झाला आहे. गुजरातला एकेकाळी हिंदुत्वाची प्रयोगशाळा मानले जात असे. आता मध्य प्रदेशात तिची शाखा उघडण्यात आली आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. थोडक्यात देशात हिंदुत्ववादी सरकारे असलेल्या राज्यांमध्ये कोण अधिकाधिक टोकाची हिंदुत्ववादी भूमिका घेतो आणि त्यासाठी अविवेकी वर्तन व आचरणाचे नवनवे आविष्कार करतो याचीच स्पर्धा लागलेली आढळते. नरोत्तमपंतांच्या या हिंदुत्ववादी भूमिकेमागे राजकीय महत्वाकांक्षा आहे हे ओळखण्यासाठी फार बुध्दीची गरज नाही.

शिवराजसिंग चौहान यांची मुख्यमंत्री म्हणून निवृत्ती प्रलंबित मानली जाते. २०२३मध्ये विधानसभा निवडणुकीत ते विजयी झाले तरी त्यांना पुन्हा मुख्यमंत्री केले जाईल याबाबत शंका आहेत. त्यामुळे मध्य प्रदेशातील मुख्यमंत्री इच्छुकांमध्ये नरोत्तमपंतांनीही

स्वतःला झोकून दिले आहे. त्यासाठी त्यांना हिंदुत्वाचा सर्वोत्तम आविष्कार करुन दाखववावाच लागणार आहे व ते तो मोकाटपणे करीत सुटले आहेत.

जास्तीतजास्त संकुचित, असहिष्णू आणि अविवेकी होऊन दाखवा..................... त्यासाठी विविध बक्षीसे तयार आहेत!

## निस्तेजस्वी सूर्या??

कर्नाटक सरकारने नुकताच धर्मांतरविरोधी कायदा संमत केला.

त्यावरुन भरपूर गदारोळ झाला आणि अजुनही होत आहे. त्याला विरोधही होत आहे.

मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांनी तो केला याचे अनेकांना आश्चर्य वाटत आहे.

बसवराज यांचे वडिल एस. आर. बोम्मई हे एम.एन. रॉय यांचे अनुयायी. रॉय हे मार्क्सवादी विचारवंत व नेते होते. त्यांची शिष्यपरंपरा मोठी मानली जाते. त्या वडिलांचे सुपुत्र असलेले बसवराज यांनी हा कायदा करावा हे न पटणारे आहे असे मंडळी बोलत आहेत.

परंतु सत्ता व अधिकार टिकविण्यासाठी सर्व काही करावेच लागते. बसवराजांनी तेच केले. या कायद्याबद्दल आक्षेप घेणाऱ्यांच्या मते बळजबरीच्या धर्मांतराला






सजापात्र करण्याऐवजी एखाद्याने स्वेच्छेने केलेले धर्मांतर देखील अपराधाच्या श्रेणीत आणलेले आहे. खरोखरच हा एकप्रकारे अविवेकीपणाच यातून प्रतीत होतो. या पार्श्वभूमीवरच तेजस्वी सूर्या नावाने भाजपच्या वर्तुळात तळपणारे तरुण खासदार व भारतीय जनता युवा मोर्चाचे प्रमुख तेजस्वी सूर्या यांनी त्यांच्या स्वभावाला साजेसे असहिष्णू विधान केले की दुसऱ्या धर्माचा स्वीकार केलेल्यांना पुन्हा हिंदू धर्मात घेण्यासाठी मोहिम सुरु करावी लागेल. म्हणजेच कर्नाटकातील नव्या कायद्यानुसार तो गुन्हा ठरणार आहे.

आपण काय चूक केली हे या सूर्यसाहेबांच्या लक्षात आल्यावर त्यांची दाणादाण झाली.

ताबडतोब त्यांनी आपले विधान विपर्यस्त स्वरुपात प्रसिध्द झाले असे म्हणून त्यामुळे आणखी गोंधळ व गैरसमज होऊ नयेत यासाठी ते सर्व विधानच आपण मागे घेत असल्याचे जाहीर करुन टाकले आणि बचाव केला.

राजकारणात भानावर राहून आणि भान ठेवून भूमिका घ्यायची असते. बेभानपणे वागल्यावर असे होते.

तेजस्वी सूर्याचे तेज यामुळे झाकोळले गेले, निस्तेज झाले खरे!

## सर्व काही ब्राह्मण मतांसाठी?

लखीमपूर खेडी येथे आंदोलनकारी शेतकऱ्यांच्या मोर्च्यावर गाडी घालणे व त्यात तेरा शेतकऱ्यांचा मृत्यु होणे ही बाब साधीसुधी नाही.

याला जबाबदार होते भाजपचे तरुण नेते आशिष मिश्रा. हे आशिष मिश्रा केंद्रीय गृहराज्यमंत्री अजय मिश्रा उर्फ टेनी यांचे चिरंजीव आहेत.

अजय मिश्रा हे गृह खात्याचे मंत्री असल्याने आशिष यांच्याविरुध्दचा तपास निःपक्षपणे होणार नाही ही शंका साधार आहे.

अजय मिश्रा हे अगदी निःपक्षतेचे मेरूमणि असले तरी किमान नैतिकतेच्या आधारे तरी त्यांनी राजीनामा देणे अपेक्षित होते. त्यांचा या गुन्ह्याशी प्रत्यक्ष संबंध नाही हे मान्य करुनही त्यांच्या राजीनाम्याची विरोधी पक्षांची मागणी गैर नाही.

पण भाजपच्या नेतृत्वाने या मागणीबाबत मूक-बधिराची भूमिका घेतली. संसदेचे हिवाळी अधिवेशन या मागणीने धुऊन निघाले पण सरकार




आणि सरकारचे नेतृत्व कोडगेपणाने निष्क्रियच राहिले.

एवढी बदनामी सहन करण्याचे कारण काय?

कारण एकच..........! अजय मिश्रा हे उत्तर प्रदेशातील ताकदवान ब्राह्मण नेते आहेत. ठाकूर किंवा राजपूत असलेल्या योगीमहाराज आदित्यनाथ यांच्या पाच वर्षांच्या कारकिर्दीत तालेवार ब्राह्मण समाज कमालीचा दुखावला गेलेला आहे.

त्यांना सार्वत्रिक भेदभाव व पक्षपाताचा मुकाबला करावा लागला. ठाकूर-राजपूत समाजाला सर्वच ठिकाणी झुकते माप देण्याच्या प्रकाराने ही नाराजी धुमसत राहिलेली आहे.

उत्तर प्रदेशात तेरा ते चौदा टक्के ब्राह्मण समाज आहे आणि तो इतर जातींनाही प्रभावित करणारा असल्याने त्यांची मते मिळविण्याची चढाओढ सर्वच राजकीय पक्ष करीत असतात. त्यामुळेच बहन मायावती यांनी देखील त्यांना चुचकारण्याचे प्रकार सुरु केले आहेत. एकेकाळी काँग्रेसकडे या समाजाची मते होती. काँग्रेसच्या घसरणीनंतर ते भाजपकडे वळले. परंतु भाजपने उत्तर प्रदेशातील राजकीय समीकरणात ब्राह्मण समाजाला नेहमीच दुय्यम स्थानावर ठेवले. आता योगीमहाराजांनी तर त्यांच्याकडे दुर्लक्ष करुन ठाकूरवादच चालविला. परिणामी या समाजाने नाराजीचे प्रकटीकरण सुरु केल्याने भाजप नेतृत्वाचे धाबे दणाणले आहे. ब्राह्मण समाजाच्या अनुनयासाठी प्रबुध्द संमेलने घेणे, त्यासाठी भाजप नेत्यांची स्वतंत्र समिती स्थापन करुन त्या समितीला ब्राह्मण समाजाशी नियमित संवाद व त्यांच्या मागण्यांची उचित दखल घेण्यास सांगण्यात आले आहे. त्यांची मनधरणी हे त्यांचे मुख्य काम आहे.

पूर्वांचल म्हणजे पूर्वी उत्तर प्रदेश आणि बुंदेलखंड भागातील ब्राह्मण समाज भाजपवर प्रचंड नाराज आहे हे स्पष्ट आहे. त्यामुळेच अजय मिश्रा यांच्याबाबत बदनामी सहन करीत भाजप नेतृत्वाने त्यांचा राजीनामा घेतलेला नाही.



ब्राह्मण समाजासाठीच्या मनधरणी समितीचे अजय मिश्रा, उपमुख्यमंत्री दिनेश शर्मा, मंत्री श्रीकांत शर्मा व काँग्रेसमधून भाजपमध्ये सामील तरुण नेते जितिन प्रसाद यांचा समावेश आहे. आता लक्षात आले ना?

## प्रायश्चित्त की पापक्षालन?

नुकतीच एक बातमी वाचनात आली असेल. ग्वाल्हेरचे महाराज व केंद्रीय हवाईवाहतूक मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी ग्वाल्हेरमधील झांशीच्या राणी लक्ष्मीबाई यांच्या समाधीस्थानी जाऊन आदरांजलि अर्पण केली. असे करणारे ते शिंदे राजघराण्यातील पहिले व्यक्ती आहेत. ऐतिहासिकरीत्या असे सांगितले जाते की जेव्हा राणी लक्ष्मीबाई ब्रिटिशांशी लढत ग्वाल्हेरच्या किल्ल्यापाशी पोहोचली तेव्हा तिला आश्रय न देता गडाचे दरवाजे उघडण्यात आले नाहीत. परिणामी राणीला हुतात्मा व्हावे लागले.

१८५७च्या संघर्षात ब्रिटिश साम्राज्यवाद्यांना साथ देण्याचा हा आरोप या राजघराण्यावर झाला आणि तो पुसण्याचे काम कुणीही केले नाही.

ज्योतिरादित्य हे पहिले की ज्यांनी ती परंपरा तोडली. एकप्रकारे प्रायश्चित्त घेतले.या त्यांच्या कृतीचे स्वागतच करावे लागेल. परंतु आणखीही काही गोष्टी या राजघराण्याला चिकटलेल्या आहेत. महात्मा गांधी यांच्या हत्येसाठी नथुराम गोडसेने वापरलेले पिस्तुल हे ग्वाल्हेरच्या शस्त्रागारातले होते असे सांगण्यात येते. ही बाबही वादग्रस्तच आहे. याबद्दलही उचित खुलासा व शंकानिरसन होणे गरजेचे आहे.

# शेवटचे पान



# शायर मिर्झा असदुल्ला खाँ उर्फ मिर्झा गालिब

महान प्रतिभावान शायर मिर्झा गालिबची २२५ वी जयंती सत्तावीस डिसेंबरला साजरी झाली. त्याच निधन होऊनही आता दिडशे वर्षे झाली आहेत. चारशे वर्षांपूर्वीचा इंग्रजी शेक्सपियर आणि दोन शतकांपूर्वीचा शायर मिर्झा गालिब आजही आपल्याला हवेसे वाटतात कारण संवेदनशील मनांचा वेध घेणाऱ्या सामाजिक आणि राजकीय भाष्यामुळे ते आजही



प्रासंगिक ठरतात. शायरीमध्ये किमान शब्दांमध्ये व्यक्त होण्याचे मोठे आव्हान असते. गालिबच व्यक्तिगत जीवन कधीच आदर्शवत नव्हत. सतत शायरीत रममाण, मदिरासक्ती आणि जुगारचा नाद ह्यामध्ये तो गुंतून पडला होता.

गालिब दिल्लीत रहायचा चांदणी चौकातील कासीम गल्लीत, एका हवेलीत. शेवटचा मुगल बादशाह बहादूरशाह जफर रहायचा चांदणी चौकातील लाल किल्ल्याच्या दुसऱ्या टोकावर. म्हणजे दोघेही एकाच मोहल्ल्यातील रहिवासी. बादशाहने गालिबला कायम सन्मानाची वागणूक दिली. ' कर्ज की पिते थे मय, लेकिन समझते थे की हाँ रंग लायेगी हमारी फाका मस्ती एक दिन '. त्याच्या जादुई शब्दांची, त्यातल्या दिव्यत्वाची अनुभूति यायला शंभर दिडशे वर्षे लागली. १८६९ साली कबरस्थान गाठणाऱ्या गालिबच्या डोक्यावर त्या काळातले २५ हजार रुपयांचे कर्ज होते. आजच्या हिशोबाने त्याची किंमत २५ कोटी नक्कीच झाली असती. सगळेच सत्ताधारी गालिबला वाटतात तसे नसतात. चांदणी चौकातील कासीम खान गल्ली गालिबची उमेदीच्या आणि उतरणीच्या ५५ वर्षे वास्तव्याची आज साक्ष देत आहेत. ती केवळ त्याच्यासारख्याच एका संवेदनशील मनाच्या सत्ताधीशामुळे. माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांनी पुढाकार घेऊन या हवेलीला राष्ट्रीय संग्रहालयाचा दर्जा मिळवून दिला. त्यामुळेच गालिबच्या आठवणी आणि त्याच्या अविनाशी शायरीला नव्याने उजाळा मिळाला. मोजक्या शब्दांमध्ये प्रभावीपणे व्यक्त होणारी अटल बिहारीजींचा आणि गालिब यांच्या शब्दांच्या पेहरावातील सारखेपणा चकित करणारा. वाजपेयींची जन्मतारीख २५ डिसेंबर आणि गालिब ची २७ डिसेंबर हाही नियतीने जुळवलेला सुंदर योगायोग. म्हणूनच शेक्सपिअर, गालिब ही संस्कृतीची लेणी अजरामर आहेत.

गालिबनंच म्हटल होत

**'हुई मुशत्के गालिब मर गया**
**पर याद आता है वो**
**हर एक बात पे कहता के**
**यूँ होता तो क्या होता'**

हा महाकवी, सौंदर्याचा उपासक आपला कारवां घेऊन अनंताकडे पसरतच जाईल. गालिबची शायरी कविश्रेष्ठ कुसुमाग्रजांना मोहून टाकायची म्हणूनच त्यांनी गालिबच्या काही रचना मराठीत आणल्या होत्या त्यापैकी एक

**'नात्यास आपल्या देऊ नकोस नाव काही**
**साऱ्याच चांदण्यांची जगतास जाण नाही**
**गावातल्या दिव्यांना पथ तो कां पुसावा**
**मंझिल कि जयांची तारांगणात नाही.'**

आकाशातल्या ताऱ्यांमधला हा एक रुपेरी संवाद.

